वर्ष ३४, अंक २७४, ५ रुपये, शहर आवृत्ती, वृत्तान्तसह पृष्ठे १४

नागपूर, बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६ WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

नागपूर, मुंबई, पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती!

अग्रलेख

**वैद्यकीचेही गलगोटियाकरण**

वैद्यकीय क्षेत्रात गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ हवे, तर फक्त प्रवेश प्रक्रियेतील बदल पुरेसे नाहीत. व्यवस्थेचा फेरविचार करताना खासगी संस्थांचे शुल्क नियमन करावेच लागेल...




क्रीडा

**इंग्लंड उपांत्य फेरीत**

तापमान

कमाल ३१.९°से | किमान १६.५°से

हवामानाचा अंदाज

आकाश निरभ्र राहील.

**काय चाललंय काय!**

प्रशांत कुलकर्णी




तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण या असल्या बोगस विद्यापीठातून बोगस पदवी घेतलेल्या बोगस विद्यार्थ्यांनी अनेक बोगस उद्योग उभे केले आणि त्यासाठी बँकांकडून खरोखरची कर्जे घेतली!!

# अनिश्चिततेमुळे अस्थिरता

## अमेरिकेच्या आयातशुल्काबाबतच्या संभ्रमाने शेअर बाजारात घसरण




वृत्तसंस्था, वॉशिंग्टन

**अमेरिकेचे अध्यक्ष** डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी घोषणा केल्याप्रमाणे मंगळवारपासून १० टक्के आयातशुल्क लागू झाले असल्याचे सीमाशुल्क आणि सीमा संरक्षण (सीबीपी) विभागाने जाहीर केले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी, त्यांनी १५ टक्के आयातशुल्क आकारण्याची घोषणा केली. त्यात बदल होणार नसल्याचे व्हाइट हाऊसने स्पष्ट केले.

धोरणातील अनिश्चिततेने जागतिक बाजारात उमटलेल्या नकारात्मक प्रतिक्रियेने देशांतर्गत बाजारात, सेन्सेक्स-निफ्टी निर्देशांकांना सव्वा टक्क्याचे मोठे नुकसान झाले. आयात कराबाबत चित्र स्पष्ट झाल्यावरच भारत अमेरिकेशी व्यापार चर्चा सुरू करेल असे केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी स्पष्ट केले.

ट्रम्प आणि 'सीबीपी'ने केलेल्या वेगवेगळ्या घोषणांमुळे आयातशुल्काच्या नेमक्या दरावरून गोंधळ कायम आहे. सवलती दिलेल्या वस्तू वगळता, सर्व आयात वस्तूंवर अतिरिक्त १० मूल्यानुसार (अॅड व्हॅलोरेम) कर लागू केला जाणार आहे, असे 'सीबीपी'च्या नोटिशीत नमूद करण्यात आले आहे. यामुळे अमेरिकेने विविध देशांशी केलेल्या व्यापार करारात निर्धारित करण्यात आलेल्या आयातशुल्कावर अतिरिक्त १० टक्के आयातशुल्क आकारले जाणार आहे का, हा गुंता सुटलेला नाही. ट्रम्प यांनी १५ टक्क्यांची घोषणा केली असतानाही त्यापेक्षा कमी आयातशुल्क दर का लागू करण्यात आला, याचे स्पष्टीकरण 'सीबीपी' किंवा ट्रम्प प्रशासनाने दिलेले नाही. तसेच ही पंधरा टक्क्यांची वाढ केव्हापासून लागू होणार हे स्पष्ट झाले नाही. व्हाइट हाऊसच्या एका अधिकाऱ्याने 'फायनान्शिअल टाइम्स'ला अशी माहिती दिली की, १५ टक्के आयातशुल्क नंतर लागू केले जाईल.

ट्रम्प यांच्या आयातशुल्कासंबंधी धोरणाबाबत वाढलेल्या अनिश्चिततेने जागतिक बाजारात उमटलेल्या नकारात्मक प्रतिक्रियेचे अनुकरण करत खुल्या झालेल्या देशांतर्गत बाजारात, सेन्सेक्स-निफ्टी निर्देशांकांना तब्बल सव्वा टक्क्याचे मोठे नुकसान मंगळवारी सोसावे लागले. दिवसभरात १,३६० अंशांच्या घसरणीतून ८२ हजारांची पातळी मोडत सेन्सेक्स, दिवसाचे व्यवहार थंडावताना १,०६८.७४ अंशांची (१.२८ टक्के) तूट सोसत, ८२,२२५.९२ वर *(पान ४ वर)*

### ट्रम्प यांच्याविरोधात वाढती नाराजी

डोनाल्ड ट्रम्प हे वयोमानानुसार अधिक लहरी होत आहेत, असे अमेरिकेतील बहुसंख्य जनतेला वाटत असल्याचे 'रॉयटर्स' आणि 'इप्सॉस'ने केलेल्या जनमत चाचणीतून समोर आले आहे. ट्रम्प ७९ वर्षांचे असून जगातील वयाने सर्वात ज्येष्ठ राष्ट्रप्रमुखांपैकी एक आहेत. ट्रम्प काँग्रेसमध्ये वार्षिक भाषण करण्याच्या एक दिवस आधी, सोमवारी या चाचणीचे निकाल जाहीर करण्यात आले. त्यानुसार, ६१ टक्के अमेरिकी व्यक्तींनी ट्रम्प यांच्यावर टीका केली आहे, चाचणीत सहभागी झालेल्यांमध्ये ३० टक्के लोक रिपब्लिकन पक्षाचे समर्थक आहेत.

अमेरिकेत आयातशुल्काबाबत चित्र अधिक स्पष्ट होईल तेव्हाच भारत सरकार कराराबाबत चर्चा सुरू करेल.
**– पीयूष गोयल,** केंद्रीय वाणिज्यमंत्री

### 'करार रद्द करण्याचे धाडस दाखवा'



**भोपाळ :** भारताने दबावाखाली अमेरिकेशी करार केला आहे. तो रद्द करण्याचे धाडस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखवावे, असे आव्हान काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिले. किसान महाचौपाल सभेत त्यांनी हा करार शेतकऱ्यांच्या मुळावर येणारा असल्याची टीका केली. नरेंद्र मोदी यांनी देशहिताशी तडजोड केली. हा करार नसून शेतकऱ्यांच्या हृदयात घुसलेला बाण आहे, अशा शब्दांत त्याची संभावना केली.

# पेंच व्याघ्र प्रकल्पालगतच्या 'महोत्सव'ची गंभीर दखल

## 'लोकसत्ता'च्या बातमी आधारावर 'सुमोटो' याचिका

लोकसत्ता प्रतिनिधी




पेंच व्याघ्रप्रकल्पाच्या संवेदनशील क्षेत्रात संगीत महोत्सवाच्या आयोजनाचे वृत्त 'लोकसत्ता'ने प्रसिद्ध केले होते.

**नागपूर :** पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात 'संगीत महोत्सव' आयोजित करण्यात आला. 'लोकसत्ता'ने याबाबतचे वृत्त प्रकाशित केल्यानंतर पेंच प्रशासनाने महोत्सव रद्द करण्याचा निर्णय घेतला. आता मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने या प्रकरणाची दखल घेत स्वतःहून जनहित याचिका दाखल करण्याचे निर्देश दिले.

याप्रकरणी न्यायालयीन मित्र म्हणून अॅड.चेतन शर्मा यांची नियुक्ती करण्यात आली असून दोन आठवड्यात रीतसर याचिका तयार करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहे.

पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्राजवळच 'कोलितमारा संगीत महोत्सव' आयोजित करण्यात आला होता. समाजमाध्यमातून याची जाहिरातही केली गेली. याबाबत 'लोकसत्ता'ने वन विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पर्यावरण संवेदनशील क्षेत्र मार्गदर्शक तत्त्वे, ध्वनिप्रदूषण नियंत्रण २०००, वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अशांतता कलम, वन विभागाचा व्यावहारिक सराव याशिवाय इतरही कायद्याअंतर्गत संरक्षित क्षेत्राजवळ अशा कोणत्याही उपक्रमांना परवानगी देता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाने *(पान ४ वर)*

## श्रीगोंद्याजवळ अपघातात ४ ठार, एक जखमी

**अहिल्यानगर:** श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव शिवारात मोटार आणि मालवाहतूक मोटार यांच्यात झालेल्या अपघातात चौघांचा जागीच मृत्यू झाला तर एक जण जखमी झाला. अहिल्यानगर-दौंड महामार्गावर मंगळवारी पहाटे हा अपघात झाला. गजानन जनार्दन पायघन (वय ४६), त्यांची पत्नी द्रोपदा गजानन पायघन (वय ३६) व वैभव गजानन पायघन (वय १९, तिघेही मूळ राहणार पातुर, मळसुर, अकोले, सध्या रा. कोंभळी, श्रीगोंदे) या एकाच कुटुंबातील तिघांसह वाहनचालक नितीन अनिल कोकाटे (वय २२, रा. आष्टी, श्रीगोंदा) या चौघांचा अपघातात जागीच मृत्यू झाला. पायघन कुटुंब आपल्या मूळ गावी गेले होते व तेथून मोटारीने परतत असताना पहाटे तीनच्या दरम्यान हा अपघात झाला.

## दुधाच्या दरात दोन रुपयांची वाढ

**मुंबई :** दूध खरेदी दरात वाढ



झाल्यामुळे राज्यातील प्रमुख दूध संघांनी गायी आणि म्हशीच्या दूध विक्री दरात दोन रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ग्राहकांसाठी १ मार्चपासून ही दरवाढ लागू होणार आहे. पुण्यातील कात्रज डेअरी येथे झालेल्या दूध उत्पादक व प्रक्रिया कल्याणकारी संघाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

## गर्भाशयाचा कर्करोग रोखण्यासाठी लसीकरण

**नवी दिल्ली :** गर्भाशयाचा कर्करोग रोखण्यासाठी केंद्र सरकारने देशातील १४ वर्षे आणि त्यापुढच्या वयोगटातील मुलींसाठी 'एचपीव्ही' म्हणजेच ह्युमन पॅपिलोमाव्हायरस लसीकरण मोहीम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी गार्डासिल ही लस वापरली जाईल. वयाची १४ वर्षे पूर्ण केलेल्या १ कोटी १५ लाख मुली यासाठी पात्र असतील. याची एकत्र मात्रा देण्यात येणार असून, हे लसीकरण ऐच्छिक आणि संपूर्णतः मोफत आहे. पान ५

# भुमरेंच्या वाहनचालकाला जन्मापूर्वीच तीन एकर जमीन बक्षीस

## 'समृद्धी'मधील मोबदला उचलण्यासाठीचा डाव?

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** समृद्धी महामार्गातील १,१५० कोटी रुपयांच्या मूल्यांकनातील रक्कम मिळावी, यासाठी खासदार संदीपान भुमरे यांचे वाहनचालक जावेद रसूल शेख यांच्या नावे १९७१ मध्ये तीन एकराचा हिबानामा (बक्षीस पत्र) करण्यात आला. वस्तुतः जावेद रसूल यांचा जन्म १९८५ मधील असल्याने हा हिबानामा कसा झाला, यात कोणाचे हितसंबंध दडले आहेत, याची गुन्हे अन्वेषण विभागाकडून चौकशी करावी, अशी मागणी शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे व महसूल प्रशासनाकडे केली आहे.

### हिबानामा म्हणजे काय?

हिबानामा म्हणजे बक्षीस पत्र. मुस्लीम समाजात वारस नसणाऱ्यास बक्षीसपत्र लिहून दिले जात असे. असा हिबानामा यापूर्वी जावेद रसूल शेख यांच्या नावे करण्यात आला. शेख यांचा जन्म १९८५ मधील आहे. मग १९७१ चा हिबानामा कसा, असा प्रश्नही दानवे यांनी उपस्थित केला. महसूल सहआयुक्तांनी जमीन हडप करण्यासाठी बऱ्याच खटपटी केल्याचे त्यांच्या पत्रातही नमूद केले आहे.

या जमिनीचे सध्याचे बाजारमूल्य १५० कोटी रुपये आहे. हिबानामा ज्या जावेद रसूल शेख यांच्या नावे आहे ते सत्ताधारी खासदार भुमरे यांच्या वाहनाचे *(पान ४ वर)*

जावेद शेख हा माझा वाहनचालक आहे हे अंबादास दानवे यांनी सिद्ध करावे. दुसरे असे की, एकसारखी नावे असणारे अनेकजण असतील. या व्यक्तीचा आणि माझा काही संबंध नाही. नुसते आरोप करून कसे चालेल? ते सिद्धही करावे लागतील.
**– संदीपान भुमरे,** खासदार, छत्रपती संभाजीनगर

तक्रार आल्यानंतर उपविभागीय अधिकाऱ्यांना अहवाल देण्यास सांगितले होते. शिवाय या प्रकरणात पोलीस अधिकाऱ्यांमार्फत गोपनीय चौकशी सुरू आहे. या अनुषंगाने मूळ हिबानामाच्या प्रती आणि जमिनीची कागदपत्रे पाहून चौकशी करण्यास सांगितले आहे. **– दिलीप स्वामी,** जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर

## अवकाळी पावसामुळे शेतकरी संकटात

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यात सोमवारी झालेल्या गारपीट आणि अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले जातील अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी विधानसभेत दिली.

राज्याच्या अनेक भागांत काल गारपीट आणि वादळी पाऊस झाल्यामुळे आंबा, काजू अशा बागायती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून मराठवाड्यातही अनेक जिल्ह्यांना अवकाळीचा फटका बसला आहे. काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून याकडे सरकारचे लक्ष वेधले. पान ४

## १२ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या

**मुंबई :** यंदाच्या अर्थसंकल्पात कठोर पाऊल उचलण्याचे संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असले तरी वर्षभरात राज्याची आर्थिक शिस्त कोलमडून पडल्याची बाब समोर आली आहे. मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळात ११ हजार ९९५ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. त्यामुळे महायुती सरकारने गेल्या वर्षभरात मांडलेल्या पुरवणी मागण्यांचे आकारमान १ लाख ४४ हजार ७९० कोटींच्या घरात गेले आहे.

यंदाचा अर्थसंकल्प सुमारे सात लाख कोटींचा असून, पुरवणी मागण्या १ लाख ४४ हजार कोटींच्या झाल्या आहेत. मूळ अर्थसंकल्पाच्या १५ टक्क्यांच्या तुलनेत पुरवणी मागण्या असाव्यात, असे संकेत असतात. पण यंदा पुरवणी मागण्यांचे प्रमाण हे निकषांपेक्षा अधिक झाले आहे.

## ब्रिटिश एअरवेजच्या विमानाचे नागपुरात आपत्कालीन 'लँडिंग'

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नागपूर :** ब्रिटिश एअरवेजच्या विमानाला मंगळवारी पहाटे हैदराबादमधील प्रतिकूल हवामानामुळे नागपूरकडे वळविण्यात आले. पहाटे साडेपाचच्या सुमारास विमान नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुरक्षित उतरवण्यात आले. विमानात एकूण १६९ प्रवासी होते. सर्व प्रवासी, कर्मचारी सुखरूप असल्याचे प्रशासनाने सांगितले.

लंडनहून हैदराबादकडे निघालेले हे विमान नियोजित वेळेनुसार हैदराबाद येथे उतरणार होते. मात्र, तेथे दृश्यमानता कमी होणे आणि प्रतिकूल हवामानाची परिस्थिती निर्माण झाल्याने वैमानिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने पर्यायी विमानतळाचा पर्याय स्वीकारला. देशाच्या मध्यवर्ती भागात असलेले नागपूर विमानतळ आणि येथे उपलब्ध अत्याधुनिक तांत्रिक सुविधा लक्षात घेता विमान नागपूरकडे वळवण्याचा निर्णय घेण्यात आला. आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन अग्निशमन दल, वैद्यकीय पथक आणि सुरक्षा यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या होत्या.

## केरळचे नाव आता 'केरलम'

**नवी दिल्ली :** केरळ राज्याचे नामांतर 'केरलम' करण्याच्या




राज्य सरकारच्या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंगळवारी मान्यता दिली, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली 'सेवा तीर्थ' येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. केरळ विधानसभेने २४ जून २०२४ रोजी केरळचे नाव 'केरलम' असे बदलण्याचा ठराव मंजूर केला होता. पान ५




गुंतवणुकींना जीवनातील ध्येयांशी जोडल्याने तुमची ध्येये साध्य होण्यास मदत होऊ शकते.

म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक केल्याने तुमच्या संपत्ती निर्मितीच्या प्रवासात आर्थिक शिस्त येण्यास मदत होते.

आजच सुरुवात करा, तुमचा उद्या घडवा.

अधिक माहितीसाठी आपल्या आर्थिक सल्लागाराशी संपर्क साधा

म्युच्युअल फंड गुंतवणूकदारांना "नो युअर कस्टमर (KYC)" प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे, जी पूर्ण KYC फॉर्म आणि आवश्यक कागदपत्रे कोणत्याही AMC च्या शाखा कार्यालयात किंवा अधिकृत स्वीकार केंद्रात सादर करून करता येते. KYC दस्तऐवजीकरणाच्या आवश्यकता, पत्ता, फोन नंबर, बँक तपशील इत्यादी बदलाची प्रक्रिया जाणून घेण्यासाठी कृपया भेट द्या: https://www.licmf.com/kyc-redressal. गुंतवणूकदारांनी फक्त SEBI नोंदणीकृत म्युच्युअल फंडांमध्येच गुंतवणूक करावी, ज्याचे तपशील SEBI च्या संकेतस्थळावरील 'Intermediaries/Market Infrastructure Institutions' (https://www.sebi.gov.in/intermediaries.html) अंतर्गत पडताळले जाऊ शकतात. कोणत्याही तक्रारी आणि तक्रार निवारणासाठी गुंतवणूकदार संबंधित AMC च्या गुंतवणूकदार संबंध अधिकारीशी संपर्क साधू शकतात, आणि AMC द्वारे दिलेल्या उपायाने समाधान न झाल्यास, ते SEBI च्या SCORES पोर्टलवर (https://scores.sebi.gov.in/) तक्रार नोंदवू शकतात आणि/किंवा ऑनलाइन वाद निवारण पोर्टलद्वारे (https://smartodr.in/login) तक्रार वाढवू शकतात.

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक बाजारातील जोखमींना अधीन आहे, सर्व योजना संबंधित कागदपत्रे काळजीपूर्वक वाचा.
MUTUAL FUND INVESTMENTS ARE SUBJECT TO MARKET RISKS, READ ALL SCHEME RELATED DOCUMENTS CAREFULLY.

# गडहिंग्लजमधील पराभवानंतर जनता दल अस्तंगत

दयानंद लिपारे, लोकसत्ता

**कोल्हापूर :** कधी काळी देशात सत्तेवर असलेल्या जनता दलाचा राज्यातील शेवटचा गडहिंग्लजचा बुरूजही नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत ढासळला आहे. जनता दलाचे दिवंगत प्रदेशाध्यक्ष, माजी आमदार श्रीपतराव शिंदे यांच्यानंतर त्यांच्या कन्या माजी नगराध्यक्षा स्वाती कोरी यांच्याकडून तालुक्यात पक्षाचे अस्तित्व टिकून होते. मात्र त्यांच्या भाजप प्रवेशानंतर आता जनता दल केवळ आठवणीपुरता उरला आहे.

**राज्यात गडहिंग्लज तालुक्यात जनता दलाचे अस्तित्व टिकून होते. मात्र नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीनंतर राज्यात या पक्षाचा आधार संपला आहे.**

राज्यात काँग्रेसचे प्राबल्य असताना ७० च्या दशकात त्यांना आव्हान देणाऱ्या पक्षात प्रामुख्याने जनता पक्ष, डाव्या पक्षांचा समावेश होता. भाजपचा मूळ पक्ष जनसंघ तेव्हा बाल्यावस्थेत होता. राज्यातील पुलोद सरकारमध्ये या पक्षातील काहींना मानाचे पान मिळाले होते. पुढे याच जनता पक्ष आणि त्यांच्या मित्रपक्षांचा मिळून जनता दल हा पक्ष तयार झाला. माजी पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंह *(पान ४ वर)*

### दोन तालुक्यांत प्राबल्य



कोल्हापुरात एके काळी इचलकरंजीत कम्युनिस्टांचे आमदार निवडून येत होते तेव्हा राधानगरी व गडहिंग्लजमध्ये जनता दलाचे आमदार आपला दबदबा निर्माण करून होते. श्रीपतराव शिंदे यांनी गडहिंग्लज मतदारसंघात तत्कालीन काँग्रेस नेते बाबा कुपेकर यांना आव्हान देता देता साखर कारखान्यावर प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. गडहिंग्लज कारखान्यावर सत्ता मिळाली, तरी आर्थिक अडचणी ते दूर करू शकले नाहीत. अशा वेळी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याकडून अर्थसाहाय्य मिळवण्याचा प्रयत्न होत होता. पवार यांनी त्या काळात काही डाव्या- जनता दलाच्या नेत्यांना पाठबळ देण्याची भूमिका घेतली.




# शुल्क थकल्याने विद्यार्थ्याला शाळेतून काढणे बेकायदा

## न्यायालयाचे शाळा व्यवस्थापनावर ताशेरे

**तुषार धारकर, लोकसत्ता**

**नागपूर :** प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत, म्हणजेच ६ ते १४ वयोगटातील कोणत्याही मुलाला, केवळ शुल्क थकबाकीच्या कारणावरून शाळेतून काढता येत नाही. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना शाळेतून काढणे मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क कायदा, २००९ (आरटीई) च्या तरतुदींचे उल्लंघन ठरते, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने भंडारा जिल्ह्यातील सातवीतील विद्यार्थिनीला दिलासा दिला.

न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठासमोर याप्रकरणी सुनावणी झाली. भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथील फादर ॲग्नेल शाळेच्या व्यवस्थापनाने या विद्यार्थिनीचे २४ हजार रुपये शुल्क थकीत असल्याचे कारण देत मार्च २०२५ मध्ये 'ट्रान्सफर सर्टिफिकेट' देत तिला शाळेतून काढले. विद्यार्थिनीने याविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. सुनावणीदरम्यान, ही शाळा विनाअनुदानित अल्पसंख्याक संस्थेची असून आरटीई कायदा आपल्यावर लागू होत नाही, असा दावा शाळा व्यवस्थापनाने केला.

मात्र, हा युक्तिवाद फेटाळताना न्यायालयाने नमूद केले की, राज्य सरकारच्या ना-हरकत प्रमाणपत्रावर तसेच जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांनी दिलेल्या मान्यतेच्या आधारे शाळा चालवली जात असताना, आरटीई कायदा लागू होत नाही असा दावा करणे मनमानी आहे.

यावेळी विद्यार्थिनीला शाळेतून काढण्याचा निर्णय व तिचे 'ट्रान्सफर सर्टिफिकेट' रद्द करत न्यायालयाने दोन आठवड्यांत थकीत शुल्क भरण्याचे निर्देश पालकांना दिले.

## दिनदर्शिका

**बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६**
भारतीय सौर ०६ फाल्गुन शके १९४७
मिती फाल्गुन शुक्लपक्ष नवमी
उत्तररात्री ०२ : ४१ पर्यंत.
नक्षत्र : रोहिणी १३ : ३९ पर्यंत.
चंद्र : वृषभ २४ : ५५
सूर्योदय : ०७ : ०२ , सूर्यास्त : १८ : ४२

- **मेष :** स्थावरचा प्रश्न सुटेल.
- **वृषभ :** मार्ग मिळेल.
- **मिथुन :** नियमांचे पालन करा.
- **कर्क :** शुभ वार्ता कळेल.
- **सिंह :** वरिष्ठांचे सहकार्य मिळेल.
- **कन्या :** प्रगती होईल.
- **तूळ :** संवाद जपून करा.
- **वृश्चिक :** मेहनतीचे फळ मिळेल.
- **धनू :** धाडसी निर्णय टाळा.
- **मकर :** अंमलबजावणी कराल.
- **कुंभ :** चर्चा सफल होईल.
- **मीन :** धार्मिक गोष्टींत सहभाग.

**शुभ राशी : कन्या , वृश्चिक**

# कॉपीमुक्त अभियान प्रभावी!

## उपायांमुळेच परीक्षांतील गैरप्रकार उघड झाल्याचा शिक्षण मंडळाचा दावा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यात दहावी, बारावीच्या परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी गेल्या काही वर्षांपासून कॉपीमुक्त अभियान सातत्याने राबवण्यात येत आहे. या अभियानामुळेच यंदा काही ठिकाणी सामूहिक कॉपी, गैरप्रकार उघडकीस आल्याचा दावा राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने केला आहे. यानंतर फौजदारी कारवाई, निलंबनामुळे अशा प्रकारांवर भविष्यात वचक बसण्यास मदत होणार असून हे गैरप्रकार थांबण्यासाठी मानसिकता बदलणे गरजेचे असल्याचे मत तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात आले आहे. राज्य मंडळातर्फे दहावी, बारावीच्या परीक्षा पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी कॉपीमुक्त अभियान



राबवण्यात येत आहे. त्या अंतर्गत राज्य मंडळाकडून २७१ भरारी पथकांची नेमणूक, परीक्षा केंद्रांना आकस्मिक भेटी, विभागीय मंडळांतर्गतही विशेष भरारी पथकांची नियुक्ती, परीक्षा केंद्रांवर बैठी पथके, सीसीटीव्ही-ड्रोनद्वारे देखरेख, पोलीस बंदोबस्त अशा उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मात्र, आतापर्यंत राज्यभरात २००हून अधिक गैरप्रकारांची नोंद झाली आहे. त्यामुळे कॉपीमुक्त अभियान खरोखरच यशस्वी ठरले आहे का, असा प्रश्नदेखील उपस्थित होत आहे.

मंडळाचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे म्हणाले, 'यंदा प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात गैरप्रकार अधिक आढळून आले आहेत. कॉपीमुक्त अभियानामुळे गैरप्रकार उघडकीस येत आहेत. तसेच कारवाईमुळे धाक निर्माण होत आहे, हे अभियानाचे यश आहे. त्यातूनच गैरप्रकार टप्प्याटप्प्याने कमी होतील.'

> कॉपीमुक्त अभियान यशस्वी झाले आहे. त्याचे परिणाम दिसून येत आहेत. काही केंद्रांवर सामूहिक कॉपीची प्रकरणे उघडकीला आली. परीक्षांतील गैरप्रकार थांबण्यासाठी 'ओपन बुक'सारख्या पद्धतींचा वापर करणे शक्य आहे. मात्र, विद्यार्थिसंख्या जास्त असणे, त्यासाठीच्या प्रश्नपत्रिका तयार करणे ही आव्हाने आहेत.
>
> **- डॉ. अ. ल. देशमुख,** ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

> दहावी, बारावीच्या परीक्षांदरम्यान उघडकीला आलेल्या गैरप्रकारांमुळे कॉपीमुक्तीसाठीचे प्रयत्न दिसून येतात. त्याशिवाय संबंधित प्रकरणांमध्ये फौजदारी गुन्हे, निलंबन अशा कारवाईमुळे गैरप्रकारांना पाठबळ देणाऱ्यांना वचक बसेल. भविष्यात असे प्रकार कमी होतील, मानसिकता बदलेल, अशी अपेक्षा आहे.
>
> **- डॉ. अशोक भोसले,** माजी सचिव, राज्य मंडळ

# वैद्यकीय 'सुपर स्पेशालिटी'च्या ५४० अतिरिक्त जागांना मंजुरी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी नवीन आणि वाढीव पदव्युत्तर अतिविशेष (सुपर स्पेशालिटी) अभ्यासक्रमांसाठीच्या वाढत्या अर्जांचा विचार करून देशातील ८९ वैद्यकीय महाविद्यालयांत अतिरिक्त ५४० जागांना राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने (एनएमसी) मान्यता दिली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ९ महाविद्यालयांतील ३३ जागांचा समावेश आहे.

मान्यता मिळालेल्या या जागांमध्ये कार्डिओलॉजीमध्ये सर्वाधिक ६४ जागांना मंजुरी मिळाली आहे. त्याखालोखाल युरोलॉजी ४८, सर्जिकल ऑन्कोलॉजी ४० आणि प्लास्टिक अँड रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जरी ३९ अशा जागा आहेत. तसेच नेफ्रोलॉजीला ३९, क्रिटिकल केअर मेडिसिन ३४, न्यूरोसर्जरी ३१, न्यूरोलॉजी २५, पेडियाट्रिक सर्जरी २५, निओनॅटोलॉजी २४, मेडिकल गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजी २०, सर्जिकल गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजी १८, क्लिनिकल इम्युनोलॉजी अँड रुमॅटोलॉजी १६, कार्डियाक ॲनेस्थेशिया व मेडिकल ऑन्कोलॉजीला प्रत्येकी १४ जागा मिळाल्या आहेत.

### जागा कुठे वाढल्या?

आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, दिल्ली, गोवा, गुजरात, हरियाणा, जम्मू-काश्मीर, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, ओडिशा, पंजाब, राजस्थान, तामिळनाडू, तेलंगणा, उत्तर प्रदेश व उत्तराखंडमधील जागांमध्ये वाढ झाली असून त्यात मुंबईच्या लोकमान्य टिळक वैद्यकीय महाविद्यालय (शीव रुग्णालय), सेठ जीएस वैद्यकीय महाविद्यालय (केईएम), टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय (नायर) आणि औरंगाबाद शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील जागांचा समावेश आहे.




# राज्यसेवेच्या जागांमध्ये घट झाल्याने नाराजी

## आदिवासी विकास विभागातील ११ पदे रद्द

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ होऊन तीन महिने झाले तरी अद्याप निकाल जाहीर झाला नाही. एकीकडे या निकालाची प्रतीक्षा असताना आयोगाने अचानक काही जागा रद्द केल्याने परीक्षार्थींमध्ये नाराजीचे वातावरण आहे. मुळात जागा वाढीसाठी मागणी होत असताना जागा कमी झाल्याने उमेदवारांची चिंता वाढली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ च्या जाहिरातीमध्ये सुरुवातीला विविध विभागांतर्गत ३८५ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्यानुसार राज्यातील ३७ जिल्हा केंद्रांवर परीक्षा झाली. एकूण रिक्त जागांमध्ये सामान्य प्रशासन विभाग (राज्य सेवा) १२७, महसूल व वन विभाग (महाराष्ट्र वनसेवा) १४४, सार्वजनिक बांधकाम विभाग (महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा) ११४ अशा पदांचा समावेश होता.

पूर्व परीक्षा झाल्यानंतर आयोगाने काही मागणीपत्रांच्या आधारे पदांची संख्या ३८५ वरून ६०१ केली होती. यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला होता. मात्र, या जागांमध्ये आता घट करण्याचे परिपत्रक आयोगाने काढले आहे. त्यात आदिवासी विकास विभागाच्या विनंतीनुसार महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ मधील राज्य सेवा परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गापैकी उपसंचालक, प्रकल्प अधिकारी (एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प) संवर्गाची ११ पदे वगळण्यात आल्याचे आयोगाने जाहीर केले. जागांमध्ये घट झाल्याने उमेदवारांमध्ये नाराजीचा सूर आहे.




# एस.एस.सी. मार्गदर्शन - बोर्ड परीक्षा सराव कृतिपत्रिका

## बोर्ड परीक्षा सराव कृतिपत्रिका (३)

**विषय : भूगोल**

**वेळ : २ तास** **गुण - ४०**

### सूचना

१. सर्व प्रश्न कृती सोडविणे आवश्यक आहे
२. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात
३. प्रश्न क्रमांक ४ (अ) साठी पुरवण्यात आलेल्या नकाशा आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेत जोडावा
४. प्रश्न क्रमांक ६ (अ) साठी पुरवण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेत जोडावा
५. नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे
६. प्रश्नांची उत्तरे देताना आवश्यक तेथे आकृत्या आलेख काढावेत
७. प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनाने लिहावीत
८. शिस पेन्सिल वापरण्यास हरकत नाही. रंगीत पेन्सिलचा उपयोग आकृत्या आकृत्या आराखडे नकाशा कार्य इत्यादीसाठी करावा.
९. पेन्सिलने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

**प्र. १. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य ते पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत लिहा.** ४

१. भारत व ब्राझील या दोन्ही देशातील राजवट ______ प्रकारची आहे.
(अ) लष्करी (ब) साम्यवादी (क) प्रजासत्ताक (ड) अध्यक्षीय
२. ब्राझीलमधील वनांमध्ये ______ हा महत्त्वाचा वृक्ष आढळतो.
(अ) साल (ब) फर (क) पाऊ ब्रासील (ड) पाईन
३. भारतातील ______ या राज्यात सर्वाधिक नागरीकरण झालेले आढळते.
(अ) गोवा (ब) केरळ (क) बिहार (ड) पश्चिम बंगाल
४. ब्राझील हा देश ______ च्या निर्यातीत अग्रेसर आहे.
(अ) चहा (ब) कॉफी (क) तांदूळ (ड) मका

**प्र. २. वेगळा घटक ओळखा.** ४

१. ब्राझीलमधील नद्या
i. ॲमेझॉन ii. उरुग्वे iii. पुरूस iv. यमुना
२. भारतातील सागरी मासेमारी -
i. शेवंडे ii. रोहू iii. सुरमई iv. वशी
३. भारतातील पक्षी -
i. कोंडोर ii. मोर iii. खंड्या iv. तितर
४. ब्राझीलमधील रेल्वे स्थानके -
i. साऊ लुईस ii. ज्युआझोरिओ
iii. पोर्तो अलगर iv. वास्को - द - गामा


**प्र. ४. थोडक्यात टिपा लिहा. (कोणतेही दोन)** ४

१. क्षेत्र भेटीसाठी आवश्यक साहित्य
२. भारतीय द्वीपकल्प
३. ब्राझीलमधील शेती

**प्र. ४ अ) तुम्हास पुरविलेल्या भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील घटक दाखवा तसेच त्यांची नावे द्या व चिन्हांची सूची द्या. (कोणतीही चार)** ४

१. मारजॉ बेट
२. ॲमेझॉन नदी
३. रोराईमा राज्य
४. पंपास
५. अवर्षण चतुष्कोन
६. ब्राझीलमधील सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य

**(आ) नकाशा वाचन करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतीही चार)** ४




१. वरील नकाशा काय दर्शवितो?
२. भारतीय प्रमाणवेळेचे रेखावृत्त कोणते?
३. भारताच्या मुख्य भूमीचे दक्षिणेकडील टोक कोणते?
४. भारताचे उत्तर-दक्षिण अंतर किती आहे?
५. कोणत्या देशांच्या तीन भूसीमा भारताच्या सीमेशी संलग्न आहेत?

**प्र. ५ भौगोलिक कारणे लिहा. (कोणतीही दोन)** ६

१. ब्राझीलमध्ये पश्चिमवाहिनी नद्या आढळत नाहीत.
२. ईशान्य मान्सून वाऱ्यांमुळेही भारतात पाऊस पडतो.
३. ब्राझीलमध्ये लोकवस्तीचे केंद्रीकरण पूर्व किनाऱ्यालगत आढळते.
४. आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी सागरी मार्गांवर अवलंबून राहावे लागते.

**प्र.६ (अ) दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे स्तंभालेख काढा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** ६

**भारताची ब्राझील सोबत झालेली निर्यात**
**(निर्यात - दशलक्ष यु.एस. डॉलरमध्ये)**


| वर्ष | २००८ | २००९ | २०१० | २०११ | २०१२ |
|---|---|---|---|---|---|
| निर्यात | ३७०० | २२०० | ४२०० | ६१०० | ५००० |

१. २००९ मध्ये भारताची निर्यात किती होती?
२. भारताची सर्वाधिक निर्यात कोणत्या वर्षी होती?
३. २००८ ते २०००१० या कालावधीत भारताच्या निर्यातीत किती दशलक्षाने वाढ झाली?

**किंवा**

**(आ) आलेख वाचन करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.** ६

**भारत - नागरीकरणाचा कल (१९६१ ते २०११)**




१. वरील आलेखाचा प्रकार कोणता ?
२. १९९१ साली नागरीकरण किती टक्के झाले होते ?
३. या आलेखात क्ष अक्षावर काय दर्शविलेले आहे?
४. कोणत्या दशकात नागरीकरण सर्वाधिक होते?
५. कोणत्या दशकात नागरीकरणाची वाढ अतिशय कमी होती ?
६. आलेखाचा कल पाहता भारतातील नागरीकरणाबाबत तुम्ही कोणता निष्कर्ष काढाल?

**प्र. ७ . सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतीही दोन)** ८

१. क्षेत्रभेटीदरम्यान कचऱ्याचे व्यवस्थापन कसे कराल?
२. ब्राझील वन्यजीवनाची विविधता स्पष्ट करा.
३. ब्राझील व भारत या देशांची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करा.

### कृतीपत्रिका सोडविताना पुढील गोष्टीही लक्षात ठेवा

- भूगोलाच्या कृतीपत्रिकेमध्ये वस्तुनिष्ठ, लघुत्तरी, दीर्घोत्तरी, कौशल्यांवर आधारित असे विविध प्रश्न प्रकार असतात.
- वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहिताना शक्यतो प्रश्नाचे क्रमांक टाकून पूर्ण विधाने लिहिल्यास चांगले दिसेल.
- लघुत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहिताना ती मुद्देसूद लिहावीत. मुद्द्यांना योग्य क्रमांक द्यावा.
- दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहिताना मुद्दे उपमुद्दे योग्य पद्धतीने मांडावेत. मुद्द्यांना योग्य क्रमांक द्यावे. शक्य झाल्यास आकृती नकाशे यांचा वापर करावा. भूगोलामध्ये स्टेनसिलचा वापर करण्यास परवानगी असते. त्यामुळे ब्राझील आणि भारत यांचे स्टेन्सिल सोबत घेऊन जाऊ शकता.
- नकाशा वाचन करताना नीट काळजीपूर्वक निरीक्षण करून नंतरच त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा. उत्तरे लिहिताना शक्यतो पूर्ण वाक्यात दिल्यास छान वाटेल.
- नकाशा भरताना सूची तयार करणे अतिशय महत्त्वाचे आहे. नकाशाच्या खाली दिलेल्या ठिकाणी सूची तयार करावी. नकाशा शक्यतो पेन्सिलच्या साह्याने भरावा. योग्य घटक योग्य ठिकाणी दाखवावेत. रंगीत पेन्सिलचा वापर करण्यास हरकत नाही परंतु रंगसंगती योग्य असेल याची काळजी घ्यावी.
- आलेख काढताना शक्यतो ठळक पेन्सिल वापरावी. रेषाले किंवा स्तंभालेख यापैकी नेमका आलेख कोणता काढायचा आहे हे नीट लक्ष ठेवावे आणि त्यानुसार आलेख काढावा. आलेख काढताना आलेखाचे शीर्षक, प्रमाण, य अक्षावरील आणि क्ष अक्षावरील घटक याची अचूक मांडणी असावी.
- महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवा की भूगोलातील नकाशा भरा आणि आलेख काढून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा. हे प्रश्न स्वतंत्र नकाशा आणि आलेख पुरवणीवरच लिहिणे अपेक्षित आहे.

**राहुल बळवंत प्रभू** (सहाय्यक शिक्षक)
प्राचार्य जनार्दन लक्ष्मण शिर्सेकर शिक्षण संस्थेचे महात्मा गांधी विद्यामंदिर वांद्रे, पूर्व.

उद्याचा विषय : एस.एस.सी. मार्गदर्शन - आठवणीतले परीक्षेचे दिवस

समन्वयक - सी. डी. वडके

# मानसिक आरोग्य उपचारासाठी ऑनलाइन शोधांमध्ये वाढ

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** भारतात मानसिक आरोग्य सहाय्य सेवा घेण्यासाठी ऑनलाइन शोध घेण्याच्या प्रकारात वाढ होत आहे. यामध्ये कोलकात्यात समुपदेशन व थेरपी केंद्रांसाठीच्या शोधात १०२ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे या सेवांबाबत असलेली रुची दुप्पटीपेक्षा अधिक होत असल्याचे 'जस्ट डायल लिमिटेड'च्या ताज्या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

फेब्रुवारी २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीतील वर्षानुवर्षेच्या आकडेवारीची मागील वर्षाशी तुलना केली असता, महानगरांबरोबरच शहरी केंद्रांमध्येही समुपदेशन, थेरपी आणि मानसोपचार सेवांबाबतची रुची वाढल्याचे दिसून आले. ताज्या अहवालानुसार, राष्ट्रीय पातळीवर 'समुपदेशन सेवा' शोधण्यात सर्वाधिक १४ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. त्यानंतर 'मानसोपचार सेवा' शोधण्यात ८ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. 'समुपदेशन आणि थेरपी केंद्रां'साठीच्या शोधांमध्येही ५ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे.

मानसिक आरोग्य सहाय्य घेण्याच्या पर्यायांचा शोधांमध्ये लक्षणीय वाढ होत असल्याचे स्पष्ट होत असल्याचे जस्ट डायल लिमिटेडच्या या अहवालातून स्पष्ट होत आहे.







# शिवाजी महाराजांचे कर्तृत्व विश्वाला प्रेरणादायी

## शिवव्याख्याते राहुल गिरी यांचे प्रतिपादन

**नागपूर :** जगाच्या पाठीवर अनेक राजांनी माणसांना गुलाम बनवून त्यांच्यावर राज्य केले. मात्र, छत्रपती शिवाजी महाराज युगपुरुष होते, ज्यांनी गुलामांना माणूस बनवून मुक्तीचा श्वास घ्यायला शिकवले. आज आपण महापुरुषांना जातीच्या चौकटीत अडकवतोय, परंतु महाराजांचे कर्तृत्व कोणत्याही एका जातीपुरते किंवा मातीपुरते मर्यादित नसून ते संपूर्ण विश्वाला प्रेरणा देणारे आहे, असे प्रतिपादन शिवव्याख्याते राहुल गिरी यांनी केले.

महावितरण, महापारेषण आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या व्याख्यानात राहुल गिरी बोलत होते. अध्यक्षस्थानी महापारेषणचे मुख्य अभियंता सतीश अणे तर विशेष अतिथी म्हणून महावितरणचे मुख्य अभियंता दिलीप दोडके उपस्थित होते. नागपुरातील प्रकाश भवन येथे झालेल्या कार्यक्रमात गिरी म्हणाले, शिवराय हे केवळ महाराष्ट्राचे नसून अखंड हिंदुस्तानाचे स्फूर्तिस्थान आहे. ते सर्व जाती-धर्माच्या लोकांना एका ताटात घेऊन जेवणारे आणि परधर्माचा आदर राखणारे जाणते राजा ठरले. केवळ युद्धकौशल्यच नव्हे, तर शेती मोजण्याचे तंत्र विकसित करणारे, भारतीय आरमाराचे जनक आणि मानवी हक्कांचे रक्षण करणारे ते एक द्रष्टे प्रशासक होते, असेही गिरी म्हणाले. प्रास्ताविक नरेंद्र तिजारे यांनी तर संचालन अमित पेढेकर यांनी केले. याप्रसंगी सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, कार्यकारी अभियंता संजय श्रृंगारे, हेमराज ढोके, धम्मदिप फुलझेले, स्वप्नील गोतमारे, राहुल जिवतोडे, चंदन तल्लरवार, नरेंद्र धवड आदी उपस्थिती होती.

# 'आयआयएम'च्या विद्यार्थ्यांची मूक निदर्शने

## बाहेर पार्टी केल्यामुळे संस्थेत प्रवेश देण्यास नकार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** भारतीय व्यवस्थापन संस्था (नागपूर) येथे संस्थेची परवानगी न घेता बाहेर पूल पार्टी केल्यामुळे विद्यार्थ्यांना दुसऱ्या दिवशी संस्थेत प्रवेश देण्यास नकार देण्यात आला. त्यामुळे आयआयएम नागपूरच्या विद्यार्थ्यांनी मंगळवारी मूक आंदोलन केले.

मिळालेल्या माहितीनुसार, आयआयएम, नागपूरच्या एमबीए अभ्यासक्रमाचे प्रथम आणि द्वितीय वर्षाचे विद्यार्थी शनिवारी, १४ फेब्रुवारी रोजी एका रिसॉर्टवर 'पूल पार्टी' करण्याकरिता गेले होते. सुमारे ७० ते ७५ विद्यार्थी आणि विद्यार्थिनी या पार्टीत सहभागी होते. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना सेंड ऑफ देण्यासाठी ही पार्टी आयोजित केली होती. रात्रभर बाहेर राहिल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी ते संस्थेत परतले असता त्यांना संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी प्रवेश करण्यापासून रोखले असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. दरम्यान, सोमवारी रात्री यापैकी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना आयआयएम प्रशासनाने ई-मेल पाठवून शिस्तभंगाची कारवाई म्हणून त्यांना मिड टर्म परीक्षा देता येणार नसल्याचे कळविले. प्रथम वर्षाची ही परीक्षा मंगळवार, २४ फेब्रुवारीपासून सुरू होणार होती. त्याचप्रमाणे, द्वितीय वर्षाची अंतिम परीक्षा २५ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे हे अंतिम सत्र असल्याने आपल्याला परीक्षेपासून रोखल्यास आपल्या करियरचे नुकसान होऊ शकते, अशी भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली. त्यातून, दोन्ही वर्षांच्या सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी संस्थेत मूक निदर्शने सुरू केली. परीक्षेवर बहिष्कार टाकण्याचा इशाराही विद्यार्थ्यांनी दिला.

अखेर, संस्था प्रशासनाने ही कारवाई पार्टीकरिता गेलेल्या केवळ प्रथम वर्षाच्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींवरच केल्याचे स्पष्ट केले. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना परीक्षा देता येणार आहे. प्रथम वर्षाच्या ज्या विद्यार्थ्यांवर कारवाई केली गेली, त्यांची मिड टर्म परीक्षा पुन्हा कधीतरी घेतली जाईल, असेही आयआयएमने स्पष्ट केले. संस्था प्रशासनाच्या या भूमिकेनंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेतले.

# भाजपच्या प्रदेश कार्यकारिणीवर फुके, भेंडे, डेहनकर, लखानी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नव्या कार्यकारिणीची घोषणा केली आहे. त्यांनी सर्वच विभागाला स्थान दिले असून नागपूर शहरातील आमदार परिणय फुके, माजी महापौर अर्चना डेहनकर, संजय भेंडे, उद्योजक अरुण लखानी यांच्यावर विविध जबाबदारी सोपविली.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी रात्री नव्या प्रदेश कार्यकारिणीची घोषणा केली. यात नागपुरातील संजय भेंडे यांना उपाध्यक्षपदाची जबाबदारी दिली. आमदार परिणय फुके यांची चिटणीस म्हणून नियुक्ती करण्यात आली. उद्योजक अरुण लखानी यांना सहकोषाध्यक्ष करण्यात आले आहे.

माजी महापौर अर्चना डेहनकर यांचीही चिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली.

माजी महापौर अर्चना डेहनकर यांनी यांचे पती विनायक यांनी पक्षाकडे महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी मागितली होती. परंतु त्यांना उमेदवारी नाकारण्यात आली होती. त्यामुळे त्यांनी बंडखोरी केली. पक्षाने त्यांना निलंबित केले आहे.

आता त्यांच्या पत्नी अर्चना डेहनकर यांना प्रदेश कार्यकारिणीत जबाबदारी देण्यात आली. याशिवाय विदर्भातील माजी खासदार रामदास तडस, प्रवीण पोटे यांनाही उपाध्यक्ष करण्यात आले.

सरचिटणीसपदी संजय कुटे व अनुसूचित जमाती आघाडी प्रदेशाध्यक्षपदी देवराव होळी यांची नियुक्ती करण्यात आली.

# रेल्वे डब्यात साप?

**नागपूर :** मुंबईहून विशाखापट्टणमकडे निघालेल्या रेल्वेगाडीत मंगळवारी एका डब्यात साप आढळल्याची माहिती मिळाल्याने काही काळ खळबळ उडाली. गाडी नागपूरकडे येत असताना ही माहिती रेल्वे प्रशासनाला देण्यात आली. त्यानंतर नागपूर स्थानकावर संबंधित डब्याची तपासणी करण्यात आली; मात्र सापाचा ठावठिकाणा लागला नाही.

सकाळच्या सुमारास एका प्रवाशाने डब्यातील स्वच्छतागृहात सापासारखा प्राणी दिसल्याचा संशय व्यक्त केला. तातडीने ही माहिती रेल्वे कर्मचाऱ्यांना देण्यात आली. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संबंधित डब्यात सतर्कता बाळगण्यात आली. नागपूर स्थानकावर गाडी येण्यापूर्वीच आरपीएफ व स्थानिक वन्यजीव तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. मात्र, साप आढळून आला नाही.

# चार तृतीयपंथीयांना अटक

**नागपूर :** शहरातील जरीपटका परिसरातील बंगाली पंजा भागात तृतीयपंथीयांनी खेळत असलेल्या चार महिन्यांच्या मुलाला उचलून कडेवर घेतले. त्यामुळे मातेने आरडाओरड केली. मुले पळवणारी टोळी घुसल्याची आरडाओरड सुरू झाल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. पोलिसांनी चार जणांना ताब्यात घेतले. मोहलदुल मफिजुद्दीन मलिक, सबुरली इराम अली गेन, कुर्बान अली खान, शरबुद्दीन शेख अशी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या चौघांची नावे आहेत. हे चौघेही तृतीयपंथीय आहेत. हे चौघेही सध्या बंगाली पंजा भागात राहतात. ही घटना सोमवारी दुपारी घडली.

# वाघोडा वसाहतीत श्वानांच्या चाव्यामुळे दोन हरीण जखमी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील वेकोलीच्या वाघोडा वसाहतीत श्वानाच्या हल्ल्यात एक हरीण गंभीर जखमी झाले. या घटनेची माहिती मिळताच काही सेवाभावी तरुणांनी कुत्र्यांना पळवून लावत हरिणाचे प्राण वाचवले. वन्यजीवप्रेमी अभिषेकसिंह गहरवार आणि निखील पोटभरे यांना घटनेची माहिती दिली. घटनास्थळी पोहचून दोघांनीही तत्काळ मदतकार्य सुरू केले. तसेच या घटनेची माहिती कळेश्वरचे वनपरिक्षेत्र अधरिकारी शिरपूरकर व ट्रान्झिट ट्रिटमेंट केंद्राला दिली.

वेकोलीची वसाहत कोणत्या वनक्षेत्रात येते याबाबत सुरुवातीला गोंधळ निर्माण झाला होता. मात्र, वन्यजीव बचावासाठी खापा आणि कळमेश्वर येथून पथके बचाव कार्यासाठी रवाना झाली. अभिषेकसिंह गहरवार आणि निखील पोटभरे यांनी वनखात्याला सहकार्य करत हरिणाला सुरक्षितपणे जेरबंद केले. यानंतर त्याला सेमिनरी हिल्सवरील ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटरमध्ये उपचारासाठी पाठवण्यात आले.

या संपूर्ण बचाव कार्यात वेकोली वसाहतीतील श्याम पासवान, महेंद्रनाथ उपाध्याय, शुभम कडसाईत, नीलेश कडसाईत, प्रिन्स चौहान यांच्यासह इतरही नागरिकांनी सहकार्य केले. दुसऱ्या घटनेत, सोमवारी रात्री उशिरा व्हीएनआयटी परिसरातील वसाहतीत श्वानाच्या हल्ल्यात जखमी झालेल्या हरिणाला वाचवण्यात आले. व्हीएनआयटीच्या सुरक्षा प्रमुखांनी वाइल्डलाईफ वेल्फेअर सोसायटीला ही माहिती दिली. मीरा डाभी यांच्या अंगणात जखमी हरिण पडलेले होते.

सोसायटीचे गौरांग वाईकर, भूषण माहूले, रोहित तुमनापातकर, आकाश सोनकुले, प्रतीक्षा गणवीर घटनास्थळी पोहोचले. त्यांनी सेमिनरी हिल्सवरील ट्रान्झिट ट्रिटमेंट केंद्राला ही माहिती दिली. केंद्राचे कर्मचारी बंडू मगर, स्वप्नील भुरे, आशीष महल्ले घटनास्थळी पोहोचले.

यावेळी बजाजनगर पोलीस ठाण्याचे नितीन बांते, पंकज राठोड यांनीही सहकार्य केले. जखमी हरिणाला सुरक्षित पकडून उपचारासाठी ट्रान्झिट ट्रिटमेंट केंद्रात नेण्यात आले.






## संक्षिप्त

### हेलिकॉप्टरला अपघात, सर्व सात सुखरूप

**श्रीविजयपुरम :** अंदमान आणि निकोबार बेटावर पवनहंस कंपनीचे हेलिकॉप्टर समुद्रात कोसळले, त्यातील सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुखरूप आहेत. या हेलिकॉप्टरमध्ये दोन कर्मचाऱ्यांसह एकूण सातजण होते. त्या सर्वांची सुटका केल्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या हेलिकॉप्टरने रंगत येथून उड्डाण केले, ते मायाबंदर हेलिपॅडवर उतरण्याच्या आधी केवळ ३०० मीटर अलीकडे समुद्रात कोसळले. ही घटना सकाळी ९.३० वाजता घडली.

### पीटर मँडलसन यांना जामीन

**लंडन :** ब्रिटनचे अमेरिकेतील माजी राजदूत पीटर मँडलसन यांना जामिनावर सोडण्यात आले आहे. अमेरिकेतील बाललैंगिक गुन्हेगार जेफ्री एप्स्टिनशी संबंधांवरून आणि गैरवर्तणुकीच्या आरोपावरून त्यांना अटक करण्यात आली होती. ब्रिटनमधील पोलिसांनी ही माहिती दिली. महानगर पोलीस प्रवक्त्यांनी निवेदनात म्हटले आहे, की सरकारी कार्यालयात गैरवर्तणुकीच्या आरोपावरून अटक करण्यात आलेल्यांना जामिनावर सोडण्यात आले आहे.

# युवक काँग्रेसच्या अध्यक्षांना अटक

## ‘एआय परिषदे’त दंगलीचा प्रयत्न केल्याचा आरोप

**पीटीआय, नवी दिल्ली**

**दिल्लीमध्ये गेल्या** आठवड्यात आयोजित करण्यात आलेल्या ‘इंडिया एआय इम्पॅक्ट समिट’मध्ये २० फेब्रुवारीला केलेल्या आंदोलनाबद्दल दिल्ली पोलिसांनी मंगळवारी युवा काँग्रेसचे अध्यक्ष उदय भानू चिब यांच्यासह संघटनेच्या एकूण आठ सदस्यांना अटक केली. पोलिसांनी त्यांना सोमवारी चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. त्यांना मंगळवारी न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायाधीशांनी त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

अटक केल्यानंतर दिल्ली पोलिसांनी चिब आणि इतरांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १९१(१) (दंगल करणे), १९२ (दंगल भडकावण्यासाठी जाणीवपूर्वक प्रक्षोभक कृत्ये करणे), कलम १९६ (भिन्न गटांमध्ये शत्रुत्वाला प्रोत्साहन देणे), कलम १९७ (राष्ट्रीय ऐक्याला बाधा आणण्याचा प्रयत्न करणे) या कलमांअंतर्गत आणखी गुन्हे नोंदवले आहेत. ही निदर्शने बेकायदा असल्याचे पोलिसांनी बजावलेल्या अटक मेमोमध्ये नमूद करण्यात आले आहे.



मला युवा काँग्रेसच्या शूर सहकाऱ्यांचा अभिमान वाटतो. अमेरिकेबरोबरच्या व्यापार करारात देशाच्या हितसंबंधांशी तडजोड करण्यात आली आहे. या तडजोडीमुळे आपले शेतकरी आणि वस्त्रोद्योगाचे नुकसान होईल, तसेच आपला डेटा अमेरिकेकडे सोपवला जाईल. हे सत्य देशासमोर ठेवल्यामुळे उदय भानू चिब आणि इतरांना अटक करण्यात आली. काँग्रेस पक्ष त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. – **राहुल गांधी,** नेते, काँग्रेस

### लोकशाहीची हत्या

चिब यांच्या अटकेवर काँग्रेसने संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली असून ही देशात लोकशाहीची हत्या आहे, असे पक्षाने म्हटले आहे. तर, “यातून सरकारची हुकूमशाही प्रवृत्ती आणि भ्याडपणा दिसून येतो,” अशी टीका पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी ‘एक्स’वर पोस्ट लिहून केली. लोकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सत्येबद्दल अस्वस्थ करणारे सत्य समजले आहे, त्यापासून लक्ष विचलित करण्यासाठी पंतप्रधान उतावीळ आहेत, असा आरोप काँग्रेसने केला.

### निदर्शनांमध्ये लाजिरवाणे काहीही नाही!

जम्मू : उदय भानू चिब यांची आई रजनीबाला यांनी या अटकेचा निषेध केला आहे. ही अटक अन्याय्य आणि राजकीय हेतूने प्रेरित आहे असे त्या म्हणाल्या. यातून सरकारची एकाधिकारशाही आणि अरेरावी दिसून येते अशी टीका त्यांनी केली. लोकांच्या हिताच्या मुद्द्यांवर संघर्ष करणे आणि देशाच्या युवकांसाठी लढा देणे हा गुन्हा नाही, असे त्या म्हणाल्या.

# केरळचे नाव आता ‘केरलम’

## राज्य सरकारच्या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता

**पीटीआय, नवी दिल्ली**

**केरळ राज्याचे** नामांतर ‘केरलम’ करण्याच्या राज्य सरकारच्या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंगळवारी मान्यता दिली, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली ‘सेवा तीर्थ’ येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

पंतप्रधान कार्यालयाचे नवे संकुल असलेल्या ‘सेवा तीर्थ’ येथे मंत्रिमंडळाची पहिली बैठक झाली. केरळ विधानसभेने २४ जून २०२४ रोजी केरळचे नाव ‘केरलम’ असे बदलण्याचा ठराव मंजूर केला होता. त्यानंतर त्यासंबंधीचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवला होता. केंद्रीय मंत्रिमंडळानेही या प्रस्तावाला मान्यता दिली.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर नावात बदल केलेले विधेयक केरळ राज्य विधानसभेकडे पाठवण्यात येणार आहे. केरळ विधानसभेचे मत प्राप्त झाल्यानंतर केंद्र सरकार केरळचे नाव ‘केरलम’ असे बदलण्यासाठीचे विधेयक संसदेत सादर करण्यासाठी राष्ट्रपतींची शिफारस प्राप्त करेल, असे एका प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे.

### तीन रेल्वे प्रकल्पांना मंजुरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आर्थिक व्यवहार समितीने मंगळवारी रेल्वे मंत्रालयाच्या तीन प्रकल्पांना मंजुरी दिली. या तीन प्रकल्पांमध्ये गोंदिया-जबलपूर विभागाचे दुहेरीकरण आणि पुंडरख-किउल आणि गम्हरिया-चांडिल विभागांमधील तिसऱ्या आणि चौथ्या मार्गाचे बांधकाम यांचा समावेश आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, बिहार आणि झारखंडमधील आठ जिल्ह्यांना जोडणाऱ्या या प्रकल्पांमुळे भारतीय रेल्वेचे सध्याचे जाळे सुमारे ३०७ किलोमीटरने वाढणार असल्याचे सरकारने सांगितले. यासाठी ९,०७२ कोटी रुपये खर्च आहे.

### इतर निर्णय

- श्रीनगर विमानतळावरील नागरी परिसराच्या विकासासाठी १,६७७ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी. काश्मीर खोऱ्यातील विमान वाहतूक पायाभूत सुविधा आणि दळणवळण मजबूत करण्यासाठी नागरी परिसराचा विस्तार हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.
- भांडवल-केंद्रित ट्रान्समिशन प्रकल्पांसाठी बोली लावण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील पॉवरग्रीडची इक्विटी गुंतवणुकीची मर्यादा ५,००० कोटी रुपयांवरून ७,५०० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव मंजूर.
- खनिज क्षेत्रातील सहकार्यासाठी जर्मनी आणि कॅनडाबरोबर लवकरच करार

### केरळी, केरळन या शब्दांचे काय?- थरूर

केरळचे नाव बदलण्यावरून



काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांनी विनोदी मत मांडले. “नवीन केरलममधील रहिवाशांना काय म्हणायचे ? केरळी आणि केरळन या शब्दांचे आता काय करायचे ”असे प्रश्न त्यांनी विचारले. मंत्रिमंडळाच्या निर्णयापूर्वी थरूर म्हणाले, “आपल्यातील अँग्लोफोन्ससाठी छोटीशी भाषिक अडचण आहे. नवीन ‘केरळम’च्या रहिवाशांसाठी ‘केरळी’ आणि ‘केरळ’ह्न या शब्दांचे आता काय होणार ? ‘केरळमाइट’ हा शब्द सूक्ष्मजंतूसारखा वाटतो आणि ‘केरळमियन’ हा दुर्मिळ पृथ्वी खनिजासारखा वाटतो...!”

# नदी प्रदूषणाबाबतचा ‘सू मोटो’ खटला रद्द

## प्रकरण हरित लवादाकडे हस्तांतरित

**पीटीआय, नवी दिल्ली**

**प्रदूषणमुक्त पाण्याचा** अधिकार हा मूलभूत अधिकार आहे, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी नोंदवले. त्याबरोबरच प्रदूषित नद्यांच्या उपाययोजनेबबातचा २०२१चा स्वतःहून दाखल केलेला खटला (सू मोटो) न्यायालयाने बंद केला आणि राष्ट्रीय हरित लवादाच्या (एनजीटी) प्रमुख खंडपीठाकडे हे प्रकरण सोपवले.

प्रदूषित नद्यांबाबत सर्वोच्च न्यायालयाने १३ जानेवारी २०२१ रोजी स्वतःहून याचिका दाखल करून घेतली होती. मात्र या खटल्यावर न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. नवी दिल्लीतील राष्ट्रीय हरित लवादाकडे अशा प्रकारच्या खटल्याची सुनावणी आधीपासूनच सुरू होती. ‘‘सर्व प्रदूषित नद्यांकडे लक्ष देणे शक्य आहे का? आपल्याला हेदेखील पहावे लागेल की आपण एकत्र प्रकरणांची दखल घेतो. असे अनेक मुद्दे का असावेत,’’ असे सरन्यायाधीश न्या. सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने म्हटले.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) वतीने अतिरिक्त महान्यायअभिकर्ता ऐश्वर्या भाटी यांनी ‘एनजीटी’समोर अशाच प्रकारच्या प्रकरणाच्या प्रलंबिततेचा संदर्भ दिला.

# बंगालमध्ये ‘एसआयआर’साठी परराज्यातील न्यायिक अधिकारी

## सर्वोच्च न्यायालयाची परवानगी

**पीटीआय, नवी दिल्ली**

**पश्चिम बंगालमध्ये** सुरू असलेल्या मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणीदरम्यान (एसआयआर) लाखो दाव्यांच्या पडताळणीसाठी झारखंड आणि ओडिशामधील न्यायिक अधिकाऱ्यांना तैनात करण्यास सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी परवानगी दिली. न्यायालयाच्या निकालानुसार, पश्चिम बंगालमध्ये राज्यातील दिवाणी न्यायाधीश, अतिरिक्त २५० जिल्हा न्यायाधीश हेही तैनात केले जाणार आहेत.

बंगालमध्ये ‘एसआयआर’नंतर मतदारयाद्यांतून वगळण्यात आलेल्या मतदारांसंबंधी ८० लाख दावे आणि हरकती दाखल करण्यात आले आहेत. कलकत्ता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश सुजॉय पॉल यांनी २२ फेब्रुवारीला सर्वोच्च न्यायालयाला पत्र लिहून कळवले होते की, ‘‘२५० जिल्हा न्यायाधीशांच्या तैनातीनंतही दावे आणि हरकती हाताळण्यासाठी ८० दिवस लागतील.’’

सरन्यायाधीश न्या. सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने या पत्राची नोंद घेतली. मंगळवारी दिलेल्या निकालानुसार, पडताळणीसाठी वरिष्ठ आणि कनिष्ठ विभागांमधील तैनात करावयाच्या दिवाणी न्यायाधीशांना किमान तीन वर्षांचा अनुभव असणे अनिवार्य आहे.

# १४ वर्षांवरील मुलींसाठी ‘एचपीव्ही’ लसीकरण

**पीटीआय, नवी दिल्ली**

**देशातील १४** वर्षे आणि त्यापुढच्या वयोगटातील मुलींसाठी ‘एचपीव्ही’ म्हणजेच ‘ह्युमन पॅपिलोमाव्हायरस’ लस देण्यास सुरुवात केली जाणार असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली. या लसीकरण कार्यक्रमांतर्गत गार्डासिल हे इंजेक्शन मोफत दिले जाणार आहे.

या लसीकरणामुळे गर्भाशयाच्या मुखास कर्करोग होण्यास कारणीभूत ठरणाऱ्या ‘एचपीव्ही’ प्रकार १६ आणि १८ यासह ६ आणि ११ या प्रकारांपासून या लसीकरणाच्या माध्यमातून संरक्षण मिळणार आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या शिफारशीनुसार ही मोहीम राबवण्यात येणार आहे. ही विशेष लसीकरण मोहीम आहे.

बाजारपेठेत गार्डासिल-४ ही लस उपलब्ध असून त्याची किंमत ३,९२७ रुपये आहे. हा डोस १५ वर्षांखालील मुलींना दिला जातो. या लसीचे तीन डोस घ्यावे लागतात. त्याचे उत्पादन एमएसडी इंडिया करते. वैज्ञानिक पुराव्यानुसार १४ वर्षे आणि त्यापुढील वयाच्या मुलींना याचा एकच डोस दीर्घकाळ संरक्षण देतो. हे लसीकरण ऐच्छिक आणि मोफत आहे. त्यामुळे भविष्यात गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. यामुळे ‘एचपीव्ही’ लस देणाऱ्या १६० देशांच्या यादीत भारताचा समावेश होईल.

### ‘केरळ स्टोरी २’मध्ये चुकीचे चित्रण!

**कोची :** ‘द केरळ स्टोरी २ - गोज बियाँड’ या चित्रपटात सर्व समुदाय सौहार्दाने राहत असलेल्या केरळसारख्या राज्याचे अतिशय चुकीचे चित्रण करण्यात आले आहे, असे निरीक्षण केरळ उच्च न्यायालयाने मंगळवारी नोंदवले. राज्याचे नाव वापरणे आणि चित्रपट सत्यावर आधारित असल्याचा दावा करणे यामुळे राज्यात धार्मिक तणाव वाढू शकतो, अशी टिप्पणी न्या. बेचू कुरियन थॉमस यांनी केली.

‘द केरळ स्टोरी २ - गोज बियाँड’ या चित्रपटाला प्रदर्शनासाठी देण्यात आलेले प्रमाणपत्र रद्द करावे अशी मागणी करणाऱ्या तीन भिन्न याचिकांवर उच्च न्यायालयात मंगळवारी सुनावणी झाली. चित्रपटाच्या निर्मात्यांनी त्याचे टीझर मागे घेण्याची तयारी दाखवली. त्यावर, याप्रकरणी बुधवारीही पुन्हा सुनावणी होईल, असे न्यायालयाने सांगितले.

# युक्रेन-रशिया चार वर्षांनंतरही लढण्यावर ठाम

## बारा युरोपीय नेते कीव्हमध्ये

**एपी, कीव्ह**

‘**युक्रेनबरोबरच्या युद्धात** रशिया विजयी झाला नसून, युक्रेनचा निर्धारही ढळलेला नाही,’ अशा शब्दांत युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी युक्रेनप्रति आपली कटिबद्धता व्यक्त केली. रशियाबरोबर युद्ध सुरू होऊन चार वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त युक्रेनला पाठिंबा दर्शविण्यासाठी युरोपातील १२ नेते युक्रेनमध्ये उपस्थित होते. रशियानेही उद्दिष्टे पूर्ण होईपर्यंत लढत राहू, असा निर्धार व्यक्त केला आहे.

दरम्यान, युक्रेनला पाठिंबा देण्यासाठी ‘युरोपीय काउन्सिल’चे अध्यक्ष अँटोनिओ कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सूला वॉन दर लिएन यांच्यासह आठ देशांचे प्रमुख कीव्हमध्ये दाखल झाले आहेत.

युक्रेनचा अढळ निर्धार व्यक्त करताना झेलेन्स्की म्हणाले, ‘‘रशियाच्या मोठ्या आणि अधिक सुसज्ज लष्करापुढे युक्रेन ठामपणे उभा आहे. गेल्या वर्षभरात युक्रेनचा केवळ ०.७९ टक्के भूभाग रशियाला बळकावता आला आहे. चार वर्षांनंतरची परिस्थिती पाहिली, तर आम्ही नक्कीच म्हणू शकतो, की आम्ही आमच्या स्वातंत्र्याचे रक्षण केले आहे. आमचे राष्ट्रीयत्व आम्ही गमावलेले नाही. रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांना त्यांचे उद्दिष्ट साध्य करता आलेले नाही. हे युद्ध रशिया जिंकलेला नाही.’’

### ‘उद्दिष्ट अद्याप अपूर्ण’

रशियाच्या अध्यक्षांचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनीही युक्रेनबरोबरील युद्ध सुरु ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. युक्रेनबरोबरील युद्धाची उद्दिष्टे अद्याप पूर्ण झाली नसून, ती पूर्ण होईपर्यंत युद्ध सुरू राहील, असे ते म्हणाले.

### ‘आयडीएफसी’कडून हरियाणा सरकारला ५९० कोटी परत

**चंडीगड :** आयडीएफसी फर्स्ट बँक प्रकरणात सर्व ५५६ कोटी रुपयांची वसुली केल्याची माहिती हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांनी विधानसभेत दिली. त्यात २२ कोटी व्याजाचा समावेश असून, २४ तासांत ही कारवाई केल्याची माहिती त्यांनी दिली.

हरयाणा सरकारच्या खात्यातील ५९० कोटी रुपयांच्या गैरव्यवहार बँकेच्या कर्मचाऱ्यांनी केल्याची माहिती बँकेनेच उघड केली होती. चंडीगडमधील शाखेत हा गैरप्रकार झाल्याचे बँकेकडूनच स्पष्ट करण्यात आल्याचे सैनी यांनी सभागृहात नमूद केले. चार चे पाच कर्मचाऱ्यांनी हा गैरप्रकार केला. त्यात जे दोषी असतील त्यांना शिक्षा केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. राज्याच्या लाचलुचपच प्रतिबंधक विभागाने सोमवारी याची सखोल चौकशी केली. तसेच या संदर्भात अर्थसचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमल्याचे सैनी यांनी नमूद केले.


## अनक्लेम मनी: तुमच्या हक्काचा पैसा मिळवा

ADVERTORIAL

सगळ्यात आधी लाइफ इन्शुरन्स

**इन्शुरस अवेअरनेस कमिटी (आयएसी-लाइफ)चे अध्यक्ष कमलेश राव आणि इन्शुरन्स अवेअरनेस कमिटी (आयएसी-लाइफ)चे सदस्य पराग राजा यांचा लेख –**

कल्पना करा की, तुमच्या शेजारी साधे कुटुंब राहत आहे. त्या सामान्य भारतीय कुटुंबामध्ये वयाच्या तिशीमध्ये असलेले पती-पत्नी आणि त्यांची शाळेत जाणारी दोन मुले आहेत. कर्तव्यदक्ष पालक व पती असलेला पुरुष आयुर्विमा पॉलिसी काढतो आणि त्यामध्ये आपल्या पत्नीला व मुलांना वारसदार (नॉमिनी) म्हणून नियुक्त करतो. त्याला खात्री वाटते की, आपल्या अनुपस्थितीत देखील कुटुंबाची स्वप्ने व महत्त्वाकांक्षांमध्ये कोणताच अडथळा येणार नाही. कुटुंबाच्या भविष्याबाबत ही मोठी जबाबादारी पार पाडल्यानंतर तो पत्नीला पॉलिसीबद्दल सांगायचे विसरतो. रोजच्या धावपळीच्या आयुष्यात, 'माझा इतक्यात कुठे मृत्यू होणार आहे, सांगू नंतर' असे स्वतः शीच म्हणत तो पॉलिसीबाबत सांगणे पुढे ढकलतो. एक दिवस, अचानक त्याचे निधन होते. कुटुंब दुःखात बुडून जाते. या धक्क्यातून त्याची पत्नी सावरण्यापूर्वी तिच्यावर घर चालवण्याचे आणि आर्थिक जबाबदाऱ्यांचे संकट ओढावते. दरम्यान, तिच्या पतीने नेमक्या याच दिवसासाठी तजवीज करून ठेवलेल्या पैशांबाबत तिला माहीत नसते, ज्यामुळे त्या पैशांचे क्लेम प्रतीक्षेत राहिले.

दरवर्षी, वर उल्लेख केलेल्या कुटुंबांप्रमाणे भारतातील अनेक कुटुंबांचे हजारो कोटी रुपये आयुर्विमा कंपन्या व सरकारद्वारे सुरक्षित ठेवले जातात, ज्यामुळे ही कुटुंबं अनेक वर्षांनंतर देखील क्लेम करू शकतात. ही तुमची बचत, गुंतवणूक आणि विम्याचे फायदे आहेत, जेथे फक्त योग्य वारसदारांनी त्यावर दावा करण्याची वाट पाहत आहेत. अनेक प्रकरणांमध्ये या रकमेचे क्लेम होत नाही, ज्याचा अर्थ व्यक्तींना त्या पैशांची गरज नाही असे नाही, तर मृत व्यक्तीच्या किंवा आपल्या प्रियजनांच्या नावे अशा पैशांची बचत केलेली आहे, ज्याबाबत कुटुंबाना माहीत नसते. पण, आनंदाची बातमी म्हणजे तुमच्या प्रियजनांसाठी क्लेम न केलेली विमा रक्कम मिळवून देण्यासाठी विविध सोयीस्कर मार्ग उपलब्ध आहेत आणि आर्थिक क्षेत्र यासाठी मदत करण्यास सदैव तत्पर आहे. तसेच, देशातील आर्थिक परिसंस्था या विमा रक्कमेचे संरक्षण करते आणि तो त्याच्या मूळ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करते. 'तुमचा पैसा, तुमचा हक्क' यासारख्या उपक्रमांच्या माध्यमातून ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान 'उदगम', 'विमा भरोसा' आणि 'मित्र' (म्युच्युअल फंड इन्व्हेस्टमेंट ट्रेसिंग ॲण्ड रिट्रायव्हल असिस्टण्ट) यांसारख्या पोर्टल्सच्या माध्यमातून जवळपास २,००० कोटी रुपयांची क्लेम न केलेली आर्थिक मालमत्ता परत करण्यात आली आहे.

**'अनक्लेम मनी' म्हणजे काय ?**

अनक्लेम मनी म्हणजे असा निधी किंवा रक्कम, जी संबंधित व्यक्तीला देणे बंधनकारक आहे, पण काही कारणांमुळे अद्याप दिली गेलेली नाही. संपर्क होऊ न शकणे, तपशिलांमध्ये बदल होणे, खाती चालू नसणे किंवा कायदेशीर मालक किंवा त्यांच्या कुटुंबाला अशा पैशांबद्दल माहिती नसणे, यामुळे हा पैसा क्लेम न करता पडून राहतो. हे निधी पुढीलप्रमाणे असू शकतातः

- बंद आणि निष्क्रिय बँक ठेवी
- विम्याचे हक्क न सांगितलेले परतावे
- देय न दिलेल्या म्युच्युअल फंडाचे किंवा लाभांश
- सरकारी निधीत हस्तांतरित केलेले क्लेम न करण्यात आलेले शेअर्स आणि लाभांश

**क्लेम न केलेले विम्याचे पैसे : २५ वर्षांपर्यंत सुरक्षित**

एकूण १,००,००० कोटी रुपयांहून अधिक क्लेम न केलेल्या मालमत्तेपैकी परतावा न केलेल्या आयुर्विमा लाभांची रक्कम १४,००० कोटी रुपयांहून अधिक आहे. निधी हस्तांतरित झाल्यानंतर देखील पॉलिसीधारक, वारसदार किंवा कायदेशीर वारस हस्तांतरणाच्या तारखेपासून २५ वर्षांपर्यंत त्यांच्या थकबाकीवर दावा करू शकतात. विमा कंपन्यांनी क्लेम न करण्यात आलेली रक्कम आणि गुंतवणूकीवर मिळालेले उत्पन्न परत करणे बंधनकारक आहे. विम्याची देयके १० वर्षांहून अधिक काळ न भरली गेली तर ती भारत सरकारद्वारे देखरेख केल्या जाणाऱ्या सीनियर सिटीझन्स वेल्फेअर फंड (एससीडब्ल्यूएफ)मध्ये हस्तांतरित केली जातात.

नागरिकांना त्यांचा विम्याचा पैसा शोधण्यात आणि तो क्लेम करण्यामध्ये मदत करण्यासाठी समर्पित ऑनलाइन चौकशी लिंक्स, हेल्पलाइन आणि तक्रार निवारण पोर्टल्स जसे आयआरडीएआयचे बिमा भरोसा प्लॅटफॉर्म तयार करण्यात आले आहेत.

**इतक्या क्लेम्सचे क्लेम का होत नाही**

सर्वांत सामान्य कारणे अचंबित करणारी आहेत, जसे :

- पत्ता किंवा फोन नंबर बदललेला असणे आणि तो अपडेट न करणे
- बँक खाती बंद होणे किंवा बदलणे
- वारसदाराचा तपशील नसणे किंवा तो जुना झालेला असणे
- कुटुंबाला पॉलिसी किंवा गुंतवणुकीबद्दल माहिती नसणे
- काळासह कागदपत्रे गहाळ होणे
- अपूर्ण कागदपत्रे

बहुतेक प्रकरणांमध्ये, हा पैसा हरवलेला नसतो, तो फक्त शोधण्यासह क्लेम केले जाण्याच्या प्रतीक्षेत असतो.

**तुम्ही तुमच्या कुटुंबाचे आर्थिक संरक्षण कसे करू शकता**

पॉलिसीधारक म्हणून तुमच्या पैशांचे तुमच्या पश्चात क्लेम न होण्याची शक्यता टाळण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे पुढीलप्रमाणे काही सक्रिय खबरदारी घेतली पाहिजे.

- तुमचा पत्ता, मोबाइल नंबर, पॅन आणि बँक तपशील नेहमी अपडेट करा.
- लाभार्थ्यांना नामांकित करा आणि वारसदार व्यक्तीची माहिती अपडेट करत राहा.
- आर्थिक गुंतवणूक आणि पॉलिसींबद्दल कुटुंबातील सदस्यांना माहिती द्या.
- कागदपत्रांच्या प्रत्यक्ष प्रती व डिजिटल असे दोन्ही रेकॉर्ड ठेवा.
- डिजिलॉकर आणि इतर अधिकृत डिजिटल रिपॉझिटरीचा वापर करा.
- क्लेम न केलेल्या निधीसाठी वेळोवेळी ऑनलाइन पोर्टल तपासा आणि तुमच्या वारसदार व्यक्तींना देखील या प्रक्रियेची माहिती द्या.

नागरिक आणि त्यांच्या हक्काचा निधी यांच्यातील दुवा म्हणजे जागरूकता. सर्व आर्थिक संस्थांमध्ये अशा निधीचे संरक्षण करण्यासाठी संरचित यंत्रणा तयार करण्यात आली आहे, ज्यामधून नागरिक समोर येऊन क्लेम करू शकण्याची खात्री मिळते. वैयक्तिक स्तरावर, विमा कंपन्या विमा पॉलिसी मॅच्युरिटीसाठी येते किंवा निष्क्रिय होते, तेव्हा व्हॉट्सॲप, ईमेल, प्रत्यक्ष पत्रे इत्यादी विविध संवाद माध्यमांद्वारे ग्राहकांच्या शेवटच्या ज्ञात संपर्कांशी सक्रियपणे संपर्क साधत आहेत.

आयुर्विमा क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करणारी संस्था इन्शुरन्स अवेअरनेस कौन्सिल (आयएसी) – लाइफ इन्शुरन्स कुटुंबांना त्यांच्या हक्काचा पैसा क्लेम करण्यामध्ये मदत करण्यासाठी मोहीम राबवत आहे. २०१९ मध्ये २४ आयुर्विमा कंपन्यांनी एकत्र येऊन उद्योग संस्थेच्या रूपात 'लाइफ इन्शुरन्स कौन्सिल'ची स्थापना केली. आयएसी या कौन्सिलमधील आंतर-उद्योग मार्केटिंग टीम आहे. क्रिएटिव्ह आणि मीडिया एजन्सींच्या पाठबळासह आयएसी आयुर्विम्याच्या विविध पैलूंबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी, समज वाढवण्यासाठी आणि विचार प्रवृत्त करण्यासाठी देशभरात मोहिमांचे संशोधन, नियोजन, निर्मिती आणि अंमलबजावणी करते.

आयएसीच्या या जनसंपर्क मोहिमेद्वारे भारतातील आयुर्विमा कंपन्या प्रत्येक भारतीय कुटुंबाला आवाहन करतात की, त्यांनी काही वेळ काढत आपले आर्थिक संरक्षण शोधावे, त्याची पडताळणी करावी आणि सुरक्षित करावे, ज्यामुळे तुम्ही विम्याच्या माध्यमातून बचत करणारी रक्कम तुमच्या योग्य वारसदारांना मिळेल. तुमच्या कुटुंबाला तुमच्या आयुर्विमा पॉलिसीबद्दल माहिती द्या, पॉलिसीमधील तपशील नियमितपणे अपडेट करा आणि वर्षातून एकदा 'विमा भरोसा' पोर्टलवर तुमच्या कुटुंबाच्या नावावर असलेल्या, पण क्लेम न केलेल्या विमा रकमेचा शोध घ्या. अशा प्रकारे, तुम्ही विमा रक्कम क्लेम केल्यानंतर तुमच्या योग्य वारसदारापर्यंत पोहोचण्याची खात्री घेऊ शकता.


# इलेक्ट्रॉनिक उपकरणे अधिक कार्यक्षम


**लोकसत्ता प्रतिनिधी**

पुण्याच्या ‘आयसर’ने अतिशय पातळ आणि मोठ्या आकाराच्या ‘बिस्मथ ऑक्सिसेलेनाइड’ नॅनोशीट्स तयार करण्याची एक सोपी पद्धत विकसित केली आहे.

**पुणे :** ‘भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थे’तील (आयसर पुणे) येथील भौतिकशास्त्रज्ञांच्या गटाने भविष्यातील इलेक्ट्रॉनिक उपकरणांसाठी उपयुक्त ठरू शकणाऱ्या विशेष द्विमितीय अर्धसंवाहक पदार्थाची निर्मिती केली आहे. भविष्यातील लवचीक स्मार्टफोन, अंगावर परिधान करण्यायोग्य हेल्थ मॉनिटर, स्मार्ट फॅब्रिक्स आणि वाकवता येण्याजोग्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांसाठी हे तंत्रज्ञान अत्यंत महत्त्वाचे ठरू शकते, असा शास्त्रज्ञांचा दावा आहे.

‘आयसर पुणे’तील भौतिकशास्त्र विभागाचे मुख्य संशोधक प्रा. अतिकुर रहमान यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या संशोधनामध्ये डॉ. शिवप्रसाद पाटील, अविनाश महापात्र, सुदीप्त मजुमदार, एच. एल. प्रदीपा, पवनकुमार गुप्ता, श्रीकृष्ण भागवत यांचा सहभाग होता. या संशोधनाचे निष्कर्ष ‘स्मॉल’ या संशोधनपत्रिकेत प्रसिद्ध झाले आहे.

इलेक्ट्रॉनिक उपकरणे अधिकाधिक लहान आणि शक्तिशाली होत असताना सध्या वापरले जाणारे पारंपरिक अर्धसंवाहक पदार्थ त्यांच्या भौतिक मर्यादांकडे पोहोचत आहेत. त्यामुळे आता या क्षेत्रातील शास्त्रज्ञांकडून द्विमितीय पदार्थांचा पर्याय शोधण्यात येत आहे. हे पदार्थ केवळ काही अणूंच्या थराएवढे जाड असतात. मानवी केसापेक्षाही हजारो पटींनी पातळ असलेले हे ‘बिस्मथ ऑक्सिसेलेनाइड’ नॅनोशीट्स इलेक्ट्रॉनिक उपकरणांना अधिक वेगवान, कार्यक्षम आणि लवचीक बनवू शकतात. मात्र, हा पदार्थ मोठ्या आकारात, स्थिर आणि मजबूत स्वरूपात तयार करणे आतापर्यंत एक मोठे आव्हान होते. प्रा. अतिकुर रहमान यांच्या नेतृत्वाखालील पथकाने या आव्हानांवर मात केली आहे.




तापमान, वायूचा प्रवाह, रासायनिक घटकांचे प्रमाण आणि प्रक्रियेचा वेळ अशा घटकांचे अचूक नियोजन करण्यात आले. ही उपकरणे एका लवचीक, प्लास्टिकसारख्या पृष्ठभागावर बसवून त्यांची वारंवार वाकवून चाचणी घेण्यात आली. हजारो वेळा वाकवल्यानंतरही या उपकरणांच्या कार्यक्षमतेत किंवा प्रकाश-संवेदनक्षमतेत कोणतीही घट झाली नसल्याचे आढळून आले. **प्रा. अतिकुर रहमान,** ‘आयसर’

## लोकमानस

loksatta@expressindia.com

### रान मोकळे झालेले नाही...

**‘नक्षलनाशानंतर...?’ हे** संपादकीय (२४ फेब्रुवारी) वाचले. नक्षलवाद संपवण्याच्या नादात सरकार आणि नक्षलवादी दोघांनीही आदिवासी विरुद्ध हिंसेचा वापर केला आहे. आज महाराष्ट्र, छत्तीसगढ, ओडिसा, झारखंड इत्यादी राज्यांत सुरू झालेली पर्यावरणाची कत्तल विचारात घेतली तर जी काही जंगले, नैसर्गिक साधन संपत्ती अबाधित दिसते त्याचे श्रेय नक्षलींना दिले पाहिजे. जल, जंगल आणि जमीन हा आदिवासी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. आदिवासी भागातील शिक्षण, आरोग्य, बेरोजगारी याकडे केवळ नक्षलवाद्यांनी दुर्लक्ष केले नाही तर आतापर्यंतच्या सर्वच सरकारनी ही बाब गंभीरपणे घेतली नाही. विद्यमान सरकारलाही आदिवासी कल्याणाशी काही देणे- घेणे नाही. नागरी जीवनातील सुखसोयींकरिता आदिवासी भागातील नैसर्गिक साधन संपत्तीचे व मनुष्यबळाचे शोषण करणे हाच प्रमुख उद्देश आहे. नक्षली त्यातील प्रमुख अडथळा होते.

आता सारे रान मोकळे झाले आहे असे समजण्याचे कारण नाही. नक्षलवाद हा शोषणाविरुद्धचा विचार असेल तर तो संपणार नाही, तर वेगळ्या स्वरूपात कदाचित भांडवलशाही दहशतवादाप्रमाणे लोकशाही दहशत मार्गाने पुन्हा कार्यरत होईल.व्यवस्थेवरील व्यापक अविश्वासाच्या संक्रमण काळात आदिवासी समुदायाला राष्ट्रीय प्रवाहात सामावून घेण्याची कोणतीही योजना किंवा धोरण सरकारकडे आज तरी नाही. जल, जंगल आणि जमिनीवरील आदिवासी समाजाच्या उपजीविकेचे नैसर्गिक हक्क डावलले जात असताना पर्यायी आदिवासींना सामावून घेणारी पर्यायी व्यवस्था अमलात आणली नाही तर आगीतून फुफाट्यात अशी परिस्थिती निर्माण होईल हे मात्र खरे आहे.

■ **नंदन नांगरे**

### बंदुका काढून घ्या, पण भाकरी द्या....

**‘नक्षलनाशानंतर...?’ हा** अग्रलेख वाचला. २०२६ च्या मध्यावर देश नक्षलमुक्त करण्याची प्रतिज्ञा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली होती. राज्यघटनेच्या विरोधात पावले उचलणाऱ्या प्रत्येकाला शिक्षा करण्याचा अधिकार सरकारला आहे हे निर्विवाद; किंबहुना सरकारचे ते कर्तव्यच आहे. पण लोकांच्या हातातल्या बंदुकी काढून घेतानाच त्यांना भाकरी मिळेल अशी व्यवस्था करणे हीदेखील सरकारची जबाबदारी आहे याचे स्मरण राहायला हवे.

कायदा-सुव्यवस्थेसाठीचे सुरक्षात्मक उपाय हे परिस्थिती नियंत्रणात आणू शकतात; पण प्रश्न मुळापासून निपटण्याकरिता ‘वैचारिक समतोल विकास’ गरजेचा आहे. या दृष्टीने आदिवासी भागात विकासकामे, रोजगारनिर्मिती, शिक्षण व पायाभूत सुविधा निर्माण केल्या पाहिजेत. शरणागती पत्करलेल्या नक्षलवादी संघटनेच्या नेतृत्वासोबत संवाद साधताना त्यांचे पुनर्वसन धोरणांवर लक्ष केंद्रित करणेसुद्धा महत्त्वाचे आहे. आदिवासींना रोजगार देताना त्यांची जंगलातील जगण्याची संसाधने शाबूत ठेवावी लागणार आहेत. नक्षलग्रस्त प्रभागातील दंडकारण्यात घनदाट जंगल आणि त्याखाली भरपूर खनिज संपत्ती आहे. केवळ उद्योगांना ‘रान मोकळे’ करून देण्यासाठी नक्षल्यांची साफसफाई करणे हा हेतू सरकारचा असेल तर नक्षलवाद निर्मूलन मोहीम अल्पकालीन ठरेल.

नक्षलवादी भुसभुशीत भूमी तयार होते, ती केवळ भुकेमुळे. त्यातून व्यवस्थेविषयी विखार आणि जन्माला आलेला हिंसाचार याचे संकट गडद होते. त्यामुळे नक्षलवाद्यांच्या हिंसक कारवायांना आळा घालण्याचा एक मार्ग तसा सुरक्षात्मक आणि कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून योजला पाहिजे.

■ **ज्ञानेश्वर हेडाऊ,** हडपसर, पुणे

### विषमता आणि संघर्ष चिरस्थायी

**‘नक्षलनाशानंतर..?’ हा** अग्रलेख वाचला. व्यवस्था कमरे-खांद्यावर सर्व दायित्व घेऊन धावत असते. बऱ्याचदा हाकणाऱ्यांचे प्राधान्यक्रम सांभाळताना तिचे संतुलन ढासळते. धोरण नावाच्या अधिकारिक प्रयुक्त्यांद्वारे धनिकांचे दलाल याचे बेमालूम व्यवस्थापन करतात. शोषणाच्या विरोधात व्यवस्थेशी भिडणारा चारू मुजुमदार हा एका श्रीमंत जमीनदाराच्या घरात जन्मलेला होता हा काव्यात्मक विरोधाभास आहे. १९६७ मध्ये दार्जिलिंगच्या नक्षलबारी गावात पडलेल्या ठिणगीचा वणवा पाच दशके देशभर पेटत राहिला. या चळवळीची दिशाहिनता, भरकटलेपण, हिंसेचा मार्ग हे नकारात्मक आणि निषेधार्ह मुद्दे नजरेआड करण्यासारखे नाहीत. मात्र शोषण आणि विषमतेचे चक्र अविनाशी आहे. शहरे आणि सामंतवर्गासाठी सुरू असलेल्या विकासपर्वाच्या पार्श्वभूमीवर शासनाला विषमतेचा कडेलोट होऊ न देण्यापर्यंतच वाव उरला आहे. या वर्ग-संघर्षाचे मूळ वाढती विषमता असल्यामुळे दोहोंच्या सह-अस्तित्वाचे वास्तव कटू असले तरी सत्य आहे.

■ **सत्यवान भाऊ पाटील,** नालासोपारा (प.)

### भेदक सांख्यिकीय विश्लेषण

**‘विधानसभा प्रश्नोत्तरांची** अलीकडची तऱ्हा...’ हा मेधा कुळकर्णी आणि मृणालिनी जोग यांचा अभ्यासपूर्ण लेख (२४ फेब्रुवारी) वाचला. लोकशाहीच्या सर्वोच्च सभागृहात जनतेच्या प्रश्नांची कशी ‘ऐशीतैशी’ केली जाते, याचे भेदक सांख्यिकीय विश्लेषण या लेखातून समोर आले आहे. लेखात नमूद केल्याप्रमाणे, धुळे आणि जळगाव यांसारख्या जिल्ह्यांतून सर्वात कमी प्रश्न विचारले जाणे हे चिंतेचे लक्षण आहे. सांख्यिकीय दृष्टीने, ज्या भागाचा मानवी विकास निर्देशांक कमी असतो, तिथल्या लोकप्रतिनिधींकडून प्रश्नांचा भडिमार अधिक असायला हवा. दुसरीकडे, एखाद्या जिल्ह्याचा मानवी विकास निर्देशांक वाढला म्हणजे तिथले प्रश्न संपतात असे मुळीच नाही. प्रगत समाजात प्रश्नांचे स्वरूप केवळ ‘अस्तित्वाच्या’ लढाईकडून ‘जगण्याच्या गुणवत्ते’च्या (क्वालिटी ऑफ लाइफ) शोधाकडे वळते. लेखात उल्लेख केलेले ‘कॅन्सर डायग्नोस्टिक’ किंवा ‘वेब सीरिजमधील फसवणूक’ यांसारखे विषय हे बदलत्या आणि प्रगत समाजाचेच निदर्शक आहेत. मात्र, सरकारने दिलेली ‘विविध उपाययोजना करण्यात येत आहेत’सारखी मोघम उत्तरे ही लोकशाहीची थट्टा करणारी आहेत. विचारलेल्या प्रश्नांचे रूपांतर ‘ठोस आकडेवारी’ आणि ‘कालबद्ध कार्यक्रमा’त होत नाही, तोपर्यंत राज्याचा मानवी विकास निर्देशांक केवळ कागदावरच उंचावत राहील.

■ **भगवान जगदाळे,** कोल्हापूर

### अधिवेशने, तेव्हा आणि आता...

**‘विधानसभा प्रश्नोत्तरांची** अलीकडील तऱ्हा’ हा लेख (२४ फेब्रुवारी) वाचला. अधिवेशनांत लोकांच्या जगण्यासंबंधी प्रश्न असतात. सरकारकडून चांगले काम करून घ्यायचे असेल तर लोकांनी अधिवेशन काळातील कामकाजाची दररोज माहिती घेऊन त्यांचा सहभाग वाढवला पाहिजे. त्यासाठी अधिवेशनांतील दररोजच्या कामकाजाची माहिती संकेतस्थळावर शासनाने प्रसिद्ध केली पाहिजे. अशी माहिती मिळणे हा लोकांचा हक्क आहे. काँग्रेसच्या काळात सरासरी दररोज शंभरपेक्षा जास्त प्रश्न यायचे. अधिवेशन १०० नाही, पण ८० दिवस चालायचे. प्रशासनावर वचक असायचा. काम करायला लागायचे. आजकाल उत्तरेही दुधात पाणी घातल्यासारखी गोलमाल असतात.

■ **जयप्रकाश नारकर,** ता. राजापूर, रत्नागिरी

### कठोर कारवाई करावयास हवी

**‘थेट बँकेत** जमा, तरी घोटाळ्यांची कीड!’ हा अन्वयार्थ वाचला. केंद्र व राज्य सरकारे अनेक कल्याणकारी योजना राबवतात; परंतु काही ठिकाणी भ्रष्टाचारामुळे लाभार्थ्यांपर्यंत त्यांचा पूर्ण फायदा पोहोचत नाही. बऱ्याच ठिकाणी निधीवाटप, लाभार्थी निवड आणि कामांची मोजणी यामध्ये स्पष्टता दिसून येत नाही. राजकीय हस्तक्षेप, दलाल व मध्यस्थांची साखळी या बाबींमुळे गैरव्यवहार वाढताना दिसतो. निधी अपहार, बनावट लाभार्थी, कमी दर्जाचे काम करून जास्त बिल दाखवणे, लाचखोरी यांसारख्या बाबींमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. खोटी कागदपत्रे तयार करून सरकारी पैसा लाटण्याचे प्रकार कमी व्हायला हवेत. सरकारने भ्रष्टाचार, अपहार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावयास हवी.

■ **प्रा. रवींद्र पाटील,** कोल्हापूर

### ट्रम्प यांच्या मागे कोण आहे?

**‘ट्रम्प हरले,** ट्रम्प जिंकले!’ हे संपादकीय (२३ फेब्रुवारी) वाचले. ट्रम्प यांचा कारभार लोकशाहीच्या मार्गाने आहे का, हा प्रश्न पडतो. परंतु ट्रम्प हरले का किंवा ट्रम्प जिंकले का हे म्हणत असताना ट्रम्प यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून आपला फायदा करू पाहणारे अनेक लोक त्यांच्या मागे आहेत का, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. कारण ट्रम्प हे कधी कधी एखाद्या ‘वुई आर जस्ट पपेट’च्या बाहुलीसारखे वाटतात. हे भावली हाताळणारे एक दिवस ‘विशिष्ट फाईली’च्या प्रसिद्धीसारखे अचानक समोर येतील. त्यामुळे ‘ट्रम्प हरवले गेले की ट्रम्प जिंकवले गेले?’ याचाही शोध घेणे महत्त्वाचे आहे.

■ **ओ. म. चिंचोलकर,** पुणे

# अणुऊर्जा नको, अक्षयऊर्जाच हवी!

**सत्ताधाऱ्यांनी वा उच्चपदस्थांनी कितीही भलामण केली, तरी अणुऊर्जा खर्चीक, प्रदूषक आणि एकंदरीत घातक असल्याचे जागतिक दाखले नाकारता येत नाहीत. दुसरीकडे, अक्षयऊर्जेच्या सरकारी योजनांना लोकांचा प्रतिसाद वाढतो आहे. यामागचे वास्तव दुर्लक्षित करून खासगी भांडवलास अणुऊर्जा क्षेत्रात वाव देणे धोक्याचे ठरेल...**

**डॉ. संजय मंगला गोपाळ**

अक्षयऊर्जा व ऊर्जानीती तज्ज्ञ; ‘जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय’चे राष्ट्रीय समन्वयक

sansahil@gmail.com

‘‘**भारतात अणुऊर्जेचे** योगदान मोलाचे ठरणार आहे. अणुऊर्जा हा अक्षयऊर्जेला पर्याय नाही तर पूरक आहे. अणुऊर्जेच्या पर्यावरणीय फायद्यांना कमी लेखले जाते’’, असे मत अ‍ॅपेलेट ट्रायब्युनल फॉर इलेक्ट्रिसिटीचे सदस्य अजय तळेगांवकर यांनी ‘लोकसत्ता’तील लेखात (२० फेब्रु.) व्यक्त केले असून ‘आज सुमारे ८.८ गिगावॉट असलेली अणुऊर्जेची क्षमता २०४७ मध्ये १०० गिगावॉटपर्यंत वाढवण्या’चा संकल्पही सांगितला आहे. अणुऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या टाकाऊ पदार्थांचे प्रमाण हा फारसा गंभीर मुद्दा नाही असे सांगत,

‘‘सुरक्षित दीर्घकालीन व्यवस्थापन हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे’’ असे त्यांनी म्हटले असले तरी याबाबत काटेकोर अंमलबजावणी होत नाही, हे सांगितलेले नाही. खासगी व परदेशी उद्योजकांना हे क्षेत्र खुले करण्याने तर यातील बेफिकिरी वाढण्याचाच धोका आहे, हेही त्यांनी नमूद केलेले नाही.

अणुऊर्जेच्या जन्मापासून अणुकचऱ्याचा प्रश्न आहे तसाच आहे - आत्यंतिक खर्चीक, पुढील अनेक पिढ्यांसाठी धोकादायक आणि राजकीयदृष्ट्या अडचणींचा! अणुवीजभट्टीतून बाहेर पडणारा किंवा मागे राहणारा किरणोत्सारी कचरा उच्च आणि कमी उच्च दर्जाचा असतो. उच्च दर्जाचा कचरा हा प्रामुख्याने वापरलेले इंधन या स्वरूपातला असतो आणि हे वापरलेले इंधन मूळ इंधनापेक्षा सुमारे दशलक्ष पटीने घातक असते! त्याची धोकादायकता लक्षावधी वर्षे टिकून राहते. इतका प्रदीर्घ काळ असे धोकादायक साठे सुरक्षिततरीत्या साठवून ठेवणारे कोणतेही तंत्रज्ञान आजमितीस जगात उपलब्ध नाही! गेल्या ५० वर्षांत या संदर्भात डझनाने योजना फसल्या आहेत. अमेरिका, फ्रान्स आणि ब्रिटनमधील शास्त्रज्ञांनी अनेकवार इशारा देऊन झाला आहे की, अणुकचऱ्याच्या समस्येकडे सातत्याने दुर्लक्ष करत राहणे म्हणजे जनतेच्या धोक्यात अधिकाधिक वाढ करणे. अशा वेळी, पूर्ण सुरक्षा प्रदान न करणारे खर्चीक उपाय एकीकडे अणुविजेचे दर भरमसाट बनवतील, तर दुसरीकडे, अणुकचऱ्याचे संकट समाजाच्या माथी सतत लटकवत ठेवतील! अणुऊर्जेची साखळी सुरू होते खाणीतून युरेनियम शुद्ध रूपात काढण्यापासून. ही प्रक्रियाच मुळात प्रदूषणकारी आणि युरेनियम खाणींभोवतालच्या भल्या मोठ्या परिसराला उद्ध्वस्त करून टाकणारी आहे. एक दशलक्ष ग्रॅम्स युरेनियम खाण-मातीत अवघे ५०० ग्रॅम्स शुद्ध युरेनियम मिळू शकते! यासाठी प्रचंड प्रमाणात दगडफोड, ते उकरणे, क्रश करणे आणि त्यावर रासायनिक प्रक्रिया करणे आदी सोपस्कार करावे लागतात. यातून मिळालेले अल्प स्वल्प शुद्ध युरेनियम बाजूला काढल्यावर, उरलेल्या घाणीत प्रचंड प्रमाणात किरणोत्सारी पदार्थ शिल्लक असतात. हे साठवून ठेवली जाणारी कुंड (टेलिंग्ज) खाण परिसरात अतिशय निष्काळजीरीत्या सांभाळली जातात, ज्यामुळे या परिसरातील जलस्रोत मोठ्या प्रमाणात बाधित होतात. हे युरेनियम, अणुभट्टीत वापरण्यायोग्य बनविण्यासाठी पुन्हा त्यावर अनेक प्रक्रिया कराव्या लागतात आणि या प्रत्येक टप्प्यावर, वर वर्णन केलेले किरणोत्सारी आणि रासायनिक प्रदूषण त्या-त्या परिसरात मोठ्या प्रमाणात होतच राहते. यामुळे त्या त्या परिसरातील तमाम जनतेला - प्रामुख्याने आदिवासी आणि तत्सम समाज घटकांना- प्रतिदिन विषाचा सामना करावा लागतो.

तंत्रज्ञान कितीही अद्ययावत होत राहिले तरीही अपघात टाळता येणे शक्य नाही. जपानमधील फुकुशिमा येथे २०११ साली डाईची अणुऊर्जा प्रकल्पाच्या झालेल्या अपघातात आसपासच्या कित्येक मैल भागात किरणोत्साराचा परिणाम राहिला होता. त्यापूर्वी १९८६ मध्ये रशियातील चेर्नोबिल अणु प्रकल्पात झालेला अपघात महाभयंकर होता. फुकुशिमा अपघातानंतर एकूणच जगभरात, काही देशांचे अपवाद वगळता अणुऊर्जाधारित वीजनिर्मिती प्रकल्पांबाबत पुनर्विचार सुरू झाला आहे. जसे मोठ्या जलविद्युत प्रकल्पांचे डी - कमिशनिंग करून ते बंद केले जात आहेत, तसेच अणुऊर्जा प्रकल्प यापुढे नव्याने प्रस्तावित न करणे, आहे त्या प्रकल्पांचा भार कमी करणे व यासाठी एकूणच किरणोत्सार व तत्सम बाबतीतील सुरक्षाव्यवस्था मजबूत करणे, आदी बाबी अनेक देशांनी सुरू केल्या आहेत.

अणुवीज केंद्राला वेगवेगळ्या टप्प्यांवर लागणाऱ्या शुद्ध पाणीपुरवठ्याची गरज फार मोठी आहे. त्यामुळेच हे प्रकल्प नदी किंवा समुद्रकिनारी उभारले जातात. एकुणात आपल्या देशातील शुद्ध पाण्याची उपलब्धता अत्यंत मर्यादित असताना या प्रकल्पांमुळे पाण्याच्या मोठ्या संकटाचा सामना करावा लागू शकतो. शिवाय यातल्या बऱ्याचशा पाण्याचा वापर भट्टी व अन्य यंत्रे थंड करण्यासाठी होणार असल्यामुळे हे पाणी वापरून झाल्यावर त्याचे तपमान वाढणार असून हे तप्त पाणी अणुभट्टीच्या परिसरात - विशेषतः समुद्रात- सोडले जाणार असल्याने त्याचा परिसरातील मत्स्यप्रजनन आणि अन्य प्राणीजन्य जीवांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. स्थानीय मच्छीमार समाजासाठी हे फार मोठे आर्थिक आणि सामाजिक संकट आहे. वीजनिर्मिती सुरू असताना वातावरणात सोडल्या जाणाऱ्या सेसीयम, आयोडिन आणि अन्य किरणोत्सारी पदार्थांमुळे हवा, पाणी व जमीन प्रदूषण होऊ शकते.

अणुवीज भट्टीतून निर्माण होणारे टाकाऊ कमी प्रतीचे युरेनियम हे अण्वत्रे बनविण्यासाठी वापरले जात असल्यामुळे अणुवीज भट्ट्या हे अणुआधारित शस्त्रात्र- निर्मितीचा कच्चा माल आयतेच पुरवणारे ठरत आहेत! यामुळे अण्वस्त्रस्पर्धेचा धोका वाढीस लागतो. याशिवाय, अणुवीज प्रकल्पांसाठी लागणारे सुरुवातीचे प्रचंड भांडवल, त्यांना द्याव्या लागणाऱ्या सवलती, दुर्दैवाने घडून येणाऱ्या अपघातात खर्च होणारा अतिरिक्त पैसा आदी मुद्दे आहेतच. थोडक्यात, अणुऊर्जा खर्चीक, महाग, प्रदूषणकारी, धोकादायक, संपत जाणारी व क्षय पावत जाणारी, भारतासारख्या देशांसाठी आयातीवर अवलंबून असणारी आणि राष्ट्रहिताच्या नावाखाली पहाडी, दुर्गम जंगल आणि किनारपट्टीतील प्रामुख्याने आदिवासी आणि मच्छीमार जनसमूहांना अतोनात संकटात लोटणारी आहे.

आपल्या देशात अणुऊर्जेसाठी प्रचंड व सौर, पवन आदी अक्षयऊर्जेसाठी त्यामानाने कमी गुंतवणूक असतानाही अणुऊर्जाधारित वीजनिर्मिती नगण्य स्वरूपात वाढलेली दिसत असून अक्षयऊर्जेचं प्रमाण मात्र झपाट्याने वाढते आहे. यामागील सर्वात मोठे कारण म्हणजे स्थानिक जनतेच्या मनात एकीकडे अणुऊर्जाधारित प्रकल्पांच्या दुष्परिणामांविषयी आजवरच्या अनुभवांच्या आधारे असलेला प्रचंड असंतोष आणि दुसरीकडे अक्षयऊर्जाच सुरक्षित असून त्याचे परिसरातील पर्यावरणावर तरी दुष्परिणाम होत नाहीत, याबाबत असलेली खात्री! देशात आजवर उभारलेल्या सर्वच अणुऊर्जा प्रकल्प परिसरात वरील दुष्परिणाम कमीअधिक प्रमाणात तेथील जनतेला भोगावे लागले आहेत.

आजवर आठ ते नऊ गिगावॉट असलेली अणुऊर्जेची क्षमता २०४७ मध्ये १०० गिगावॉटपर्यंत म्हणजे सुमारे १२ पट वाढवण्याचा सरकारचा इरादा पाहता २० वर्षांत वरील दुष्परिमाण १२ पटींनी वाढणार आहेत. इतके करून आजघडीला देशातील एकूण वीजनिर्मितीमध्ये तीन टक्क्यांपेक्षा कमी वाटा असणाऱ्या अणुऊर्जेचे प्रमाण यामुळे केवळ ५ टक्क्यांपर्यंतच वाढणार आहे. केवळ भरपूर पैसे ओतून व जोरजबरदस्तीतून प्रकल्प यशस्वी करता येत नाही तर जनतेचा त्यातील सहभाग कळीचा असतो, ही बाब आता जागतिक पातळीवर मंजूर झालेली असताना, भावी पिढ्यांची सुरक्षा वेठीला धरणारे प्रकल्प सत्ताधाऱ्यांनी रेटणे हे केवळ लोकशाहीच्याच विरोधी नसून अमानवीय आणि अनैतिकही आहे!

या आधीच्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने व आताच्या भारतीय जनता पक्ष सरकारने परदेशी कंपन्यांना देशात अणुउर्जाधारित वीजनिर्मिती प्रकल्प उभारणीसाठी लाल गालिचा अंथरला. भौगोलिकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील किनारपट्टीवर अपघात झालेच तर नुकसानभरपाईची पुरेशी जबाबदारी वीजनिर्मितीत घुसू पाहणाऱ्या परदेशी वा खासगी कंपन्यांवर न टाकणे, हे अधिकच धक्कादायक आहे. या संदर्भात लोकांचा व तज्ज्ञांचा होणारा तीव्र विरोध दुर्लक्षिणे, मोडून काढणे वा वारेमाप नुकसानभरपाईचे गाजर दाखवून शमवण्याचे शासकीय प्रयत्न वेदनादायक व धिक्कारार्हही आहेत.

शेवटी भारत सरकारच्या योजना आयोगाने २००६ साली एकीकृत ऊर्जा धोरणात जनतेप्रति व्यक्त केलेल्या हमीकडे लक्ष वेधणे गरजेचे वाटते. ‘ऊर्जा धोरणाचे स्थूल उद्दिष्ट हे - समाजातील सर्व घटकांच्या ऊर्जासेवांची आवश्यकता भागविण्यावर भर देण्यात येईल व असे करताना ही ऊर्जा सुरक्षित, स्वच्छ आणि सोयीच्या स्वरूपात देण्यात येईल. हे साधताना, ऊर्जा किमान किमतीला, तंत्रवैज्ञानिकदृष्ट्या कार्यक्षम, आर्थिकदृष्ट्या किफायतशीर आणि पर्यावरणदृष्ट्या चिरंजीवी व अक्षय पद्धतीने पुरविण्यात येईल.’ वीस वर्षांपूर्वी घोषित केलेल्या या सुरक्षित ऊर्जा नीतीकडे काणाडोळा करणे योग्य नाही!

## कुतूहल

### गाडीच्या काचा सुरक्षित का?

**आपल्या घरातला** आरसा खाली पडला तर काच फुटते आणि तिचे तुकडे इकडेतिकडे उडतात. हे तुकडे धारदार, टोकदार असल्यामुळे ते गोळा करताना बोटांना इजा होऊ शकते. मात्र गाडीच्या काचा फुटल्यावर असे धारदार, टोकदार तुकडे होताना दिसत नाहीत. असं का होतं?

गाडीच्या काचा या आरशाच्या काचेपेक्षा वेगळ्या पद्धतीनं तयार केल्या जातात. फुटलेल्या काचेमुळे माणसांना इजा होऊ नये म्हणून विशिष्ट रचना आणि तंत्रज्ञान वापरून अशा काचा घडवलेल्या असतात.



आरशासाठी वापरली जाणारी साधी काच आणि गाडीची काच यांच्यातला फरक समजून घेण्यासाठी त्या कशा तयार केल्या जातात ते पाहू या.

साधी काच तयार करण्यासाठी वाळू (सिलिका), सोडा अ‍ॅश आणि चुनखडी हे पदार्थ योग्य प्रमाणात एकत्र करून भट्टीत उच्च तापमानाला वितळवले जातात. या वितळलेल्या मिश्रणाला हवा तसा आकार देऊन काच हळूहळू थंड केली जाते. अशी काच तुटली तर ती मोठ्या व धारदार, टोकदार तुकड्यांत फुटते. त्यामुळे ही काच गाड्यांमध्ये वापरली तर अपघाताच्या वेळी गंभीर जखमा होऊ शकतात.

गाड्यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या काचा मुख्यतः दोन प्रकारच्या असतात; लॅमिनेटेड काच आणि टेम्पर्ड काच. लॅमिनेटेड काच प्रामुख्याने गाडीच्या पुढच्या बाजूसाठी (विण्डशील्ड) वापरली जाते. या काचेत सँडविचप्रमाणे दोन काचांच्या थरांमध्ये मजबूत, लवचीक आणि चिकट असा पॉलिव्हिनाइल ब्युटिराल या प्लास्टिकचा थर असतो. सुरुवातीला सर्व थर हलक्या उष्णतेनं जोडले जातात. त्यानंतर एका विशिष्ट भट्टीमध्ये १३० ते १५० अंश सेल्सियस तापमानाला दाब देऊन ते गरम करतात. त्यामुळे प्लास्टिकचा थर काचेला घट्ट चिकटतो. काच फुटली तरी तिचे तुकडे या प्लास्टिकच्या थराला चिकटून राहतात. फुटलेल्या काचेचे तुकडे खाली पडत नाहीत किंवा प्रवाशांवर उडत नाहीत.

गाडीच्या बाजूच्या आणि मागील काचा टेम्पर्ड काचा असतात. या काचा उच्च तापमानाला गरम करून पटकन थंड केल्या जातात. या प्रक्रियेमुळे त्या साध्या काचेपेक्षा चार ते पाचपट अधिक मजबूत होतात. अशा काचा फुटल्यावर मोठे धारदार तुकडे न होता छोटे, बोथट तुकडे तयार होतात. त्यामुळे प्रवाशांना होणारी इजा टाळता येते किंवा जखमांची तीव्रता कमी होते. अशा काचा वापरायला सुरक्षित असल्यानं त्यांना सुरक्षित काचा म्हणतात.

अपघात झाल्यावर फुटलेल्या काचांमुळे गाडीतील माणसांना इजा होण्याची शक्यता असते. म्हणून गाडीत अशा सुरक्षित काचा वापरल्या जातात. त्यामुळे जीवितहानी टाळण्यास मोठ्या प्रमाणात मदत होते.

**– शुभदा चंद्रशेखर वक्टे**

**मराठी विज्ञान परिषद**

**ईमेल :** office@mavipa.org

**संकेतस्थळ :** www.mavipa.org

## उलटा चष्मा

### सत्यवचनी...

**रात्रीचे बारा** वाजलेले. बंगल्यावर सामसूम पसरलेली. शयनकक्षात निशिकांतजी नेहरूंवरचे एक पुस्तक हातात घेऊन यातील कोणत्या विधानांची मोडतोड करता येईल यावर विचार करत बसलेले. प्रवेशद्वारावरचे सुरक्षारक्षक पेंगुळलेल्या अवस्थेत असलेले. तेवढ्यात हातात भरमार बंदुका घेतलेली एक टोळी अचानक समोर येऊन उभी ठाकली तशी एकच पळापळ उडाली. रक्षकांनी आक्रमक पवित्रा घेतला. हे बघून टोळीतील काहींनी ‘दुबेजीं की जय’ अशा घोषणा देताच वातावरणातला तणाव निवळला. ‘आम्ही चंबळच्या खोऱ्यातून आलोय. साहेबांना भेटायचे आहे’. मग निरोपाची देवाणघेवाण झाली. खांद्यावर बंदूक नसली तर आमच्या तोंडून शब्दच फुटत नाही हे दरोडेखोरांनी पटवून दिल्यावर त्यांना शस्त्रासकट आत प्रवेश देण्यात आला. दिवाणखान्यात निशिकांतजींचे आगमन झाल्यावर टोळीचा म्होरक्या अदबशीरपणे म्हणाला, ‘जेपी व विनोबाजींचा अपवाद वगळला तर भारतीय राजकारण्यांनी आमच्या समुदायाकडे फार तुच्छतेनेच बघितले. त्या दोघांनंतर आमची कदर करणारे फक्त तुम्हीच (हे ऐकताच दुबे आनंदाने मोहरलेच). चोर आणि दरोडेखोर उभे केले तरी ते आमच्या पक्षाकडून निवडून येतील हे तुमचे वक्तव्य वाचून आम्हाला अत्यानंद झाला. तुमच्या मनात आमच्याविषयीचा आदर बघून मन भरून आले. मग आम्ही एक बैठक घेतली व दिल्लीकडे कूच केली. वाटेत काही भुरटे चोरही आम्हाला येऊन मिळाले (हे ऐकताच मागून काही हात वर झाले). आजवर आमच्या मनात तुम्हा नेत्यांविषयी चांगली प्रतिमा नव्हतीच. पांढऱ्या कपड्यातले दरोडेखोर असेच आम्ही म्हणायचो. आमच्या हाती बंदुका आहेत तर तुमच्या हाती आयुध. मात्र, काम एकच. कारण जनता आम्हाला तुमच्याविषयी तेच सांगायची. आम्हाला पोलिसांपासून दूर पळावे लागते. तर तुम्हाला पोलीस जनतेपासून दूर पळवून नेतात असेही आम्हाला वाटायचे. आमच्या धंद्यात जोखीम आहे तर तुमच्या व्यवसायातील जोखमीला संरक्षण आहे असेही आमचे मत बनलेले. आम्ही दरोडा घातला की शिव्याशाप वाट्याला येतात तर तुमच्या वाट्याला पुष्पवृष्टी अशीही आमची समजूत होती. हे सारे भ्रम तुमच्या एका वक्तव्याने दूर केले (हे ऐकल्यावर निशिकांतजींनी एक लांब सुस्कारा सोडला). आता आमच्यासाठी एक करा. आम्हाला ठिकठिकाणाहून तुमच्या पक्षाची उमेदवारी द्या. आम्ही निवडून आलो की देशाची सेवा करू. थेट लुटीचा मार्ग कायमचा बंद करून टाकू. निवडून आल्यावर आयुष्यभर तुमचे समर्थक म्हणून वावरू. त्या महाराष्ट्रातील काही महिला खासदार कायम तुमच्या मागावर असतात. त्यांना टाळण्यासाठी तुम्हाला वेगवेगळे दरवाजे शोधावे लागतात. आम्ही तुमच्यासोबतच असलो की त्यांची माग काढण्याची वा तुम्हाला अडवण्याची हिंमतच होणार नाही. आजवर आम्ही कडेकपारीत जीवन व्यतीत केले. आता पुढे तुमच्याभोवती कडे करून राहू. देशात काँग्रेसचा जोर असताना दगड उभा केला तरी निवडून येतो असे म्हटले जायचे. तुम्ही त्याहून पुढे जात थेट आमचे नाव घेतले. असे थेट बोलण्यासाठी हिंमत लागते. ती तुम्ही दाखवली. त्यामुळे राजकारणातले खरे ‘सत्यवचनी’ तुम्हीच आहात. आम्ही झारखंडचे आधुनिक जेपी म्हणून तुमच्याकडे बघू लागलो आहोत. तेव्हा लवकर आमच्या उमेदवारीची व्यवस्था करा.’ एवढे बोलून दरोडेखोर निघून गेले. चला, कुणीतरी आपल्याला सत्यवचनी म्हटले. आता नेहरूंवर केलेली टीका लोकांना सत्य वाटू लागेल. सोबतच या टोळीचा विचार करावा लागेल, असे म्हणत निशिकांतजी शयनकक्षाकडे निघाले.

## राजवाडे विचारविश्व

### विशाल जागतिक पटाची हेतुपूर्ण मांडणी

**‘प्लेटोचा शिष्य** व शिकंदराचा (अलेक्झांडर द ग्रेट) गुरू आरिस्टॉटल म्हणजे इसवीसनापूर्वी चौथ्या शतकात होऊन गेलेला थोर ग्रीक विचारवंत. त्याच्यासारखी सर्वग्राही बुद्धी ईश्वराने दुसऱ्या कोणासही दिली नाही, असे म्हणतात. तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, राज्यनीतिशास्त्र, प्राणिशास्त्र, अध्यात्मविद्या इत्यादींचा मूळ उत्पादक हा आहे. याची विचार करण्याची पद्धत ऐतिहासिक असून व्यापक होती’... या शब्दांमध्ये राजवाड्यांनी आणखी एका ग्रंथकाराची ओळख करून दिली होती. विशेष म्हणजे आपल्याकडे परंपरेने चालत आलेल्या आणि राजाने कसे चालावे, याचे मार्गदर्शन करणाऱ्या ‘शुक्रनीति’, ‘पंचतंत्र’, ‘हितोपदेश’, ‘कामंदक’ वगैरे संस्कृत ग्रंथांची आरिस्टॉटलच्या राज्यनीतिपर लेखनाशी तुलना करून त्यांनी असे स्पष्ट म्हटले होते की, ‘हे सगळे केवळ शिष्टाईवरील ग्रंथ आहेत; परंतु त्यांना शास्त्र ही पदवी शोभत नाही. राज्यनीतीचा (खरा) अभ्यास करू इच्छिणाऱ्यांनी प्लेटोचे ‘सुराज्य’ (‘रिपब्लिक’), आरिस्टॉटलची ‘राज्यनीति’, मोंटस्क्यूचे ‘मानवधर्मसार’ इत्यादी ग्रंथ वाचावेत.’ या सर्व ग्रंथांचे मराठी भाषांतर आपल्या मासिकातून प्रकाशित करण्याचा इरादासुद्धा राजवाड्यांनी पाठोपाठ व्यक्त केला होता.

जॉन लॉक (१६३२-१७०४) हा आणखी एक असाच ग्रंथकार. ‘राजा म्हणजे विष्णूचा अवतार’, अशा पारंपरिक प्रतिपादनाविरुद्ध ‘राज्यनीति’ लिहिणारा ब्रिटिश विचारवंत. तो का महत्त्वाचा, तर ‘जुलमाने पीडिलेल्या प्रजेला आपल्यावरील राजसत्ता बदलण्याचा अधिकार आहे’, असे त्याने स्पष्टपणे सांगितले होते. ‘धर्मस्वातंत्र्य’ व ‘मानवी बुद्धी’ हे त्याचे अन्य ग्रंथही महत्त्वाचे असल्याचे राजवाड्यांनी म्हटले होते.

त्यांच्या पसंतीला उतरलेला एडवर्ड गिबन (१७३७-१७९४) हा इंग्रज ग्रंथकार म्हणजे ‘रोमन साम्राज्याच्या ऱ्हासाचा व नाशाचा’ इतिहास लिहिणारा स्वभाषाप्रेमी विचारवंत होता. ‘ऑक्सफर्ड येथे शिकत असताना त्याने क्याथोलिक पंथाचा स्वीकार केला म्हणून त्याला ते विद्यालय सोडावे लागले होते’, हा त्याच्या आयुष्यातला बारकावा नेमका टिपून राजवाड्यांनी तत्कालीन इंग्लंडमध्ये अँग्लिकन चर्चचा कसा एकछत्री प्रभाव अस्तित्वात होता, इकडे लक्ष वेधले होते आणि पाठोपाठ गिबनच्या ग्रंथलेखनाबद्दलची महत्त्वाची माहितीही दिली होती.

‘इसवीसनापूर्वी ७५३ व्या वर्षी रोम शहर शम्यूलसाने स्थापन केले. पुढे ५०९ व्या वर्षी ते शहर प्रजासत्ताक झाले. सरासरी ५०० वर्षे तसेच राहून जगप्रसिद्ध सीझरच्या मृत्यूनंतर आक्टोविअस या त्याच्या पुतण्याने ते एकसत्ताक केले. इसवीसनानंतर १८० वर्षेपर्यंत रोमन पादशाहीची ऐन भरभराट होती. त्यापुढे त्याच्या ऱ्हासाला सुरुवात झाली. पुढे लवकरच पादशाहीचे पाश्चिमात्य व पौर्वात्य असे दोन विभाग झाले... अखेरीस १४५३ च्या २९ मे या तारखेस तुर्क लोकांचा सुलतान महंमद याच्या हातून या पादशाहीचा समूळ उच्छेद झाला...’

असा रोमन साम्राज्याचा इतिहास राजवाड्यांनी थोडक्यात सांगितला होता आणि त्याचबरोबर ही माहिती दिली होती की, गिबन एकदा रोमला गेला असताना त्या शहराच्या ऱ्हासाचा व नाशाचा इतिहास लिहावा, असे त्याच्या मनात आले आणि पुढे सुमारे तीस वर्षे अभ्यास केल्यानंतर त्याने तो प्रचंड मोठ्या कालखंडाचा (इ.स. १८०-१४५३) इतिहास सांगणारा उत्कृष्ट ग्रंथ लिहिला. शेवटी ‘तो ग्रंथ आपल्या सध्याच्या स्थितीत फार उपयोगाचा आहे’, हा त्यांनी व्यक्त केलेला अभिप्राय खूप बोलका होता.

याशिवाय ‘पुरातन पालस्तेन (पॅलेस्टाइन), अथेन्स (ग्रीस), इराण, कार्थेज इत्यादिकांच्या ऱ्हासाचा इतिहास व अर्वाचीन ग्रीस, इटली, दक्षिण व उत्तर अमेरिका, बेल्जियम, हॉलंड, ऑस्ट्रिया, जर्मनी, बल्गेरिया इत्यादींच्या पुनरुज्जीवनाचाही इतिहास अत्यंत अभ्यसनीय आहे. तोही सामर्थ्यानुरूप देण्याचा आमचा विचार आहे’, असा मनोदयही राजवाड्यांनी ‘उपोद्घाता’च्या शेवटी व्यक्त केला होता.

केवढा मोठा जागतिक इतिहासाचा पट राजवाडे आपल्या वाचकांसमोर मांडू पाहत होते! त्यामागचा हेतू हाच होता की, कधी काळी वैभवाच्या शिखरावर नांदणारा स्वदेश गुलामगिरीच्या खाईत का व कसा लोटला गेला, हे समाजाला समजावे आणि उत्थानाचा मार्गही गवसावा... त्या हेतूने त्यांच्या त्या मासिकाने कुठवर मजल मारली, हे पुढील लेखांकात.

**– आनंद हर्डीकर**

anand47.hardikar@gmail.com

# वैद्यकीचेही गलगोटियाकरण

## वैद्यकीय क्षेत्रात गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ हवे, तर फक्त प्रवेश प्रक्रियेतील बदल पुरेसे नाहीत. व्यवस्थेचा फेरविचार करताना खासगी संस्थांचे शुल्क नियमन करावेच लागेल...

**वैद्यकीय पदव्युत्तर** अभ्यासक्रम प्रवेशांतील घसरत्या गुणवत्तेची दखल थेट सर्वोच्च न्यायालयाला घ्यावी असे वाटले हे उत्तम झाले. वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रता गुणांमधील घट, त्यावरून सुरू असलेला वाद, सर्वोच्च न्यायालयाने केलेली टिप्पणी या सगळ्यातून आतापर्यंत अनेकदा टाळलेला प्रश्न भारतीय शिक्षण व्यवस्थेला पुन्हा एकदा जाचू लागल्याचे दिसते. तो म्हणजे व्यवहार सांभाळण्यासाठी गुणवत्तेस किती सैल सोडायचे. सर्वच पातळ्यांवरचा हा प्रश्न वैद्यकीय शिक्षणाबाबत अवघड जागचे दुखणे ठरणारा आहे.

वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दोन प्रवेश फेऱ्यांनंतरही जवळपास १८ हजार जागा यंदा रिक्त राहिल्या. महाविद्यालये आहेत, पायाभूत सुविधा आहेत मग जागा फुकट का दवडा असा फक्त व्यावहारिक पातळीवरील विचार करून वैद्यकीय परीक्षा मंडळाने प्रवेश पात्रता गुणांचा निकष शिथिल केला. त्यानुसार ८०० पैकी १०३ गुण खुल्या गटातील विद्यार्थ्यांसाठी, ९० गुण अपंग विद्यार्थ्यांसाठी आणि उणे ४० गुण अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी असे नवे निकष लागू केले. परीक्षा, पात्रता, चाचणी अशा सगळ्याच संकल्पनांना धुळीस मिळवणाऱ्या या नव्या निकषांना सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले नसते तरच नवल. त्याची दखल घेत सर्वोच्च न्यायालयानेही यामुळे गुणवत्तेवर काय परिणाम होतो हे तपासणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रात फक्त रिक्त जागा भरण्याला प्राधान्य द्यावे की गुणवत्ता सिद्ध करणारे मनुष्यबळ निवडून त्यांना अधिक शिक्षित करावे या प्रश्नाकडे अखेरीस व्यवस्थेला पाहावे लागणार आहे.

वैद्यकीय शिक्षण हे देशातील सर्वाधिक स्पर्धा असलेले आणि अत्यंत खर्चीक. वैद्यकीय पदवी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी १० ते १२ टक्केच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अभ्यासक्रमाला प्रवेश मिळतो. प्रवेश परीक्षेसाठी किमान दोन वर्षे तयारी, त्यानंतर लाखो रुपयांचे शुल्क भरून पदवीचे शिक्षण पूर्ण करून डॉक्टर झालेल्यांना पुढील शिक्षणासाठी पात्रता सिद्ध करायची गरज काय असा प्रश्न प्रवेश पात्रता गुण कमी करण्याचे समर्थन करताना शासन विचारते. वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेश परीक्षा म्हणजेच 'नीट-पीजी' ही पात्रता तपासण्यासाठी नाही, तर स्पर्धा अधिक असल्याने इच्छुकांची क्रमवारी ठरवण्यासाठी आहे, असे शासनाचे म्हणणे आहे. मात्र, प्रवेश परीक्षेत विचारण्यात येणारे प्रश्न हे वैद्यकीय अभ्यासक्रमावरीलच असतील तर अशा परीक्षेत उणे गुण किंवा अत्यल्प गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या डॉक्टरकी करण्याच्या क्षमतेवर, त्यांच्या पदवी शिक्षणाबाबतच प्रश्न उपस्थित करणारे ठरत नाही का याचा विचार करण्याची गरज शासनास वाटत नाही. यातील दुसरा मुद्दा हा अधिक रोकडा आणि व्यावहारिक. शासकीय महाविद्यालयांमध्ये खासगी महाविद्यालयांच्या तुलनेत कमी शुल्कात शिक्षण मिळते. खर्च आणि शुल्क यातील फरक हा करदात्यांच्या पैशातूनच चुकता होतो. पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी येणारे डॉक्टर हे त्या रुग्णालयाची प्राथमिक स्तरावरील मनुष्यबळाची गरज भागवतात. मग जागा रिक्त ठेवून आर्थिक नुकसान करून घ्यावे का, असा विचार महाविद्यालय-संचालक धार्जिणी व्यवस्था करते. त्यातूनच पात्रता निकष कमी करण्याचा अ-शैक्षणिक निर्णय घेतला जातो. मात्र छोटीशी चूक/ अकार्यक्षमता ही करदात्याच्या जिवावरच उठणारी असेल तर वैद्यकीय क्षेत्रातील मनुष्यबळाची भरती किंवा निवड ही फक्त जागा भरण्याची किंवा नगाला नग उभा करण्याची प्रक्रिया असू शकत नाही, या मूलभूत गोष्टीचा विसर व्यवस्थेला पडलेला दिसतो. व्यावहारिक किंवा आर्थिक समतोलासाठी गुणवत्तेशी तडजोड समर्थनीय ठरू शकत नाही.

त्याच वेळी जागा का रिक्त राहतात याकडे पाहावे लागेल. बहुतेक जागा या पात्र डॉक्टरांच्या अभावामुळे

> ...तो निर्णय राजकीयदृष्ट्या कटू, कारण शिक्षणसम्राट प्रत्येक पक्षात आहेत...

नाही; तर विशिष्ट अभ्यासक्रम पात्र विद्यार्थी नाकारत असल्यामुळे रिक्त आहेत. बाजारपेठीय आकर्षणे, विद्यार्थ्यांना करावी लागणारी आर्थिक गुंतवणूक हे याचे मूळ. रेडिओलॉजी, डर्मेटॉलॉजी (त्वचारोग), मेडिसिन अशा शाखांना विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद आहे. गेल्या काही वर्षांपासून शल्यचिकित्सा, मेंदुरोग, हृदयरोग, बालरोग अशांसारख्या जटिल, अधिक आव्हानात्मक शाखांपेक्षा विद्यार्थ्यांचा कल भविष्यातील धावपळ तुलनेने कमी असेल अशा शाखांकडे वाढता आहे. यामागील सामाजिक कारणाकडे दुर्लक्ष करून चालणारे नाही. अलीकडे डॉक्टरांवर होणारे हल्ले, विविध कारणांसाठी त्यांना जबाबदार धरण्याचा वाढू लागलेला कल यामुळे अनेक विद्यार्थी जेथे समाजाचा फारसा संबंध येणार नाही आणि आणीबाणीची परिस्थिती निर्माण होणार नाही अशा शाखा निवडतात. त्वचारोग, किरणोत्सारी उपचार, औषधशास्त्र इत्यादी शाखांस अधिक मागणी आहे ती यामुळे. दुसरा मुद्दा प्रवेशासाठी कराव्या लागणाऱ्या आर्थिक तरतुदीचा. हा आणखी एक प्रश्न. वैद्यकीय पदवी असो किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रम - गुणवत्ता असूनही, प्रवेश परीक्षेत ती सिद्ध करूनही शुल्क भरण्याची क्षमता नाही म्हणून प्रवेश न घेणारे अनेक विद्यार्थी दिसतात. खासगी महाविद्यालयांतील कोट्यवधी रुपयांचे शुल्क भरता येत नाही म्हणून प्रवेशापासून वंचित राहावे लागणारे आणि गुणवत्ता नाही हे सिद्ध होऊनही ऐपत आहे म्हणून प्रवेश मिळू शकणारे अशी दरी या क्षेत्रात दिसते. त्यासाठी खासगी संस्थांच्या शुल्काचे नियमन करण्याचा विचार होणे गरजेचे आहे.

सरकार वैद्यकीय क्षेत्रात काही बरे करू इच्छिते. त्याचे सूतोवाच या महिन्याच्या एक तारखेला मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पात आढळते. वैद्यकीय पर्यटनाला प्रोत्साहन देण्याचा मानस व्यक्त करून त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे येत्या काळात या क्षेत्रात अधिक सक्षम, तज्ज्ञ मनुष्यबळाची गरज अर्थातच भासणार आहे. किंबहुना आताही देशाची वैद्यकीय मनुष्यबळाची गरज पुरती भागत नाही. मात्र, गरज आहे म्हणून गुणवत्तेकडे काणाडोळा करत केवळ मनुष्यबळ पुरवठ्याचा विचार करणे निदान या क्षेत्रासाठी तरी रास्त ठरणारे नाही. तसे करणे व्यवस्थेच्या विश्वासार्हतेला बाधक आहे, याची जाणीव न झाल्यास येत्या काळात नव्याने वैद्यकीय पर्यटनाचे क्षेत्र काबीज करण्याचे स्वप्न दूर, आहे ती वैद्यकीय व्यवस्थाही जीर्ण होईल.

आणखी विचारात घ्यावी अशी बाब म्हणजे ग्रामीण भागातील रुग्णालये, जिल्हा रुग्णालये येथे विशेषज्ञांच्या अनेक जागा बराच काळ रिक्त आहेत. त्याचा परिणाम रुग्णसेवेवर आणि कार्यरत मनुष्यबळावरही होत आहे. त्या जागांवर मनुष्यबळ मिळावे म्हणून गुणवत्तेचे निकष शिथिल करणे ही एक प्रकारे अमानुषताच. गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ मिळण्यासाठी फक्त प्रवेश प्रक्रियेतील बदल पुरेसे ठरणारे नाहीत. तर एकूण व्यवस्थेचा सर्वंकष विचार करावा लागेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे खासगी संस्थांचे शुल्क नियमन करण्याचा राजकीय कटू निर्णय घ्यावा लागेल. ही खरी कसोटी. कारण गलेलठ्ठ शुल्क आकारून गलेलठ्ठ झालेले शिक्षणसम्राट तसे होऊ देणार नाहीत. हे शिक्षणसम्राट सर्वच पक्षांत आहेत. त्यातही सत्तेवर असलेल्या पक्षाच्या सावलीत आसरा घेण्यात त्यांचा आर्थिक स्वार्थ असतो आणि सत्ताधीशांचा राजकीय. त्यामुळे हे साटेलोटे नेहमीच परस्परपूरक राहिलेले आहे. ते तोडण्याचे धैर्य सद्य:स्थितीत कोणीच दाखवणार नाही. याखेरीज काही विषय किंवा शाखांच्या प्रवेशासाठी, भौगोलिक परिस्थितीनुसार विशेष योजना किंवा सवलत देणे असा पर्याय तज्ज्ञांकडून सुचवण्यात येत आहे. त्याचाही विचार करावा लागेल. विद्यार्थी मिळत नाहीत म्हणून प्रवेशाचे निकष अधिकाधिक शिथिल करत जाण्याचा गेल्या काही वर्षांचा शिरस्ता मोडीत न काढल्यास गुणवत्ता ही संकल्पना निरर्थक ठरेल. त्यातून वैद्यकीय शिक्षणाचेही गलगोटियाकरण होण्याचा स्पष्ट धोका आहे. त्याकडे दुर्लक्ष केल्यास जिवावर बेतेल.

# 'शक्तिपीठ महामार्गा'चा अट्टहास कुणासाठी?

लेख

वसंत भोसले
ज्येष्ठ पत्रकार
bhosalevasant@gmail.com

> कोणत्याही बाजूने समर्थन करता येऊ शकत नाही, अशा सुमारे २७ हजार शेतजमीन वाया घालवणाऱ्या या शक्तिपीठ महामार्गाचा अट्टहास का केला जात आहे? यात कोणाचे आर्थिक हितसंबंध आहेत? यातून कोणाला आर्थिक लाभ होणार आहे?

**शक्तिपीठ महामार्गाच्या** विरोधात राज्यात वातावरण तापू लागले आहे. विधिमंडळ अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर नुकतेच राज्यात ठिकठिकाणच्या शेतकऱ्यांकडून आंदोलन करण्यात आले. त्यातच नागपूर ते गोवा या शक्तिपीठ महामार्गाचे रेखांकन बदलून सातारा जिल्ह्यातील काही तालुके जोडून घेण्याचा उद्योग नव्याने सुरू करण्यात आला असल्यामुळेही शेतकरी नाराज आहेत. कारण यामुळे महामार्गाचे अंतर फारसे कमी झालेले नसले तरी खर्चात मात्र २२ टक्के वाढ होऊन हा प्रकल्प एक लाख पाच हजार कोटी रुपयांपर्यंत फुगविण्यात आला आहे.

शक्तिपीठ महामार्ग हा नागपूर ते गोवा असा असला तरी त्याची सुरुवात वर्धा जवळील पवनारपासून होणार असून तो गोव्यातील पात्रदेवीपर्यंत असेल. हा मार्ग १२ जिल्ह्यांतून ३९ तालुक्यांतील सुमारे ३७० गावांच्या शेतजमिनींवर वरवंटा फिरवत जाणार आहे. या महामार्गाची आखणी करण्यात आली तेव्हा तो सांगली, कोल्हापूर ते सिंधुदुर्ग असा होता. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केल्याने बदल करून उस्मानाबाद जिल्ह्यातून, सोलापूर जिल्ह्याच्या काही भागातून, सातारा जिल्हा आणि सांगलीच्या पश्चिम बाजूने आणि कोल्हापूर शहराच्या पश्चिम बाजूने सिंधुदुर्ग जिल्ह्याला जोडणारे रेखांकन तयार करण्यात आले आहे.

शक्तिपीठ महामार्गाच्या मूळ आखणीनुसार सांगली शहराच्या उत्तर बाजूने हा मार्ग कोल्हापूर जिल्ह्यात जाणार होता आणि कोल्हापूर शहराच्या पूर्वेकडून तो दक्षिणेकडे आखण्यात आला होता. सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील या महामार्गाची जमीन ओलिताखाली आहे. या परिसरातून कृष्णा खोऱ्यातील सहा प्रमुख नद्या वाहतात. लहान-मोठ्या नद्यांचेही प्रवाह याच मार्गावर येतो. बदलत्या हवामानामुळे होणाऱ्या प्रचंड पावसाचा फटका कृष्णा खोऱ्यातील सर्वच नद्यांच्या पूर नियंत्रण रेषेत येणाऱ्या गावांना बसतो. पुराचा धोका गेल्या काही वर्षापासून वाढलेला आहे. असे असताना याच भागातून शक्तिपीठ महामार्ग झाल्यास मोठ्या प्रमाणात पाणी अडण्याचा आणि महापुराचा धोका कृष्णा खोऱ्यात निर्माण होणार आहे. पिकाऊ जमीन रस्त्याच्या कामासाठी घेण्यास शेतकऱ्यांचा विरोध आहेच. नागपूर ते रत्नागिरी महामार्ग याच महामार्गाला समांतर आहे. ज्या तीर्थक्षेत्रांना जोडण्याच्या उद्देशाने हा महामार्ग आखण्यात आलेला आहे तिथे जाण्यासाठी उत्तम रस्ते आहेत. त्यासाठी आणखी वेगळ्या महामार्गाची गरज नाही, म्हणून शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यात यावा. असे शेतकऱ्यांची मागणी आहे.

### समांतर महामार्ग

नागपूर ते गोवा महामार्ग राज्यातील ज्या १२ जिल्ह्यांतून जाणार आहे त्यापैकी सिंधुदुर्ग वगळता ११ जिल्ह्यांतून नागपूर ते रत्नागिरी महामार्ग जातोच आहे. विदर्भ आणि मराठवाडा तसेच दक्षिण महाराष्ट्र गोव्याशी जोडण्यासाठी तो उत्तम आहे. कोल्हापुरातून नागपूर ते रत्नागिरी महामार्ग सोडून गोव्याकडे वळण घेण्यासाठी पाच मार्ग आहेत. शिवाय बेळगाव मार्गेही थेट दक्षिण गोव्यात जाता येते. यासाठी पुणे- बंगलोर राष्ट्रीय महामार्ग या मार्गाने गोव्याकडे जाणारी सर्व वाहतूक सुरू आहे. कोल्हापूरचे वैशिष्ट्य असे की, पश्चिम घाटातून कोकणात उतरण्यासाठी या जिल्ह्यातून सहा घाट आहेत. याउलट कोकणला लागून असलेल्या उर्वरित महाराष्ट्रासाठी सरासरी दोन किंवा तीन घाट रस्ते आहेत. कोल्हापूरहून रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गोवा आणि कर्नाटकाच्या किनारपट्टीकडे जाण्यासाठी आठ मार्ग असताना पुन्हा नवा घाट किंवा महामार्ग करून गोव्याला जोडण्याची गरज नाही. यातून पश्चिम घाटातील पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील आणि संरक्षित क्षेत्रातून मार्ग काढावा लागणार आहे. यासाठी पर्यावरण खात्याची मंजुरी आवश्यक आहे. पश्चिम घाटातील जैवविविधतेला तसेच वन्यजीव प्राण्यांच्या अधिवासाला यामुळे धक्का पोहोचणार आहे.

शक्तिपीठ महामार्गाला केवळ कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतूनच विरोध आहे, या धारणेतून तो टाळण्यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. शक्तिपीठ महामार्गाच्या समर्थनार्थ काही लोकांना उभे करण्यात आले आहे. काही लोक 'मूळ आराखड्यानुसार शक्तिपीठ करण्यात यावा' अशी मागणी पुढे रेटण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहेत. धार्मिक स्थळांना जोडणारा मार्ग असे धार्मिक वळण त्याला देण्याचाही प्रयत्न सुरू आहे. मात्र ज्या शक्तिपीठांना या महामार्गाने जोडण्यात येणार आहे, त्या सर्व तीर्थक्षेत्रांना जाण्यासाठी उत्तम रस्ते आहेत. नागपूर ते रत्नागिरी या रस्त्याने सर्वच तीर्थक्षेत्रांना जाण्याची अधिक उत्तम सोय आहे.

### वडनेरे समितीचा अहवाल

नागपूर ते रत्नागिरी महामार्गाला सरासरी ५० ते ६० किलोमीटर अंतराने समांतर जाण्याने शक्तिपीठ महामार्गावर वाहतूक फारशी येणार नाही. शक्तीपीठ मार्गावर वाहतूक वाढली तर नागपूर ते रत्नागिरी महामार्गाच्या टोलवसुलीवर मोठा परिणाम होईल. आताही या महामार्गावर ज्या टोल नाक्यांवर दररोज २० लाख रुपये टोल जमा होण्याची अपेक्षा होती तेथे दहा ते बारा लाख रुपये देखील जमा होत नाहीत. रस्ते महामार्ग विभागाचे अधिकारी खासगीत 'शक्तिपीठ महामार्ग करण्यात येऊ नये', असे मत मांडतात. पण त्यांना विचारतो कोण? कारण राजकीय नेत्यांचे या महामार्गात हितसंबंध आहेत, असे सांगितले जात आहे.

शक्तिपीठ महामार्गाचा मूळ आराखडा ८२८ किलोमीटरचा होता आणि त्यासाठी ८६ हजार कोटी रुपये खर्च येणार होता. शेतकऱ्यांनी विरोध सुरू करताच याचे रेखांकन बदलण्यात आले आणि तो सातारा जिल्ह्यातील माण आणि खटाव तसेच सांगली जिल्ह्यातील कडेगाव, पलूस आणि वाळवा तालुक्यांतून आखण्यात आला. कोल्हापूर जिल्ह्यात हा महामार्ग शहराच्या पश्चिम भागातून पुढे जाणार असे सांगण्यात येत आहे. वास्तविक कोल्हापूरच्या पश्चिम भागामध्ये प्रचंड पाऊस होतो. तिथली जमीन दलदलीची आहे. सरासरी एक हेक्टरपेक्षा कमी जमीनधारणा असलेल्या शेतकऱ्यांची संख्या ९५ टक्के आहे. याच परिसरातून पश्चिम घाटातून उगम पावणाऱ्या अनेक छोट्या-मोठ्या नद्या पूर्वेकडे वाहतात. या सर्व नद्यांना पावसाळ्यामध्ये दोन-तीन वेळा पूर येतो. कमी कालावधीमध्ये एक-दोन मोठे पाऊस झाले तर महापूर येतो. सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील नद्यांवरून राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावर ठिकठिकाणी पूल बांधण्यात आलेले आहेत. शिवाय मोठ्या संख्येने कोल्हापूर पद्धतीचे बंधारे घालण्यात आलेले आहेत. या बंधाऱ्यांमुळे तसेच रस्त्यांच्या भरावामुळे तसेच पुलांच्या भरावामुळे अनेक ठिकाणी पाणी अडले जाते. महापुराच्या कारणांचा शोध घेण्यासाठी नेमण्यात आलेल्या वडनेरे समितीने कृष्णा खोऱ्यातील सर्वच नदी पात्रांच्या बाजूने अतिक्रमणे झालेली आहेत. पूर नियंत्रण रेषेतील शेत जमिनीमध्ये झालेले बदल तसेच झालेले नागरीकरण आदी कारणे दिली आहेत.

महापुराच्या नियंत्रणासाठी कोणत्याही उपाययोजना न करता गेली २० वर्षे हे अहवाल तसेच पडून आहेत. कृष्णा खोऱ्यातील सर्वच नद्यांवर असलेल्या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस होतो. तेव्हा धरणातील पाणीसाठाचे व्यवस्थापन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी सोडावे लागते. गेल्या मान्सूनमध्ये कोयना धरणातून अतिरिक्त ठरलेले ७२ टीएमसी पाणी सोडून देण्यात आले. प्रचंड पाऊस आणि धरणांची साठवण क्षमता लक्षात घेऊन पाण्याचे नियोजन करण्यात येते. या दोन्ही कारणामुळे नद्यांना महापुराचा धोका आता कायमचा झाला आहे.

ज्या १२ जिल्ह्यांतून शक्तिपीठ महामार्गाची आखणी करण्यात आली आहे, त्या सर्व जिल्ह्यांत एक तरी राष्ट्रीय महामार्ग आहे. अनेक राज्य मार्ग आहेत. या सर्व जिल्ह्यांमध्ये वाहतुकीसाठी कोणतीही अडचण नाही. नागपूर ते रत्नागिरी महामार्गाचे सांगली ते रत्नागिरीपर्यंतचे काम व्हायचे आहे. ते झाल्यानंतर वाहतुकीची गरज लक्षात घेऊन नव्या मार्गाची आखणी करावी अशी अपेक्षा होती. असे असताना सुमारे २७ हजार शेतजमीन वाया घालवणारा हा महामार्ग करण्याचा अट्टहास का? यात कोणाचे आर्थिक हितसंबंध आहेत का, या महामार्गातून कोणाला आर्थिक लाभ होणार आहे असे प्रश्न उपस्थित होऊ शकतात. शिवाय हा महामार्ग झाल्यानंतर त्यामध्ये गुंतवण्यात येणाऱ्या एक लाख पाच हजार कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रातील जनतेला सव्याज परत करावी लागणार आहे. पुढील ३० वर्षात जवळपास ३० लाख कोटी रुपये यातून वसूल केले जाऊ शकतात, असा अंदाज आहे. त्यामुळे हा शक्तिपीठ महामार्ग म्हणजे कंत्राटदारांना कायमस्वरूपी पैसे मिळवून देणारा महाशक्तिपीठ महामार्ग ठरू शकतो. कोणत्याही परिस्थितीत हा महामार्ग करण्याचा राज्य सरकारचा अट्टहास आहे. त्यासाठीच पोलीस बळाचा वापर करून शेतकऱ्यांना भीती दाखवण्यात येत आहे.

शक्तिपीठ महामार्गामध्ये येणाऱ्या जवळपास सर्व जिल्ह्यांतून विरोध होतो आहे. सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातून होणाऱ्या विरोधाचे महत्त्वाचे कारण म्हणजे हा मार्ग ज्या भागातून जाणार आहे तो सर्व बारमाही पिकांचा भाग आहे. सर्वत्र पाणी योजना झालेल्या आहेत. विविध प्रकारची पिके घेतली जातात. ऊस शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. शिवाय या दोन्ही जिल्ह्यांमधून एक डझन नद्या वाहतात या सर्व नद्यांचा उगम पश्चिम घाटात झालेला आहे. या नद्यांना दरवर्षी पूर येतो. तो कधीही महापुरामध्ये रूपांतरित होऊ शकतो. परिणामी महापूर प्रवण क्षेत्रातील जमिनी मोठ्या प्रमाणात खराब होतात. पिके नष्ट होतात. अनेकांची घरे, जनावरे वाहून जातात.

### महापुराचा फटका

२०१९ मध्ये आलेल्या महापुरात राज्य शासनाला ११ हजार कोटी रुपयांची मदत द्यावी लागली होती. शिवाय मनुष्यबळाची आणि पर्यावरणाची हानी वेगळीच. त्यामुळे शक्तिपीठ महामार्ग म्हणजे शेतकऱ्यांच्या डोक्यावर हातोड्याचे घाव घालण्याचा प्रकार आहे. आणखी एका महामार्गाद्वारे वाहनधारकांना थेट लुटण्याचा आजन्म परवाना आहे. या महामार्गाचा आराखडा बदलला तरी जे मूलभूत प्रश्न उपस्थित होतात, त्यांना उत्तर नाही. याच परिसरामध्ये रेल्वेचे दुपदरीकरण झाले, अनेक राष्ट्रीय आणि राज्य मार्ग झाले, कोकणामध्ये मुंबई -गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण झाले. यापैकी कोणत्याही प्रकल्पाला लोकांनी, विशेषतः शेतकऱ्यांनी विरोध केला नाही. नागपूर ते रत्नागिरी महामार्गालाही कधीही विरोध करण्यात आला नाही. आता तो होतो आहे, कारण त्याच महामार्गावर दुसऱ्या महामार्गाची गरज नाही एवढेच शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

अन्वयार्थ

# 'प्रहार'पूर्वीची खबरदारी!

**भारत आणि** पाकिस्तान यांच्यात गेल्या काही वर्षांत तीन वेळा मर्यादित युद्ध (ऑपरेशन सिंदूर), युद्धसदृश परिस्थिती (बालाकोट हल्ले) आणि आंतरसीमा कारवाई (सर्जिकल स्ट्राइक) असे संघर्षाचे प्रसंग उद्भवले, त्या तिन्हींच्या मुळाशी पाकिस्तान पुरस्कृत प्रशिक्षित, प्रेरित दहशतवादी हल्ले होते. उरी तळावर झालेल्या हल्ल्यातून सर्जिकल स्ट्राइकची कारवाई झाली. पुलवामात झालेल्या भीषण हल्ल्यातून बालाकोटची कारवाई झाली आणि पहलगामला गेल्याच वर्षी झालेल्या नृशंस दहशतवादी हल्ल्यातून 'ऑपरेशन सिंदूर' घडले. दहशतवादी हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून आपण सीमेपलीकडील दहशतवादी केंद्रे, तळांवर हल्ला करण्यास कचरणार नाही. वेळ पडल्यास आणि तसे करणे भाग पाडल्यास पाकिस्तानी लष्करी आस्थापनांनाही लक्ष्य केले जाईल हे 'ऑपरेशन सिंदूर'ने दाखवून दिले, ते योग्यच. पण दहशतवादी हल्ले थांबत नाहीत आणि प्रत्युत्तर-प्रतिसाद म्हणून सीमेपलीकडे हल्ले करण्यास काही मर्यादा येतात. अशा हल्ल्यांतून एक दिवस युद्धाचा भडका उडू शकतो. कोणी कितीही युद्धज्वर तापवला तरी युद्धाचे परिणाम विध्वंसक असतात आणि सर्वाधिक नुकसान सीमावर्ती भागात राहणाऱ्या तळागाळातील नागरिकांचेच सर्वाधिक होते. तेव्हा युद्धसज्जता ही आपली जबाबदारी असली, तरी दहशतवादी हल्ल्यांना प्रतिबंध करण्यावरही लक्ष केंद्रित करावेच लागेल. केंद्राच्या 'प्रहार' या पहिल्यावहिल्या दहशतवादविरोधी धोरणाकडे या पार्श्वभूमीवर पाहावे लागेल. या धोरणाची घोषणा गेल्या वर्षी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली होती. दहशतवादी हल्ल्यांना प्रतिसाद देण्यापेक्षाही त्यांस प्रतिबंध करणे हे अधिक योग्य धोरण ठरते. आपल्याकडे प्रतिसादाच्या बाबतीत जशी पुरेशी एकात्मिकता दिसून येत नाही, तीच बाब काही प्रमाणात प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या बाबतीतही अनुभवावयास येते. 'प्रहार' धोरणाअंतर्गत प्राधान्याने एकात्मिकता आणि एकवाक्यता यांचा अंतर्भाव करण्यात येत आहे.

भारत हा अजस्र देश आहे. त्यामुळे धोरणात्मक अंमलबजावणीत काही प्रमाणात विस्कळीतपणा येतोच. कित्येक दहशतवादी हल्ल्यांची पूर्वसूचना मिळूनही समन्वयाअभावी ते थोपवले गेले नव्हते. दहशतवादी हल्ले या देशामध्ये गेली किमान ४० वर्षे होत आहेत. तरीदेखील प्रतिसाद, चौकशी, प्रकटीकरण, दहशतवादविरोधी पथकांची उभारणी आणि प्रशिक्षण या महत्त्वाच्या बाबींना संस्थात्मक अधिष्ठान लाभलेले नाही हे वास्तव. मुंबईत २६/११च्या दहशतवादी हल्ल्यांनंतर एनआयएसारख्या संस्थेची स्थापना झाली. त्याआधीही मुंबई पोलिसांकडे स्वतःचे दहशतवादविरोधी पथक होतेच. पण इस्रायल किंवा अमेरिकेप्रमाणे दहशतवादी हल्ल्यांनंतर उच्चप्रशिक्षित शीघ्र कृतिदलाची उभारणी झालेली नव्हती. अशा हल्ल्याच्या वेळी पुरेशी खबरदारी न घेतल्याचा काय परिणाम होतो याची दुःखद प्रचीती त्यावेळी तीन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मृत्यूतून आली होती. नवीन सहस्रकात पहिल्या दशकात किंवा सरत्या शतकाच्या अखेरच्या दशकात मुंबई आणि देशात इतरत्र लहान-मोठे दहशतवादी हल्ले झाले. गेल्या १५ वर्षांत त्यांची वारंवारिता कमी झाली, पण तीव्रता कमी झालेली नाही हे कटु वास्तव. असे हल्ले थांबवण्यासाठी आणि ते घडलेच, तर हल्लेखोर आणि हस्तकांना योग्य तो धडा शिकवण्यासाठी सात सूत्रांचे 'प्रहार' धोरण आखण्यात आले आहे.

दोन लक्षणीय बाबी म्हणजे या मसुद्यात पाकिस्तानचा थेट उल्लेख नाही. तसेच, दहशतवादाचा संबंध विशिष्ट धर्म, वंश, राष्ट्रीयत्व किंवा संस्कृतीशी आम्ही जोडत नाही, अशी ग्वाही निःसंदिग्ध शब्दांत देण्यात आली आहे. या भूमिकेचे विशेष स्वागत. कारण दहशतवाद किंवा दहशतवाद्यांना विशिष्ट रंगात दाखवण्याची प्रवृत्ती अलीकडे वाढू लागली आहे. दहशतवादी 'त्यांच्यातले'च कसे, असा प्रश्न आजही सर्रास उपस्थित केला जातो. मूलतत्त्ववादाचे आकर्षण तरुणांमध्ये वाढू नये, याविषयी उपाययोजनांची चर्चा या धोरणात आहे. यासाठी नेमस्त धर्मोपदेशकांची मदत घेतली जाईल, असेही नमूद आहे. पण नेमस्तपणा हा सापेक्ष असतो. तो सरकार कसा ठरवणार नि त्यासाठीचे निकष कोणते, हे स्पष्ट नाही. दहशतवादाच्या आधुनिक आणि व्यामिश्र स्वरूपाविषयी सविस्तर ऊहापोह आहे. डिजिटल, आर्थिक, समाजमाध्यमी दहशतवादाची योग्य मीमांसा आहे. जमीन, हवा किंवा पाणी अशा तिन्ही माध्यमांतून दहशतवादी हल्ले होऊ शकतात, याकडे लक्ष वेधण्यात आले आहे. त्या दृष्टीने हा धोरण मसुदा सखोल आणि दूरगामी आहे. आता प्रतीक्षा आहे सुयोग्य, सुनियोजित आणि सर्वसमावेशक अंमलबजावणीची. कारण प्रहार करण्याची वेळच येऊ नये, यासाठी खबरदारी घेणे केव्हाही हितकारकच.

# भारत-अमेरिका कापड व्यापार सुधारण्याची शक्यता किती?

विश्लेषण

दयानंद लिपारे
dayanand.lipare@expressindia.com

> कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ज्या 'आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे' पडत्या भावात विक्री करावी लागते आहे, ती परिस्थिती प्रामुख्याने अमेरिकी आयात शुल्कांशीच संबंधित आहे...

### भारतीय वस्त्रोद्योगाबाबत अमेरिकेचे धोरण काय?

अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प यांचे शुल्कविषयक निर्णय बेकायदा ठरवल्यामुळे या आठवड्यात पुन्हा ट्रम्प यांनी १५ टक्के हा शुल्कदर जाहीर केला. आधीच्या ५० टक्क्यांपेक्षा हे शुल्क कमी असल्याने 'करारामुळे देशातील वस्त्रोद्योगाची भरभराट होणार' अशी शक्यता व्यक्त केली गेली. प्रत्यक्षात चित्र वेगळे आहे. खुद्द अमेरिकेशी होणारा कापडव्यापार सोडाच, उलट 'अमेरिका-बांगलादेश व्यापार करारा'त अमेरिकी कापडविक्री वाढवण्याच्या आयात-अटी अमेरिकेने लादल्यामुळे, भारतातून बांगलादेशकडे होणाऱ्या कापडनिर्यातीची स्पर्धात्मकता लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. भारतातील कामगारभिमुख क्षेत्रावर त्याचा गंभीर आर्थिक परिणाम जाणवू लागला आहे. भारतातील सुती कपडे, डेनिम कापड सुमारे ३० टक्के महाग झाले. अमेरिकेने भारतावर लावलेल्या चढ्या करांमुळे वस्त्रोद्योगात ऑर्डर थंडावल्या आहेत.

### अमेरिकी कापूस वि. भारतीय कापूस?

अमेरिकेत कापसाचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. लांब धाग्याचा कापूस या उद्योगात अधिक किमतीला खरेदी केला जातो. अमेरिकेत सुमारे ९.८ दशलक्ष एकरांवर दरवर्षी १५-१८ दशलक्ष गाठींचे उत्पादन होते. अमेरिकेच्या कापसाची सातव्या क्रमांकांची मोठी बाजारपेठ असलेल्या भारताने २०२४ मध्ये अंदाजे २०९ दशलक्ष डॉलर्स किमतीचा कापूस आयात केला होता. ताज्या व्यापारी करारानुसार अमेरिकेतील कापूस भारतात आयात होण्याचे प्रमाण आणखी वाढणार, याचे संकेत मिळाल्याने भारतातील कापसाच्या दरात घसरण होताना दिसत आहे. भारतीय कापूस महामंडळाने आठवड्याभरात दोन वेळा कापसाच्या विक्री किमतीत कपातीची घोषणा केली आहे. पंधरवड्यापूर्वी प्रति खंडी (३५६ किलो) ५६ हजार ५०० रुपये असणारा कापूस सुमारे १ हजार रुपयांनी घसरून ५५ हजार ५०० रुपये झाला आहे. आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत बाजारात कापूसदर घसरलेच आहेत म्हणून, विक्री वाढण्यासाठी सीसीआयला आपली किंमत कमी करावी लागली, असे सांगितले जाते.

### सूत दरात चढउतार किती आणि का?

सुताचा वापर कोणत्या श्रेणीतील कापडासाठी होतो त्यानुसार सूत दरातील चढउतार होत आहेत. ३२ काउंटचे (सुताची जाडी मोजण्याचे परिमाण) सूत १३०० रुपये प्रति किलोवरून १२८० रुपये (प्रति किलो चार ते पाच रुपये) घसरले असल्याचे महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महासंघाचे अध्यक्ष अशोक स्वामी सांगतात. दुसरीकडे, जुनाट पुरवठा साखळी आणि उच्च व्यवस्थापन खर्च हा सूतगिरण्यांना व्हिएतनाम, बांगलादेशसारख्या राष्ट्रांविरुद्ध स्पर्धात्मकतेला अडथळा आणत आहे.

### या साऱ्याचा परिणाम काय?

सुताचे दर घसरल्याने पॉपलिन, ग्रे, केंब्रिक आदी प्रकारचे कापड दर प्रति मीटर ५० पैसे इतके उतरले आहेत. आधीच कच्च्या मालाच्या वाढत्या किमती, १५ ते २० टक्के वाढलेला उत्पादन खर्च, २५०० रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या कपड्यांवर वाढवलेला वस्तू आणि सेवा कर यामुळे भारतीय कपड्यांच्या किमती वाढत आहेत. शिवाय, आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकतेवरही अमेरिकेच्या उच्च शुल्काचा परिणाम होत असल्याने भारतीय कापड बांगलादेशसारख्या स्पर्धकांपेक्षा ३० टक्के महाग विकले जाते. कमी होत असलेली मागणी, उच्च चलनवाढ, आर्थिक अनिश्चितता यामुळे वस्त्र उद्योगात अस्थिरतेचे संकेत मिळत असल्याचे निरीक्षण इचलकरंजी पॉवरलूम असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील नोंदवतात.

### ही अनिश्चितता संपेल का?

भारत - अमेरिका कापूस/ कापड व्यवहाराबाबत दीर्घकालीन सकारात्मक दृष्टिकोन बाळगणेच सध्या हाती आहे. सर्वात मोठी निर्यात बाजारपेठ असलेली अमेरिका आणि युरोपियन महासंघाची निर्यात घटल्यामुळे वस्त्रोद्योगातील अनिश्चितता वाढत आहे. ही कोंडी भारताने आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे भान ठेवून पावले उचलल्याखेरीज सुटणार नाही.

> जे आपल्याला केवळ माहिती देत नाही तर आपले जीवन अस्तित्वात असलेल्या सर्वांशी सुसंगत बनवते ते म्हणजे सर्वोत्तम शिक्षण.
>
> **– रवींद्रनाथ टागोर**

**स्पर्धा परीक्षेच्या प्रांगणात**
**एमपीएससी**
रोहिणी शहा

## राज्यसेवा मुख्य परीक्षा : सामान्य अध्ययन (पेपर दोन)

# आंतरराष्ट्रीय संघटना

**राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या सामान्य अध्ययन पेपर दोनच्या तयारीबाबत मागील लेखांमधून चर्चा करण्यात आली. या चर्चेच्या आधारे पेपर दोनमधील आंतरराष्ट्रीय संघटना या मुद्द्यावरील प्रश्नाचे उत्तर या लेखामध्ये पाहू.**

**प्रश्न: ''दहशतवाद हा जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी गंभीर धोका बनला आहे.'' या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या दहशतवादविरोधी समिती ( उळउ) व तिच्या संलग्न संस्थांच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करा. (१५ गुण २५० शब्द)**

**प्रश्नाचे विश्लेषण–**

प्रश्नामुळे मुद्दे आधी समजून घेऊ. जागतिक शांतता आणि सुरक्षेसाठी दहशतवादाचा धोका; याबाबत दहशतवाद विरोधी समिती व तिच्या संलग्न संस्थांची परिणामकारकता आणि तिचे मूल्यमापन. या तीन मुद्द्यांवर आधारित उत्तर लिहिताना पुढील पायऱ्या वापरता येतील.

- जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी दहशतवाद कशाप्रकारे गंभीर धोका बनला आहे, यावर थोडक्यात भाष्य करा.
- संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची दहशतवादविरोधी समिती ( CTC ) आणि तिच्या संलग्न संस्थांची आंतरराष्ट्रीय पातळीवरील दहशतवाद रोखण्यातील व त्याचे शमन करण्यातील भूमिका स्पष्ट करा.
- समितीच्या दहशतवादविरोधी प्रयत्नांपुढील आव्हानांचे विश्लेषण करा.
- उळउच्या कार्यक्षमतेच्या मूल्यमापनावर भर देणे आवश्यक आहे. त्यामुळे उपाययोजना थोडक्यात सुचवून उत्तराचा समारोप करा.

**उत्तर:**

दहशतवाद म्हणजे राजकीय किंवा सामाजिक उद्दिष्टांसाठी हिंसा व भीतीचा वापर. आज तो जागतिक शांतता, आर्थिक स्थैर्य व सामाजिक सलोखा यांना गंभीर धोका निर्माण करतो. उदा. २००८ मुंबई हल्ल्यांमुळे भारताला सुमारे २ अब्ज डॉलर्सचे आर्थिक नुकसान झाले. ISIS च्या उदयामुळे मध्यपूर्वेत लाखो लोक विस्थापित झाले. तसेच, क्राइस्टचर्च (२०१९) घटनेमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर धार्मिक तणाव वाढवला.



अमेरिकेतील २००१ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर, आंतरराष्ट्रीय दहशतवाद रोखण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने दहशतवादविरोधी समितीची ( CTC ) स्थापना केली.

**CTC ची भूमिका व परिणामकारकता:**

- **सदस्य राष्ट्रांना कायदेशीर चौकट मजबूत करण्यासाठी मार्गदर्शन:** दहशतवादाला निधीपुरवठा हा गुन्हा ठरविणे, मालमत्ता गोठविणे यासाठी सदस्य राष्ट्रांना कायदे करण्यात मार्गदर्शन.
- **आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविणे:** गुप्त माहितीची देवाणघेवाण व संयुक्त कारवाया सुलभ करण्यासाठी सदस्य राष्ट्रांमध्ये समन्वय साधणे
- **प्रशिक्षण आणि क्षमता विकास:** सदस्य राष्ट्रांच्या अंमलबजावणी यंत्रणेसणप्रशिक्षण व तांत्रिक मदत करणे.
- **प्रतिबंधात्मक निर्बंधांची अंमलबजावणी:** आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांवर प्रवासबंदी, शस्त्रबंदी लागू करणे.
- **वित्तीय कारवाई कृती दल ( FATF) आणि इंटरपोलबरोबर समन्वय:** दहशतवादी वित्तपुरवठ्यावर नियंत्रण साधणे.

**मर्यादा व आव्हाने:**

- **राजकीय मतभेद:** स्थायी सदस्यांच्या नकाराधिकारामुवळे ठोस कारवाईत अडथळे. उदा. सिरीयाबाबत रशिया व चीनचा नकाराधिकार
- **सार्वभौमत्वाचा प्रश्न:** सदस्य राष्ट्रांचा अंतर्गत कायदा निर्मिती आणि निर्णय प्रक्रियेत बाह्य हस्तक्षेपास विरोध.
- **संसाधनांची कमतरता:** विकसनशील देशांत अंमलबजावणीत अडचणी.
- **तंत्रज्ञानाचा दुरुपयोग:** एनक्रिप्टेड प्लॅटफॉर्मचा वापर केल्यने दहशतवादी कारवायांवर नियंत्रण आणण्यात अडचणी.
- **मानवाधिकार संतुलन:** कठोर कायद्यांमुळे नागरिकांच्या अधिकारांवर मर्यादा. उदा. वAPA किंवा AFSPA कायदे
- **दहशतवादाचे बदलते स्वरूप:**
  पारंपरिक संघटित गटांऐवजी स्थानिक पातळीवरील लोन-वुल्फ हल्ले - तपासात अडचणी

एकूणच, CTC ने आंतरराष्ट्रीय चौकट उभी केली असली तरी प्रभावी अंमलबजावणी व राजकीय एकमत यांवर तिचे यश अवलंबून आहे. यासाठी बहुपक्षीय सहकार्य, समन्वय, तंत्रज्ञानाच्या आधारे देखरेख, जनजागृती आणि मानवाधिकारांचा सन्मान राखणारी धोरणे आवश्यक आहेत.

**स्पष्टीकरण**

पूर्ण वाक्य आणि फक्त मुद्दे अशा दोन्ही वाक्यरचनांचा वापर केल्याने कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त मुद्दे मांडणे शक्य झाले आहे.

वेगवेगळ्या दहशतवादी कारवायांमुळे जागतिक शांतता सुरक्षितता यांना निर्माण झालेले धोके उदाहरणे दिल्यामुळे थोडक्यात पण स्पष्टपणे मांडता आले आहेत.

दहशतवाद विरोधी समितीचे मूल्यमापन करताना सकारात्मक मुद्दे आणि मर्यादा या दोन्हीबाबत मुद्दे मांडणे आवश्यक होते. अतिरिक्त शब्द वापरावे लागू नयेत यासाठी हे लक्षात घेऊन सर्व महत्त्वाचे मुद्दे क्रियापदांचा वापर न करता मांडले आहेत.

शक्य तेथे उदाहरणे दिल्यामुळे उत्तराची परिणामकारकता वाढली आहे.

समारोप करताना मूल्यमापनाचा निष्कर्ष मांडून परिणामकारकता वाढविण्यासाठीचे उपाय थोडक्यात मांडले आहेत. यामुळे उत्तराचा भर मूल्यमापनावरच ठेवता आल्याचे लक्षात येते.

steelframe.india@gmail.com

# कर्मचाऱ्यांची वार्षिक परीक्षा !

**कामगिरीचे वार्षिक अवलोकन ही कर्मचाऱ्यांसाठी स्वत :कडे मागे वळून बघण्याची उत्तम संधी असते. मानसशास्त्रानुसार कामगिरीचे विश्लेषण आणि सुधारणा करण्यासाठी केलेल्या विचारपूर्वक योजना प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असतात.**

**कौशल्य तंत्र**
सलील चिंचोरे

**मार्च महिना** येऊ घातला की कर्मचाऱ्यांना एप्रिल महिन्यातील वेतन वाढ व प्रमोशनचे वेध लागतात. मार्च महिना हा वित्तीय वर्षातील अखेरचा महिना. मार्च महिन्याअखेरीस कंपनीच्या वित्तीय कामगिरीचा आढावा तर घेतला जातोच; तसेच कर्मचाऱ्यांच्या वार्षिक कामगिरीचेही अवलोकन केले जाते. या पद्धतशीर मार्गाला परफॉर्मन्स अप्रेजल म्हणतात. कर्मचाऱ्यांच्या वार्षिक अवलोकनाचे खास महत्त्व असते. कर्मचाऱ्यांच्या कामगिरीनुसार त्यांना परफॉर्मन्स रेटिंग दिले जाते. यानुसार कर्मचाऱ्यांसंबंधीचे वेतनवाढ, प्रमोशन, बदली, बोनस असे अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जातात.

म्हणून प्रत्येक कर्मचारी वर्षाअखेरीस आपल्या कामाला रंगरंगोटी करून तिला आकर्षक स्वरूपात बॉससमोर सादर करतो. परफॉर्मन्स अप्रेजल मीटिंगमध्ये आपल्या कामगिरीची बॉसवर छाप पाडून चांगले रेटिंग मिळवण्याचा हा प्रयत्न असतो. काही वेळेला हा प्रयत्न फलद्रूप होतो तर काहीदा तो चक्क फसतो. कारण बॉसने कर्मचाऱ्यांबरोबर वर्षभर खांद्याला खांदा लावून काम केलेले असते. कर्मचाऱ्यांच्या कामातील खाचाकोचा, उणीवा, कर्मचाऱ्यांचा स्वभाव बॉसला चांगला ठाऊक असतो. बॉसपुढे कितीही अतिशयोक्तीपूर्ण सादरीकरण केले तरी प्रत्येक कर्मचाऱ्याला स्वतःच्या कामगिरीची यथार्थ जाणीव असते. पण त्याला रंगरंगोटी करण्याच्या नादात आपण त्यातील सत्व हरवून बसतो.

आज आपण याच गोष्टीकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून बघू. कामगिरीचे वार्षिक अवलोकन ही कर्मचाऱ्यांसाठी स्वतःकडे मागे वळून बघण्याची उत्तम संधी असते. मानसशास्त्रानुसार कामगिरीचे विश्लेषण आणि सुधारणा करण्यासाठी केलेल्या विचारपूर्वक योजना प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असतात. प्रत्येक कसलेला खेळाडू मॅच संपल्यावर आपल्या कोचबरोबर बसून मॅचचे व स्वतःच्या कामगिरीचे सखोल विश्लेषण करतो. त्यातून हाती येणाऱ्या त्रुटींवर भर देऊन सराव करतो. त्यामुळे त्या खेळाडूला पुढच्या मॅचसाठी अधिक चांगले तयार होण्यासाठी मदत होते. बऱ्याचदा आपली कामगिरी फुगवून सांगण्याच्या नादात आपण स्वतःला आरशात बघण्याचे विसरतो. यावेळेस परफॉर्मन्स रिव्ह्यूसाठी नेहमीचे पवित्रे सोडून तुम्ही स्वतःचे कठोर मूल्यमापन करा. त्यासाठी मदत म्हणून तुम्हाला मी काही प्रश्न देतो आहे. त्या प्रश्नांची उत्तरे तुम्ही स्वतःच स्वतःसाठी शोधू शकता –

- गेल्या वर्षात वर्षभरात कोणती टार्गेट्स मी पार केली? ते कशामुळे साध्य झाले?
- कोणती टार्गेट्स पार करण्यात मला अपयश आले? त्याची कारणे काय?
- गेल्या वर्षभरात मला कोणत्या अडचणी आल्या? त्यांचा सामना मी कसा केला?
- माझा बॉस व इतर वरिष्ठांनी मला कोणता फीडबॅक दिला? त्याला मी कसा प्रतिसाद दिला?
- माझ्या कामगिरीवर मी पूर्णतः समाधानी आहे का? नसल्यास त्यात कुठे कमतरता जाणवते आहे?
- गेल्या वर्षभरात इतर सहकाऱ्यांबरोबरचे संबंध कसे होते? ते सुधारण्यासाठी मी कोणते प्रयत्न केले?
- गेल्या वर्षात मी काय नवीन शिकलो? त्याचा वापर मला पुढे कसा करता येईल?
- येत्या एक-दोन वर्षांतील माझी करिअरची उद्दिष्टे कोणती?
- त्यासाठी येत्या वर्षात मला कोणत्या नवीन गोष्टी अनुभवायच्या अथवा शिकायच्या आहेत?



- सर्व गोष्टींचा सारासार विचार करता पुढच्या वित्तीय वर्षात माझ्या कामाविषयी व करिअरविषयी मी (अ) कोणत्या गोष्टी नव्याने चालू करणार? (ब) कोणत्या गोष्टी अधिक सातत्याने करत राहणार? व (क) कोणत्या गोष्टी कटाक्षाने टाळणार?

या प्रश्नांवर विचार करून त्याची तुमच्या बॉसबरोबर मोकळेपणाने चर्चा करा. सहेतुक केलेली चर्चा निश्चितच पुढील मार्ग दर्शवेल. स्वतःच्या कामगिरीची तुलना तुमच्या सहकाऱ्यांच्या कामगिरीशी करण्याचे टाळा.

बहुतांशी कर्मचाऱ्यांना वाटत असते की आपल्या करिअरची सगळी जबाबदारी कंपनीची आहे. माझ्या भवितव्याचा विचार माझ्या बॉसने आणि कंपनीने करावा. मी पुढे काय करावे, कसे काम करावे हे त्यांनीच ठरवावे. ही धारणा संपूर्णपणे चुकीची आहे. आपल्या कामगिरीची व करिअरची जबाबदारी आपली आहे. विचार-विश्लेषण करून पुढील मार्गही आपल्यालाच आखायचा असतो. त्यासाठी कंपनी व कंपनीतील वरिष्ठांचे मार्गदर्शन घ्यायचे असते.

कंपनी तुमच्या करिअरच्या रथाचे सारथ्य करत असेल तरी तुमचे युद्ध तुम्हीच लढायचे व जिंकायचे असते.

chinchoresalil@gmail.com
(लेखक मनुष्यबळ क्षेत्रातील तज्ज्ञ असून या क्षेत्रात २५ वर्षे कार्यरत आहेत)

# ॲनिमेशन : मानवी सर्जनशीलतेचा शोध

**चौकटी-पल्याड**
आशुतोष शिर्के
रश्मी पटवर्धन

**ॲनिमेशन म्हणजे जगाकडे नव्या नजरेने पाहायला शिकणे. ॲनिमेशन ही कला आहे, ती मानवी निरीक्षणातून जन्माला येते. एखाद्या चेहऱ्यावरचा क्षणिक भाव, संध्याकाळच्या प्रकाशाचा रंग किंवा शांततेतही घडणारी कथा – हे सगळं पाहण्याची आणि समजण्याची क्षमता सॉफ्टवेअर देऊ शकत नाही.**



**गेल्या दोन** दशकांत ॲनिमेशन ही केवळ मनोरंजनाची शाखा राहिलेली नाही. ॲनिमेशन हे जगाच्या सांस्कृतिक, शैक्षणिक आणि तांत्रिक परिवर्तनाच्या केंद्रस्थानी जाऊन बसले आहे. चित्रपट, वेबसीरिज, गेमिंग, इंजिनीअरिंग, आर्किटेक्चर, वैद्यकीय सिम्युलेशन, व्हर्च्युअल रिॲलिटी या सर्व क्षेत्रामध्ये ॲनिमेशनचा वापर वाढतो आहे. त्यामुळे जगभरातील विद्यापीठे ॲनिमेशन क्षेत्राकडे गंभीरपणे पहात आहेत. ॲनिमेशन शिक्षणाचा अर्थ आपण बऱ्याच वेळेला केवळ 'सॉफ्टवेअर किंवा तंत्र शिकणे' असा घेतो. परंतु खरे तर ॲनिमेशन म्हणजे जगाकडे नव्या नजरेने पाहायला शिकणे.

बहुतेक भारतीय विद्यार्थ्यांच्या मनात ॲनिमेशन शिक्षण म्हटलं की अमेरिका किंवा युरोप हेच पर्याय येतात. कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट्स, न्यूयॉर्क फिल्म अकॅडमी, शेरिडन कॉलेज (कॅनडा), गोबलिन्स (फ्रान्स) आणि रॉयल कॉलेज ऑफ आर्ट (यूके) या संस्था जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहेत यात शंकाच नाही. या ठिकाणी विद्यार्थ्यांना ॲनिमेशन उद्योग जगतात काम करणारे नामांकित कलाकार आणि दिग्दर्शक शिकवतात. ते विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक कौशल्य देत नाहीत, तर 'दृश्य विचार' करण्याची क्षमता विकसित करतात - कथा, प्रकाश, रंग आणि भावना यांचा परस्परसंबंध समजावतात.

## गायत्रीचा प्रकाश, सावल्या आणि स्वप्नांचा प्रवास

गायत्री अंकम आज कॅनडात आहे. ॲनिमेशनच्या जगात तिने स्वतःचं स्थान निर्माण केलं आहे. पण हे स्थान तिला सहज मिळालेलं नाही. एआयच्या वेगवान लाटेमुळे तिच्या क्षेत्रात निर्माण झालेली अस्थिरता, बदलणाऱ्या कौशल्यांची मागणी आणि परदेशात स्वतःला सतत सिद्ध करण्याची गरज - या सगळ्यांशी सामना करत ती अजूनही तिच्या सर्जनशीलतेला धरून उभी आहे. तिच्यासाठी ही केवळ नोकरी नाही, तर तिच्या वेडासाठी तिने मोजलेली किंमत आहे.



ही कथा सुरू होते मुंबईतल्या सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट्सच्या वर्गात. रंग, प्रकाश आणि सावल्यांच्या सूक्ष्म नात्याने तिला तेव्हाच भुरळ घातली होती. पडद्यावर दिसणाऱ्या जगामागचं गूढ तिला खुणावत होतं. त्या खुणेचा पाठलाग करत ती न्यूयॉर्क फिल्म अकॅडमीपर्यंत पोहोचली आणि तिथे तिच्यासाठी एक नवं विश्व उघडलं. इथे तिला शिकवणारे शिक्षक केवळ प्राध्यापक नव्हते; तेच ते लोक होते ज्यांनी तिच्या लहानपणी तिला भुरळ घालणाऱ्या चित्रपटांच्या जगाची निर्मिती केली होती. ज्यांची नावे तिने पडद्यावर वाचली होती, तेच आता तिचे मार्गदर्शक होते. त्यांनी तिला केवळ सॉफ्टवेअर शिकवलं नाही, तर 'प्रकाश हा कथा सांगतो' हे शिकवलं. तांत्रिक कौशल्य आणि कलात्मक दृष्टी यांचा संगम म्हणजेच खऱ्या अर्थाने ॲनिमेशन, हे तिला तिथे उमगलं.

अमेरिकेत शिकताना आणि नंतर टीचिंग असिस्टंट म्हणून काम करताना तिची ओळख केवळ विद्यार्थिनी म्हणून राहिली नाही; ती त्या विद्यापीठाच्या सर्जनशील परंपरेचा एक भाग बनली. पुढे कॅनडात बार्डेल एंटरटेनमेंटमध्ये तिचं काम होतं नेटफ्लिक्स, डिस्ने आणि अमेझॉन प्राइममधील विविध ॲनिमेटेड दृश्यांना प्रकाश आणि कॉम्पोझिटिंगच्या माध्यमातून जिवंत करणं.

आज ती पुन्हा नव्या तंत्रज्ञानाकडे वळते आहे. परदेशी विद्यापीठातील शिक्षण आणि अनुभवातून ती एक महत्त्वाची गोष्ट शिकली - ॲनिमेशन ही केवळ करिअरची वाट नाही, तर सतत स्वतःला नव्याने घडवत राहण्याची एक जिवंत प्रक्रिया आहे.

पण ॲनिमेशनचं विश्व केवळ पाश्चिमात्य देशांपुरतं मर्यादित नाही. ॲनिमेशन क्षेत्रामध्ये जपान अग्रेसर मानला जातो. टोकियो युनिव्हर्सिटी ऑफ द आर्ट्स आणि क्योटो सेइका युनिव्हर्सिटीसारख्या संस्थांनी 'ॲनिमे' या विशिष्ट शैलीला जागतिक प्रतिष्ठा मिळवून दिली. जपानी शिक्षणपद्धतीत निरीक्षण, संयम आणि सूक्ष्म भावनांचं चित्रण यावर भर दिला जातो. चीनमध्येही बीजिंग फिल्म अकॅडमी आणि चायना ॲकॅडमी ऑफ आर्टसारख्या संस्थांनी ॲनिमेशनमध्ये मोठी प्रगती केली आहे. तिथे पारंपरिक चीनी कलेचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम घडवण्यावर भर दिला जातो. दक्षिण कोरिया आणि सिंगापूर हे देशही या क्षेत्रात झपाट्याने पुढे येत आहेत.

आज एआयमुळे या क्षेत्रात मोठा बदल होत आहे. काही वर्षांपूर्वी ज्यासाठी तासन्तास मेहनत लागायची, ती कामं आता काही मिनिटांत होतात. त्यामुळे अनेकांना वाटतं की ॲनिमेशनमध्ये माणसाची गरज कमी होईल. काही प्रमाणात हे खरे आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये जगभर ॲनिमेशन क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. परंतु ॲनिमेशन तयार करण्याच्या प्रक्रियेतील माणसाचे स्थान गेले आहे असे यामुळे आपण म्हणू शकतो का? एआय दृश्य तयार करू शकतो, पण तो अनुभव तयार करू शकत नाही. भावना, सूक्ष्मता आणि कथेला दिशा देण्याची क्षमता ही माणसाकडेच असते. एआय हे एक साधन आहे; कलाकार हा त्याचा सर्जक आहे. म्हणूनच जगातील सर्वोत्तम विद्यापीठांमध्ये आजही सॉफ्टवेअरला जितकं महत्त्व दिलं जातं तितकंच महत्त्व ड्रॉइंग, स्केचिंग, फोटोग्राफी, सिनेमाचा अभ्यास, मानसशास्त्र आणि कथाकथन यांना दिलं जातं.

ॲनिमेशनमध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतःला केवळ 'तंत्रज्ञ' म्हणून नव्हे, तर 'कलाकार' म्हणून घडवणं आवश्यक आहे. सॉफ्टवेअर बदलतील, एआय विकसित होईल, पण मानवी कल्पनाशक्ती आणि संवेदनशीलता हीच या क्षेत्राची खरी ताकद राहील. ॲनिमेशनचं शिक्षण म्हणजे एका साधनाचं प्रशिक्षण नव्हे; ते म्हणजे स्वतःची वेगळी दृष्टी शोधण्याचा आणि जगाला नव्या पद्धतीने व्यक्त करण्याचा प्रवास आहे.

mentorashutosh@gmail.com
(लेखक करिअर समुपदेशक आहेत.)

## शब्दकोडे- ३५०

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | | ५ | ६ | ■ |
| ७ | | ■ | ८ | | | ■ | ९ | | १० |
| ११ | | १२ | | ■ | १३ | १४ | ■ | १५ | |
| | ■ | | ■ | १६ | | | १७ | | ■ |
| ■ | १८ | | | | ■ | १९ | | ■ | २० |
| २१ | | | ■ | २२ | २३ | ■ | २४ | २५ | |
| २६ | | ■ | २७ | | | २८ | ■ | | ■ |
| | ■ | २९ | | | ■ | ३० | ३१ | | ३२ |
| ३३ | ३४ | ■ | | ■ | ३५ | | | ■ | |
| ३६ | | | ■ | ३७ | | | ■ | ३८ | |

**आडवी विधाने :** (१) ज्याची कल्पना येणार नाही असे (४) पुष्कळ, खूप
(७) XX गबाले - हे मराठी चित्रपट दिग्दर्शक व निर्माते होते
(८) गडबड, गोंधळ
(९) त्रास, श्रम
(११) कोळिष्टक (१३) आड लपून बसणे
(१५) हात, सरकारी देणे
(१६) पळसाचा डिंक
(१८) दागदागिने, अलंकार
(१९) वटवृक्ष
(२१) दहावी तिथी, दुधात पीठ भिजवून केलेली पोळी (२२) प्रवृत्ती, झोक
(२४) गोधडी (२६) दुर्लक्ष, क्षमा
(२७) बोभाटा, गाजावाजा
(२९) छाया, प्रतिबिंब
(३०) मालक, नवरा (३३) कुसुम, पुष्प
(३५) संपूर्ण, फलद्रूप
(३६) चिन्ह, गुणधर्म
(३७) एक कीटक
(३८) सत्कृत्य, सत्कर्माचे फळ

**उभी विधाने :** (१) शासन नसलेली स्थिती (२) पंकज, सरोज
(३) पिकांचा अंदाज
(४) मजुरांवर देखरेख करणारा अधिकारी
(५) दुर्गुण, वाईट सवय
(६) तापाची पूर्वचिन्हे
(१०) नवऱ्याचा भाऊ
(१२) वालुकामय प्रदेश
(१४) पायऱ्या असलेली विहीर
(१६) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एक प्रमुख प्रशासकीय तालुका (१७) कठोर, कडक
(१८) सारांश, उद्देश (२०) पंक्ती, रांग
(२१) गरम मसाल्यातला एक पदार्थ
(२३) खांबावर आडवी टाकलेली तुळई
(२५) मुसलमानी धर्मसूत्र
(२७) दुधाचा व्यवसाय करणारा
(२८) निरर्थक, फोल (३१) पाणी, नीर
(३२) लक्षात न घेण्यासारखा
(३४) शंभर हजार, चित्त
(३५) पावसाची झड, ओवलेल्या फुलांचा हार

**– चारू नानल**

## सुडोकू - ३५०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | ८ |
| | ६ | ४ | १ | | ३ | २ | ९ | |
| | ७ | | ४ | | ८ | | १ | |
| | ८ | २ | ५ | | ७ | १ | ३ | |
| | | | | १ | | | | |
| | १ | ३ | २ | | ६ | ५ | ४ | |
| | २ | | ७ | | ५ | | ८ | |
| | ४ | ७ | ८ | | ९ | ६ | ५ | |
| ५ | | | | | | | | ३ |

## सुडोकू - ३४९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ९ | ३ | १ | ८ | २ | ४ | ५ | ७ |
| १ | ८ | ४ | ३ | ७ | ५ | ९ | ६ | २ |
| ५ | २ | ७ | ६ | ४ | ९ | १ | ३ | ८ |
| ३ | ५ | २ | ४ | १ | ७ | ८ | ९ | ६ |
| ७ | १ | ६ | २ | ९ | ८ | ५ | ४ | ३ |
| ८ | ४ | ९ | ५ | ६ | ३ | ७ | २ | १ |
| ४ | ७ | ८ | ९ | ३ | ६ | २ | १ | ५ |
| ९ | ६ | ५ | ७ | २ | १ | ३ | ८ | ४ |
| २ | ३ | १ | ८ | ५ | ४ | ६ | ७ | ९ |

## शब्दकोडे - ३४९ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | ल्हा | द | के | श | व | अ | त्रे | ■ | ट |
| स्ता | ■ | वा | दा | ■ | र | ■ | धा | म | ण |
| व | सा | ■ | र | स | दा | र | ■ | हा | क |
| ना | र | ळ | ■ | क | न | का | च | ल | ■ |
| ■ | थी | ■ | व | र्म | ■ | ना | ल | ■ | यं |
| कुं | ■ | पा | ■ | क | था | ■ | न | म | दा |
| भ | र | व | सा | ■ | ट | क | ■ | त्स्य | ■ |
| ■ | ता | स | का | टा | ■ | ट | च | ■ | क |
| का | ळे | ■ | र | ■ | प | रा | व | लं | बी |
| थ्या | ■ | ठा | णे | दा | र | ■ | ळी | ■ | र |

# शिवानी दाणी स्थायी समितीच्या अध्यक्ष

## अमृत महोत्सवी वर्षात सर्वच समित्यांच्या सभापतीपदी महिला

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नागपूर :** महापालिकेच्या विशेष सभेत मंगळवारी महापौर नीता ठाकरे यांनी स्थायी समितीसह सर्व १२ समिती सदस्यांची नावे जाहीर केली. स्थायी समिती सदस्यांची नावे जाहीर करताना महापौरांनी शिवानी दाणी यांचे नाव प्रथम पुकारले. अर्थात शिवानी दाणी महापालिका स्थायी समितीच्या अध्यक्षा असतील.

महापालिकेचे अमृत महोत्सवी वर्ष असून येत्या २ मार्चला ७५ वर्ष पूर्ण होणार आहे. या अमृत महोत्सवी वर्षात मंगला खेकरे, अश्विनी जिचकार, मनीषा अतकरे, निधी तेलगोटे, संतोषदेवी लढ्ढा, रुतिका मसराम, सारिका नांदुरकर, दिव्या धुरडे, सरिता कावरे, माजी महापौर माया इवनाते या नगरसेविका विविध समित्यांच्या सभापती राहणार आहे.

महापालिकेची विशेष सभा मंगळवारी सुरेश भट सभागृहात पार पडली. सत्तापक्ष नेते बाल्या बोरकर, विरोधी पक्षनेते संजय महाकाळकर तसेच मुस्लिम बहुजन विकास आघाडीचे गटनेते शकील पटेल यांनी बंद लिफाफ्यामध्ये स्थायी समितीसाठी सदस्यांची नावे दिली. महापौरांनी शिवानी दाणी यांचे नाव प्रथम घेतले. त्यानंतर त्यांनी इतर सदस्यांची नावे जाहीर केली. परंपरेनुसार प्रथम नाव संबंधित समितीच्या सभापतीचे असते. शिवानी दाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मतदार संघातील प्रभाग ३६ मधून सर्वसाधारण गटातून निवडून आल्या आहेत. दाणी यांच्याशिवाय स्वीटी भिसीकर, प्रमिला गौर, विशाखा मोहोड, निरंजना पाटील, ममता ठाकूर, साधना बरडे, अभिरुची राजगिरे, मानसी सिमले यांचा भाजपने समावेश केला आहे.

काँग्रेसतर्फे मॅरिस्टेला उसरे या एकमेव नगरसेविकेला स्थायी समितीत संधी देण्यात आली तर अभिजित झां, अभिषेक शंभरकर, वासिम खान यांचा समावेश आहे. मुस्लिम बहुजन विकास आघाडीचे असलम खान यांनाही स्थायी समितीत स्थान मिळाले. स्थायी समितीनंतर परिवहन समिती संवैधानिक असून मंगला खेकरे यांचे नाव सर्वात पुकारण्यात आले. या समितीत भाजपचे बंडू राऊत, विजय होले, अर्चना पडोळे, प्रमिला मथरानी, मंगला मस्के, रुपाली ठाकूर, पूजा पाठक तर काँग्रेसचे शैलेश पांडे, दिनेश यादव, शिवसेना उबाठाचे किशोर कुमेरिया, एमआयएमचे शकील पटेल यांचा समावेश आहे.



### फडणवीस यांच्यासह माजी महापौरांचा गौरव

माजी महापौरांनी त्यांच्या महापौरपदाच्या काळात शहराच्या विकासाला गती व दिशा दिली. महापालिकेच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मार्च १९९७ ते फेब्रुवारी १९९९ पर्यंत महापौर होते. त्यांच्यासह माजी महापौर व उपमहापौरांचा गौरव येत्या २ मार्च रोजी करण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी महापौर नीता ठाकरे यांनी नगरसेवकांना जबाबदारी दिली आहे.



महापालिकेची स्थापना २ मार्च १९५१ रोजी झाली.यंदा महापालिकेला ७५ वर्ष पूर्ण होत आहे. स्थापना दिवसाच्या पूर्वतयारीसाठी मंगळवारी महापौरांनी सभागृह स्थगित झाल्यानंतर नगरसेवकांसोबत चर्चा केली. यावेळी उपमहापौर लीला हाथीबेड, सत्तापक्ष नेते बाल्या बोरकर यांच्यासह भाजपचे सर्व नगरसेवक उपस्थित होते. शहराच्या विकास प्रक्रियेत योगदान देणाऱ्या माजी महापौर, माजी उपमहापौर आणि पदाधिकारी यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या भावनेने हा सोहळा आयोजित करण्यात येत असल्याचे महापौर म्हणाल्या

### आईनंतर मुलगीही सभापती

निधी तेलगोटे यांची विधि समितीच्या सभापतीपदी निवड निश्चित झाली आहे. निधी यांच्या आई ॲड. मीनाक्षी तेलगोटे मागील सत्ताकाळात २०१७ मध्ये विधि समिती सभापती होत्या. आता मुलगी निधीही महापालिकेतील न्यायालयाशी प्रकरणांवर सूचना देईल.

### समितीनिहाय सभापतींची नावे

परिवहन समिती-मंगला खेकरे, स्थापत्य समिती-अश्विनी जिचकार, आरोग्य समिती-मनीषा अतकरे, विधी समिती-निधी तेलगोटे, शिक्षण-संतोषदेवी लढ्ढा, गलिच्छ वस्ती निर्मूलन-रुतिका मसराम, महिला व बाल कल्याण-सारिका नांदुरकर, जलप्रदाय-दिव्या धुरडे, कर आकारणी-सरिता कावरे, अग्निशमन व विद्युत-माया इवनाते, क्रीडा विशेष समिती-दर्शनी धवड.

### एकाच प्रभागातील दोन नगरसेविका सभापती

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण-पश्चिम मतदार संघातील ३६ मधील शिवानी दाणी यांना स्थायी समिती अध्यक्षपदी संधी देण्यात आली. याच मतदार संघातील प्रभाग ३९ मधील विशाखा मोहोड यांचीही स्थायी समिती सदस्य म्हणून वर्णी लागली. याच मतदार संघातील प्रभाग ३७ मधील निधी तेलगोटे व अश्विनी जिचकार यांना अनुक्रमे विधी व स्थापत्य समिती सभापतीपद देण्यात आले.



# शहर अस्वच्छ ठेवणाऱ्या कंत्राटदारांवर काय कारवाई?

## उच्च न्यायालयाची महापालिकेला विचारणा

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** शहरातील स्वच्छता अभियानातील उणीवा अधोरेखित करत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जबाबदारीचे निर्वहन न करणाऱ्या कंत्राटदारावर काय कारवाई करण्यात आली, याबाबत माहिती सादर करण्याचे महापालिकेला निर्देश दिले. याशिवाय नागरिकांना अस्वच्छतेची सहजपणे तक्रार करता यावी यासाठी अद्यावत व्यवस्था निर्माण करण्याबाबतही काम करण्याची सूचना केली.

'स्वच्छ नागपूर, सुंदर नागपूर' घोषणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्वतःहून जनहित याचिका दाखल केली आहे. याचिकेवर मंगळवारी न्या.अनिल किलोर आणि न्या.राज वाकोडे यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. न्यायालयीन मित्र ॲड.यशोवर्धन सांबरे यांनी कचरा गोळा करण्याच्या प्रक्रियेतील उणीवांबाबत न्यायालयात माहिती सादर केली. कचऱ्याचे विभाजन करण्यापासून कचरा गोळा करणाऱ्या वाहनांची कमतरता तसेच भांडेवाडी डम्पिंग यार्डपर्यंत कचरा नेण्याची प्रक्रिया, यात अनेक उणीवा आहे, असे ॲड.सांबरे यांनी सांगितले. उच्च न्यायालयाने यासाठी कंत्राटदारांना जबाबदार धरत घनकचरा व्यवस्थापनाच्या कार्यात कुचराई करणाऱ्यांवर कारवाईबाबत महापालिकेला विचारणा केली. येत्या दोन आठवड्यात अशा कंत्राटदारांची यादी सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले.

वृत्तपत्रांमध्ये शहरातील अस्वच्छतेबाबत छायाचित्र प्रकाशित झाल्यावर त्या परिसराची पाहणी करण्यात आली आहे का? वृत्तपत्रांने माहिती दिल्यावरही जर त्या परिसराची स्वच्छता झाली नसेल तर संबंधित झोन अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची तंबीही न्यायालयाने दिली.

### तक्रारीसाठी आधार कार्ड कशाला?

शहरातील सामान्य नागरिकांना तक्रार करण्यासाठी सुलभ संकेतस्थळ तसेच ॲप उपलब्ध करून देण्याबाबतही न्यायालयाने सूचना केली. यावेळी न्यायालयीन मित्राने अशाप्रकारचे ॲप उपलब्ध असल्याबाबत सांगितले, मात्र तक्रारीची प्रक्रिया फार किचकट असल्याचा उल्लेख केला. अस्वच्छतेची तक्रार करणाऱ्या नागरिकाला त्याचा आधार कार्ड, वार्ड क्रमांक यासह विविध माहिती भरावी लागते, असे न्यायालयीन मित्राने सांगितले. न्यायालयाने महापालिकेच्या क्लिष्ट ॲपवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सरळ आणि सोपी पद्धती विकसित करण्याबाबत सूचना केली.

## दोन टोळ्या जेरबंद

**नागपूर :** मध्य रेल्वेने प्रवास करताना देशाच्या वेगवेगळ्या भागांत धावणाऱ्या डब्यांमध्ये फिरून रात्रीच्या वेळी प्रवाशांच्या मौल्यवान वस्तू लंपास करणाऱ्या दोन टोळ्यांना शोधून काढत मध्य रेल्वे सुरक्षा दलाने चौघांना अटक केली. दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये मध्य रेल्वे आरपीएफ आणि जीआरपीच्या संयुक्त पथकांनी ही कारवाई केली. आरपीएफ पथकाने १२६१८ एर्नाकुलम-हजरत निजामुद्दीन मंगला एक्सप्रेसमध्ये प्रवाशाचे मौल्यवान साहित्य चोरताना दोन जणांना पकडले. रवींद्र नामदेव धोगांडे (२६, रा. खडवली) करण भीमराव भालेराव (१९)या दोघांना अटक केली. दुसऱ्या पथकाने २०९१९ चेन्नई-एकतानगर सुपरफास्ट एक्सप्रेसमध्ये एकाची झडती घेतली असता तीन भ्रमणध्वनी आणि रोख ५,१०० रुपये पोलिसांना सापडले.

# गिरीश गांधी अध्यक्ष झाल्यास साहित्य संघाची जागा खासगी संस्थेच्या घशात

## मधुकर कुकडे यांचा आरोप; मराठी, हिंदी भाषेची वाट लावल्याचा दावा

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** विदर्भ साहित्य संघाची निवडणूक ही वाङ्मयीन चळवळीसाठी उरली नसून झाशी राणी चौकातील कोट्यवधींची जागा ताब्यात घेण्यासाठी आहे. गिरीश गांधी यांचे साहित्य क्षेत्रात योगदान नाही. त्यांनी मराठी व हिंदी भाषेची वाट लावली. ते अध्यक्ष झाल्यास साहित्य संघाची जागा खासगी संस्थेच्या घशात घालतील, असा आरोप ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मधुकर कुकडे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत केला.

कुकडे म्हणाले, गांधी यांची सुरुवात दिवंगत मोहन धारिया यांच्या 'वनराई' या वनीकरण करणाऱ्या संस्थेतून झाली. गांधी यांनी किती झाडे लावली याची आकडेवारी उपलब्ध नाही. धारिया यांच्या महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समितीची एक एकर जागा शंकर नगरमध्ये एलईडी महाविद्यालयाजवळ आहे. गांधी यांनी जागेचे विभाजन करून ३० हजार चौरस फूट जागा माजी खासदार दत्ता मेघे यांना दवाखान्यासाठी दिली. काही कोटींमध्ये हा व्यवहार झाला. नंतर मेघे यांनी व्होकार्ट रुग्णालयाला ही जागा भाड्याने दिली. या जागांचा दुरुपयोग झाला. याला न्यायालयात आव्हान देण्यात दिले. सर्वोच्च न्यायालयाने दंड आकारण्याचे आदेश दिले. त्यानंतर सुधार प्रन्यासने त्यांच्यावर १५६ कोटींचा दंड ठोठावला. पण २०१४ मध्ये सरकारकडून दंड माफ करून घेतला. त्यामुळे राज्य शासनाचेच नुकसान झाले.

गिरीश गांधी अध्यक्ष झाल्यास विदर्भ साहित्य संघाची दीड एकर जागा खासगी संस्थेच्या घशात जाण्याची दाट शक्यता आहे, असे कुकडे म्हणाले.

गिरीश गांधी यांचे नागपूरच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रात कुठलेच योगदान नसल्याची टीकाही त्यांनी केली. नागपूर रेल्वे स्थानकला जनरल मंचरशा आवारी यांचे नाव द्यावे, अशी मागणी केली. मध्यवर्ती कारागृहाची जागा विकासकाच्या घशात घालण्यासाठी रिकामी करून घेण्याची योजना आहे. त्यामुळे कारागृह गावाबाहेर नेऊ नये, अशी मागणीही त्यांनी केली. यासंदर्भात प्रतिक्रियेसाठी गिरीश गांधी यांच्याशी संपर्क साधला असता त्याला प्रतिसाद मिळाला नाही.

### भाजपची दांडगाई?

- विदर्भ साहित्य संघ या प्रतिष्ठित सांस्कृतिक संस्थेच्या निवडणुकीवर यंदा राजकारणाची छाया पडल्याचे चित्र आहे. भारतीय जनता पक्ष या निवडणुकीत सक्रिय झाल्याचे बोलले जात आहे.
- साहित्यिक क्षेत्र हे वैचारिक स्वातंत्र्याचे आणि पक्षनिरपेक्षतेचे प्रतीक मानले जाते. मात्र, एखाद्या राजकीय पक्षाचा उघड हस्तक्षेप ही चिंतेची बाब आहे.
- विदर्भ साहित्य संघाच्या काही सदस्यांच्या मते, ज्या घरात संबंधित सदस्य प्रत्यक्ष उपस्थित नाहीत, तेथील मतपत्रिका गोळा करण्याचे प्रकार घडत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहे. मात्र, अशा चर्चेमुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# राष्ट्रपती आज शहरात

## ब्रम्हाकुमारीजच्या मोहिमेचा प्रारंभ करणार

**नागपूर :** समाजात एकमेकांप्रती विश्वास, सौहार्दता, एकता आणि मानवतेच्या मूल्यांची जपणूक अधिक वृद्धिंगत व्हावी यासाठी ब्रम्हाकुमारीजच्या राज्यव्यापी अभियानाचा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते बुधवारी (२५ फेब्रुवारी) सायंकाळी प्रारंभ होत आहे. जामठा येथील ब्रम्हाकुमारीज विश्वशांती सरोवर येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाला राज्यपाल आचार्य देवव्रत, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माऊंटआबू येथील ब्रह्माकुमारीजचे अतिरिक्त सरचिटणीस बी. के. मृत्युजय भाई, राजयोगिनी बी. के. चंद्रिका, नागपूरच्या प्रमुख राजयोगिनी बी. के. रजनी यावेळी उपस्थित राहणार आहे. जामठा येथील ब्रम्हाकुमारीज विश्वशांती सरोवर येथे या समारंभासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रपती यांच्या दौऱ्यासंदर्भात संपूर्ण आढावा घेतला.

### वाहतूक मार्गात बदल

राष्ट्रपतींचे बुधवारी नागपूर विमानतळावर आगमन होईल. वर्धा मार्गावरच्या जामठा येथील ब्रम्हकुमारीज विश्वशांती सरोवर येथील मुख्य कार्यक्रमासाठी त्या हजेरी लावणार आहे. त्यामुळे संपूर्ण शहरात दोन हजारांहून अधिक पोलीस तैनात केले जाणार आहे. वर्धा मार्गावर होणारी संभाव्य वाहतूक कोंडी लक्षात घेता वाहतूक व्यवस्थेत अंशतः बदल करण्यात आला आहे. अपघात प्रवण परिस्थिती लक्षात घेता दौरा काळात वर्धा मार्गावर जड वाहतूक करणारी वाहतूक पूर्णतः बंद राहिल. वर्धा मार्गावरून बुट्टीबोरी मार्गे नागपूर, जबलपुर, भंडाराकडे जाणारी संपुर्ण जड वाहतूक बुट्टीबोरीकडून दाताळा चौक मार्गे समृध्दी झीरो सर्कल येथून पुढे सरकेल. समृध्दी महामार्ग, अमरावतीकडुन, नागपूरकडे जाणारी वाहतूक समृध्दी झिरो सर्कल, वृंदावन कटींग येथे थांबवतील. शहरातून वर्धाकडे जाणारी वाहतूक नेमलेल्या पॉईन्टवर आवश्यकतेनुसार थांबेल.

# स्वच्छता कर्मचाऱ्याच्या वेशातील नगरसेवकाला रोखले



लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नागपूर :** शहरातील अस्वच्छतेकडे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेस नगरसेवक शैलेश पांडे यांनी स्वच्छता कर्मचाऱ्याच्या वेशात झाडू घेऊन सभागृहात शिरण्याचा प्रयत्न केला. परंतु, सभागृहाच्या प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षकांनी रोखल्याने त्यांनी तिथेच आंदोलन सुरू केले. सभागृहात अस्वच्छतेवर चर्चा करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

प्रभागातील लोकांच्या मूलभूत समस्या सोडवण्याची जबाबदारी महापौर नीता ठाकरे आणि आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांच्यासोबत नगरसेवक म्हणून माझी आहे. परंतु, महापौर व आयुक्तांना निवेदन देऊनही प्रभाग ११ मधील समस्या सुटली नाही. महापौरांनी आता सर्व प्रभागातील स्वच्छतेच्या समस्या सोडवण्यासाठी एक विशेष बैठक घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली. महानगरपालिका प्रशासन, महापौर आणि आयुक्त स्वच्छतेबाबत गंभीर पावले उचलत नाहीत तोपर्यंत स्वच्छता कर्मचारी म्हणून प्रत्येक बैठकीला उपस्थित राहील, असा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला. मोठ्या संख्येने स्वच्छता कर्मचारी आजारी आणि वृद्ध असल्याने, प्रभागात कचऱ्याचे ढीग साचत आहेत, असे ते म्हणाले.

# आरोपींचे भ्रमणध्वनी सायबर, न्यायवैद्यक तज्ज्ञांकडे

## पेपर फूटप्रकरण, तपासात तांत्रिक अडथळा

लोकसत्ता खास प्रतिनिधी

नागपूर : सेंट उर्सूला शाळेतील परीक्षा केंद्रावरून इयत्ता १२ वीच्या परीक्षे दरम्यान रसायन शास्त्राचा पेपर फुटला. या प्रकरणात सदर पोलिसांनी आतापर्यंत चौघांना अटक केली. त्यांच्या ताब्यातील भ्रमणध्वनी पोलिसांनी जप्त केले आहे. मात्र, या चौघांनीही आपल्या भ्रमणध्वनी संचातील सर्व 'डाटा डिलीट' केला आहे. त्यामुळे तपासात तांत्रिक अडथळा निर्माण झाला आहे.

हा डाटा पुन्हा हस्तगत करण्यासाठी पोलिसांना सायबर आणि न्यायवैद्यक तज्ज्ञांची मदत घ्यावी लागणार आहे. त्यासाठी पोलिसांनी हे सर्व भ्रमणध्वनी तज्ज्ञांकडे पाठवले आहे. बारावी पेपरफुट प्रकरणात पोलिसांनी यापूर्वी खासगी शिकवणी वर्गातला शिक्षक निशिकांत मून आणि एका विद्यार्थ्याला ताब्यात घेतले होते. सोमवारी पोलिसांनी मोमिनपूरा भागातील एक्सेलन्ट अकादमीचा संचालक मुस्तफा खान व जुनेद मोहम्मद अब्दुल जावेद या दोघांना अटक केली.

यापैकी एका विद्यार्थ्याची परीक्षा सुरू असल्याने शैक्षणिक पार्श्वभूमीवर न्यायालयाने जामीन मंजूर केला. मात्र, पोलिसांनी अटक केलेल्या तिघांसह विद्यार्थ्यानेही आपल्या भ्रमणध्वनीतील डाटा डिलीट केला आहे. तो डाटा हस्तगत झाल्यानंतरच या चौघांनी आणखी किती जणांना प्रश्नपत्रिका पाठवली होती, याचा उलगडा होणार आहे.

# मागील दहा वर्षात पद्मश्री पुरस्काराचा सन्मान वाढला

लोकसत्ता खास प्रतिनिधी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी यांचे प्रतिपादन. उद्योगपती सत्यनारायण नुवाल यांचा सत्कार.




**नागपूर :** २०१४ च्या पूर्वी आम्हाला सत्यनारायण नुवाल यांच्यासारख्या व्यक्तींचा सन्मान करण्याची संधी मिळत नव्हती. पुरस्कारानंतर वर्तमानपत्रात त्यांचे नाव वाचल्यावर ही व्यक्ती कोण आहे? असा प्रश्न पडत होता. मात्र मागील दहा वर्षात पद्मश्री पुरस्कार आता तळागळातील व्यक्तीचा शोध घेतो. त्यामुळे दहा वर्षात पद्मश्री पुरस्काराचा सन्मान वाढला, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी यांनी केले.

माधव नेत्रालय, नेत्र संस्थान आणि अनुसंधान केंद्र चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष आणि प्रसिद्ध उद्योगपती सत्यनारायण नुवाल यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यानिमित्ताने माधव नेत्रालयच्यावतीने नुवाल यांचा भैय्याजी जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मोतीलाल ओसवाल, गणपत कोठारी, निखिल मुंडले, अविनाशचंद्र अग्निहोत्री उपस्थित होते.

भैय्याजी जोशी म्हणाले, देशात प्रतिभावान लोकांची कमतरता नाही. काम करणारे अनेक लोक रांगेत आहेत. मात्र, अशा लोकांना शोधून त्यांच्या सन्मान करणारी सरकारी यंत्रणा फार महत्त्वाची आहे. सरकार अशा लोकांना शोधतो याचे कौतुक आहे.

### छोट्याशा यशाने अहंकारी

आम्ही राजकारणाच्या जवळ आहोत असे लोकांना वाटते. त्यामुळे पुरस्कारासाठी काही जण भेटी घेतात. मात्र, नुवाल यांना पुरस्कार जाहीर झाल्यावरच त्यांना पुरस्कार जाहीर झाल्याचे कळले. आज खऱ्या अर्थाने पद्मश्री पुरस्काराचा सन्मान होतो आहे. लोक छोट्याशा यशाने अहंकारी होतात. पण अहंकार शून्य व्यक्ती म्हणजे नुवाल आहेत, असेही भैय्याजी जोशी म्हणाले. यावेळी मोतीलाल ओसवाल, गणपत कोठारी यांनीही नुवाल यांच्या कार्याचा गौरव केला.

सत्यनारायण नुवाल यांचे संपूर्ण जीवन अभ्यास करण्यासारखे आहे. राजस्थान सारख्या राज्यातून येऊन एका छोट्या उपक्रमातून त्यांनी इतका मोठा उद्योग उभा केला. व्यवसाय करणे, पैसे कमावणे काही मोठी गोष्ट नाही. पण परिश्रमातून, सन्मार्गाने पैसे कमवून मोठे होणे महत्वाचे आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देश स्वावलंबी करण्यासाठी प्रयत्न झाले, पण त्यात हवे तसे यश मिळाले नाही. मात्र आज देशाच्या संरक्षणासाठी आवश्यक असा व्यवसाय उभा करून देशाला स्वावलंबी बनवण्यात नुवाल यांचे मोठे योगदान आहे.

## संक्षिप्त

### विविधतेतील समरसता विषयावर परिसंवाद



**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागातील डॉ. ऐ. के. डोरले सभागृहात विविधतेतील समरसता विषयावर परिसंवाद पार पडला. परिसंवादात माजी कुलगुरू डॉ. सिद्धार्थविनायक काणे, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. राजश्री वैष्णव, भौतिकशास्त्र विभागातील डॉ. स्मिता आचार्य, प्राध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधि महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. श्रीकांत कोमवार, डॉ. रचना पोपटकर, ललित कला विभागातील डॉ. पूजा हिरवाडे यांचा सहभाग होता. 'विविधतेतील समरसता : संस्कृती, समुदाय आणि समावेशक शैक्षणिक परिसर' या विषयावर प्रमुख अतिथींनी विचार व्यक्त केले. या सत्रात विज्ञान, कला, विधी, माध्यमे आणि विद्यापीठ प्रशासन अशा विविध शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रांतील मान्यवर तज्ज्ञ सहभागी झाले होते. कार्यशाळेच्या उद्दिष्टांनुसार आंतरशाखीय संवाद आणि समावेशकतेची भावना या चर्चेतून प्रकर्षाने दिसून आली. संचालन डॉ. पायल ठावरे यांनी केले.

### रजनीश काकडेंना पत्रकार भवनात श्रद्धांजली




ज्येष्ठ वृत्तछायाचित्रकार तसेच मुंबई प्रेस क्लबचे उपाध्यक्ष रजनीश काकडे यांचे निधन झाले. नागपूर प्रेस फोटोग्राफर व कॅमेरामन समूहातर्फे पत्रकार भवन येथे आयोजित कार्यक्रमात रजनीश काकडे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. काकडे केवळ छायाचित्रकार नव्हते, तर नव्या पिढीतील अनेक छायाचित्र पत्रकारांचे मार्गदर्शक होते. अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

### आंबेडकरवादी साहित्य संमेलन व्हिएतनाममध्ये

जडागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळातर्फे आयोजित सहावे आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलन व्हिएतनामची राजधानी हनोई येथे २१ व २२ मार्च रोजी आयोजित करण्यात आले आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध नाटककार,कवी, समीक्ष डॉ. सुनील रामटेके यांची निवड करण्यात आली आहे. संमेलनाचे उद्घघाटन हनोईतील आंतरराष्ट्रीय विद्यापीठातील भाषाशास्त्राचे विभागप्रमुख डॉ. ली. व्हॅन यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. थॉन थ्रूऑन, डॉ. थी थॅन वॅन, होऑग मिन्ह सन, राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. राजेश गायकवाड,तामिळनाडूचे प्रिसद्ध लेखक डॉ. गुरुस्वामी, डॉ. के.पी. वासनिक (दिल्ली), प्राचार्य डॉ. वैशाली प्रधान (संभाजीनगर),एम.एच. मकवाना ( गुजरात) उपस्थित राहणार आहेत. स्वागताध्यक्षपद डॉ. जगन कराडे (कोल्हापूर) भूषवणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महामंडळाचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे राहतील.


# सरकारी योजना फक्त दाखविण्यासाठी काय?

## धारणी, चिखलदरामधील परिस्थितीबाबत न्यायालयाकडून अनुभवकथन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** अमरावती जिल्ह्यातील धारणी व चिखलदरा तालुक्यातील २२ गावांमध्ये वीज उपलब्ध करून देण्यात शासनाला यश आले नाही. तेथे सौर ऊर्जेचे पॅनल लावण्यात आले, मात्र देखरेख न केल्यामुळे निष्क्रिय झाले आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आदिवासी गावांमध्ये राबवण्यात येणाऱ्या शिबिरांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत तिथे सांगण्यात येणाऱ्या सरकारी योजना केवळ दाखविण्यासाठी असतात काय, अशी विचारणा केली. न्यायालयाने स्वतःचे अनुभवकथन करत त्या गावातील परिस्थिती सांगितली.

अमरावतीमधील २२ आदिवासी गावातील नागरिक अद्यापही वीज, पाणी यासारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. याप्रकरणी खासदार बळवंत



वानखेडे यांनी जनहित याचिका दाखल केली होती. मात्र खासदाराने त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी संसदऐवजी न्यायालयाचे दार ठोठावणे सुरू केले तर चुकीचा पायंडा पडेल. असे मत व्यक्त करत न्यायालयाने मागील वर्षी नोव्हेंबरमध्ये ही याचिका स्वतःहून चालवण्याचा निर्णय घेतला. या आदिवासी गावांमध्ये पंतप्रधान सौर ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून तीन हजार ५९८ सौर पॅनल लावण्यात आले होते. मात्र यांची नियमित देखरेख न केल्यामुळे बहुतांश निष्क्रिय झाले. याचिकेवर न्या.अनिल किलोर आणि न्या.राज वाकोडे यांच्या खंडपीठासमक्ष सोमवारी सुनावणी झाली. आदिवासींना वेगळी वागणूक का दिली जाते? असा प्रश्न विचारत असे प्रश्न अतिशय गंभीर स्वरुपाचे असून तात्काळ सोडविण्याची गरज असल्याचे मौखिक मत न्यायालयाने व्यक्त केले. यानंतर न्यायालयाने धारणीमधील स्वतःचे अनुभव सांगितले.

काही दिवसांपूर्वी धारणीमध्ये एका शिबिराला भेट दिल्यावर तिथे ६० पेक्षा अधिक योजनांचे स्टॉल लावण्यात आले होते, असे न्यायालय म्हणाले. या शिबिरातील सरकारी योजना कशासाठी असतात? इतक्या सरकारी योजना असताना प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी का असते? असे विविध प्रश्न न्यायालयाने उपस्थित केले. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता न्यायालयाच्या आदेशांची वाट न बघता तात्काळ उपाययोजना करण्याचे मौखिक निर्देश न्यायालयाने दिले.

## दोन लाचखोर कर कर्मचाऱ्यांना अटक

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** घराचा कर कमी करून देण्यासाठी मागितलेल्या लाचेतील २ हजारांची रोख रक्कम स्वीकारताना दोन कर्मचाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली. महापालिकेच्या हनुमाननगर झोन कार्यालयात हा सापळा लावण्यात आला होता.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार प्रमोद मोगरे आणि राकेश अशी या दोन लाचखोर कर्मचाऱ्यांची नावे आहे. मोगरे हा महापालिकेच्या हनुमान नगर झोनमध्ये कर निरीक्षक म्हणून कार्यरत आहे. त्याने एका रहिवाशाला थकलेल्या घराचा कर कमी करून देण्यासाठी लाच मागितली होती. लाचेची ही रक्कम राकेश नावाच्या मध्यस्थामार्फत दिली जाणार होती. राकेश हा पूर्वी सायबर टेक नावाच्या कंपनीत कार्यरत होता. त्याच्या मार्फत मोगरने यापूर्वीही लाचेची रक्कम स्वीकारली होती. लाचलूचपत विभागाच्या जाळ्यात अडकताच राकेशने प्रमोद मोगरेसाठी ही रक्कम स्वीकारल्याचे पथकाला सांगितले. पथकाने करनिरीक्षकालाही ताब्यात घेतले. रात्री उशीरापर्यंत कायदेशीर प्रक्रिया सुरू होती.

# जि. प. निवडणूक इच्छुकांचा हिरमोड

## निवडणुका लांबणीवर पडल्याने संभाव्य उमेदवारांना आर्थिक नियोजनाची चिंता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** जिल्हा परिषदांच्या आरक्षणाचा विषय सर्वोच्च न्यायालयात आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल न लागल्याने जिल्हा परिषदांच्या निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. त्यामुळे इच्छुकांचा हिरमोड झाला आहे. त्यांना आर्थिक नियोजनाची चिंता लागली आहे.

आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांवर गेल्याने सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणच रद्दबातल ठरले. राज्य शासनाने न्यायालयात बाजू मांडत कायद्यातही बदल केला. त्यानंतर न्यायालयाने आरक्षण पूर्ववत केले. त्यामुळे गेली

> जिल्हा परिषदेवर प्रशासक नियुक्त होऊन वर्षभराचा काळ झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने याचिकेवरील निर्णय लवकरात लवकर दिल्यास निवडणुकीबाबतचे चित्र स्पष्ट होईल.
>
> **– नाना कंभाले,** माजी जि.प. सदस्य, नागपूर.

चार, साडे वर्ष रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला.

राज्यातील ३२ जिल्हा परिषदा व त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी गट (सर्कल) रचना व जागा आरक्षणाचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आला. गट रचना निश्चित करण्यात आली व जागाही आरक्षित करण्यात आल्या. परंतु राज्य निवडणूक आयोगाने जागा आरक्षित करण्यासाठी दिलेल्या सुत्रामुळे २० जिल्हा परिषदांमध्ये आरक्षण हे ५० टक्क्यांवर गेले. त्यामुळे आरक्षण प्रक्रियेविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. दरम्यान राज्य निवडणूक आयोगाने ५० टक्के मर्यादेत असलेल्या १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका पार पडल्यात. ५० टक्केवर आरक्षण असलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुका सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर घेण्याचा पवित्रा घेतला. सोमवारला आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. यात अंतिम निकाल लागेल,अशी अपेक्षा इच्छुकांना होती. परंतु न्यायालयाने यावर पुन्हा सुनावणी घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे निवडणुकांबाबतचे चित्र अद्याप स्पष्ट नाही. त्यामुळे इच्छुकांचा हिरमोड झाला. त्यांना निवडणुका जाहीर होतपर्यंत वाट पाहावी लागणार असून संघातील मतदार नाराज होणार नाही, याचीही काळजी घ्यायची आहे. समोर अनेक उत्सव, सण आहेत. त्याचे नियोजनही करावे लागणार आहे. त्यामुळे आर्थिक नियोजनाची त्यांना चिंता लागली आहे.

## विद्यमान सरपंचच असतील प्रशासक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** राज्यात जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत ज्या ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपुष्टात येणार आहे, त्या ग्रामपंचायतींमध्ये सध्याचे सरपंचच प्रशासक म्हणून नियुक्त केले जातील. तसेच ग्रामपंचायतीतील इतर सदस्यांचा समावेश प्रशासकीय समितीत करण्यात येईल, अशी माहिती राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाला दिली. राज्य शासनाच्या ग्वाहीनंतर न्यायालयाने याचिका निकाली काढली. बुलढाणा जिल्ह्यातील अरविंद दळवी यांच्यासह सात सरपंचांनी राज्य शासनाच्या प्रशासक नेमण्याच्या निर्णयाला आव्हान देत याचिका दाखल केली होती.

# धोरणे ठरविण्याच्या प्रक्रियेतून वंचित बहिष्कृत

## डॉ. पुरणचंद्र मेश्राम यांचे प्रतिपादन

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**नागपूर :** देशातील वैधानिक पदांवर वंचितांना संधी नसल्याने हा वर्ग देशातील विविध क्षेत्रातील धोरणे ठरविण्याच्या प्रक्रियेतून बहिष्कृत झाला आहे. त्यामुळे संविधानातील 'समान संधी' या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे. यासाठी शासनाने व्यापक स्वरूपाचा 'समान संधी कायदा' तयार करून अंमलात आणावा, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. पुरणचंद्र मेश्राम यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षक संघटनेच्या वतीने धनवटे नॅशनल महाविद्यालयाच्या सभागृहात 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व आंबेडकरी शिक्षकांपुढील आव्हाने' या विषयावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोपीय सत्रात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शासकीय विज्ञान संस्थेचे माजी संचालक डॉ. जयराम खोब्रागडे होते. संघटनेचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश चिमनकर, कार्याध्यक्ष डॉ. विकास जांभुळकर, सचिव प्रा. श्रीकांत भोवते, शासकीय कला संस्थेचे संचालक डॉ. मनोहर कुंभारे व प्रा. राष्टपाल मेश्राम उपस्थित होते.

डॉ. मेश्राम म्हणाले, संविधानाच्या कलम १६(४) अंतर्गत सार्वजनिक पदामध्ये सामाजिकदृष्ट्या वंचित वर्गाला पुरेसे प्रतिनिधित्व मिळण्याची तरतूद करण्यात आली आहे. परंतु, या तरतुदीनुसार आरक्षण व रोस्टर लागू असणाऱ्या पदांमधेच प्रतिनिधित्व मिळते. परंतु, जी पदे आरक्षणाच्या कक्षेबाहेर आहेत अशा असंख्य वैधानिक पदामध्ये वंचित समूहाला प्रतिनिधित्व मिळत नाही. त्यामुळे संविधानातील समान संधीच्या घटनात्मक हक्काची पायमल्ली होत आहे. त्यामुळे वंचित वर्ग राष्ट्राच्या विविध क्षेत्रातील धोरणे ठरविण्याच्या व निर्णय घेण्याच्या प्रक्रियेतून बाद झाला आहे. ही बाब संविधानातील समान न्याय व समान संधी या तत्वाची पायमल्ली करणारी आहे.

याबाबत आंबेडकरी शिक्षकांनी सजग होऊन लढा उभारण्याची आवश्यकता असल्याचे आवाहन मेश्राम यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. श्रीकांत भोवते यांनी केले तसेच प्रा. पितांबर हुमने यांनी आभार मानले.

## 'स्मशानभूमीसाठी जागा खरेदीचे जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार द्या'

**नागपूर :** स्मशानभूमीसाठी हक्काची जागा नसल्याने अनेकदा खासगी मालकीच्या किंवा अतिक्रमण केलेल्या जागेवर अंत्यसंस्कार करावे लागतात. जिथे शासकीय जमीन नाही तिथे खासगी जमीन खरेदी करण्याचे विशेष अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना द्यावे, अशी मागणी आमदार डॉ. परिणय फुके यांनी विधानपरिषदेत केली.

विधानपरिषदेत अर्धा तास चर्चा अंतर्गत फुके यांनी ग्रामीण भागात मृत्यूनंतर मानवी देहाची जी विटंबना होत आहे, ती पाहता आपण खरंच प्रगत आहोत का, असा प्रश्न उपस्थित केला. नागपूर जिल्ह्यासारख्या महत्त्वाच्या ठिकाणी २०४ गावांत स्मशानभूमी नाही, हे केवळ जागेचे संकट नसून महसूल आणि ग्रामविकास विभागातील समन्वयाचा पूर्णपणे अभाव असल्याचे त्यांनी सांगितले.

## घरगुती वादातून शाळकरी मुलीची आत्महत्या

**नागपूर :** आई- वडिलांमध्ये सुरू असलेल्या घरगुती वादामुळे सतत नैराश्यात राहणाऱ्या शाळकरी मुलीने घरातच गळफास घेऊन आत्महत्या केली. हुडकेश्वर पोलीस हद्दीतील न्यू म्हाळगी नगरातल्या शिवाजी लेआऊटमध्ये ही घटना घडली. आई-वडिलांमधील वादामुळे टोकाचा निर्णय घेत जीवनयात्रा संपवणारी मुलगी इयत्ता आठव्या वर्गातली विद्यार्थीनी होती. हुडकेश्वर पोलिसांनी पंचनामा करत मृतदेह शवविच्छेदनासाठी मेडिकलला रवाना केला.

# भावाचा कसला राग करायचा?

**शहरबात**

**प्रमोद मुनघाटे**

*''मी खूप सोपं काम करत*
*आलोय*
*जसं की;*
*रोज कामावर जाणं*
*इमानदारीनं काम करणं*
*दिवसभर भेटलेल्या व्यक्तींशी*
*हसून बोलणं*
*बायको मुलांना वेळ देणं*
*मित्रांशी गप्पा करणं*
*कविता लिहिणं*
*माणूस म्हणून जगणं...*
*माफ करा यार !*
*मला कठीण काम*
*जमलचं नाही...''*

संजय गोडघाटेची ही कविता वाचताना मला नागपुरातील एक जुनी घटना आठवली. १९८०-९० चा तो काळ चळवळींचा होता. विद्रोहाचे पलिते पेटलेले होते. तेंव्हा हातोहाती मोबाइल नव्हते. पण एखाद्या उद्वेगजनक घटनेची ठिणगी वाऱ्याच्या झोतासारखी वस्त्यावस्त्यांत पसरे. संतापाचा उद्रेक होई. एकदा सीताबर्डीवरच्या धनवटे रंगमंदिरात नाटककार विजय तेंडुलकर बोलत होते. प्रेक्षकातून त्यांच्यावर एक चप्पल भिरकावली गेली. संजय जीवने या पुढे दलित रंगभूमी गाजविणाऱ्या नागपुरातील कलावंताने ती फेकली होती. हलकल्लोळ माजला. सभा विस्कटली. धरपकड झाली. प्रकरण गाजले. विषय तेंडुलकरांच्या 'कन्यादान' नाटकाचा होता. एका पात्रावरून मोठा वादंग झाला होता. त्याचे ते पडसाद होते. आता तो इतिहास झाला.



आणि संजय गोडघाटे हा नागपुरातील कवी आजचे वर्तमान आहे. तो गॅस कंपनीत डिलिव्हरी मॅन आहे. वडील इमारत बांधकाम मजूर होते. दक्षिण नागपूरच्या जयभीमनगरात संजय राहतो. तो ग्रॅज्युएट आहे. दिवसाचे आठ-दहा तास ज्वलनशील गॅस सिलिंडर आपल्या खांद्यावर वाहताना संजय मनात कवितेच्या ओळी गुणगुणत असतो. कविता हे एकच व्यसन त्याला आहे. सदा हसतमुख असलेल्या संजयच्या चेहऱ्यावर निराशा कधी दिसली नाही. कुणाविषयी मत्सर नाही. असूया नाही. कुठेही कवितेचा कार्यक्रम असो, संजय तिथे हजेरी लावणार. संधी मिळाली तर आपली कविता वाचणार. त्याचे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. तो म्हणतो तसे त्याचे रोजचे जगणे 'सोपे' आहे. कथा-कादंबरीत लेखक प्रतिसृष्टी निर्माण करतो. त्यात कला-कुसरीला वाव असतो. कवितेत मात्र कवीला स्वतःलाच उभे करावे लागते. तो जितका नग्न होईल, तेवढी त्याची कविता, कविता म्हणून सिद्ध होते. 'शीर्षक नसलेले आयुष्य' हे त्याच्या आणि त्याच्या कवितेचे एक वास्तव आहे. तो लिहितो,

*''कधी हसली चूल पोटभर*
*कधी भूक हमसून रडली*
*भाकरीच्या चतकोरासाठी*
*आवडीची पुस्तकेही विकली*
*भूक देणाऱ्याला शोधतो*
*कापून घे पोट माझे म्हणतो...*
*ओझे वाहण्यात आयुष्य खंगले*
*तन धूळजले*
*रात्र हरविली*
*स्वप्न कोमेजले*
*कविता गातो, कविता ऐकतो*
*अन् मनाला सजवून घेतो...''*

मुद्दा विषमते विरुद्ध पेटून उठण्याचा आणि निवण्याचा आहे. काळाच्या प्रवाहात जगण्याच्या प्रेरणा बदलतात, तसे साहित्याचे प्रवाहदेखील नवी वळणे घेतात. विद्रोहाचा लाव्हा थंड होतो. पण त्या खडकाळ जमिनीवर आल्हादक हिरवळ उगवते. संजय गोडघाटेची कविता मला या हिरवळीसारखी दिसते. पण तिच्या पोटात विद्रोहाचे जीवाश्म कायम आहेतच. 'आयुष्य एक युद्ध' या संग्रहातील एका कवितेत संजय लिहितो,

*''मालक*
*आम्हाला या गोष्टीची तकलीफ*
*नाही*
*की सिलेंडरचे ओझे*
*तिसऱ्या चौथ्या मजल्यावर*
*पोचवावे लागते*
*आम्हाला या गोष्टीची तकलीफ*
*नाही*
*की आमच्या मांसासह आमची*
*हाडही रसरसतात*
*आम्हाला या गोष्टीची तकलीफ*
*नाही*
*की आम्हाला गरजा मारून*
*जगावं लगतं*
*आम्हाला या गोष्टीचा बिलकुलच*
*त्रास वाटत नाही की*
*आम्हाला पदोन्नती किंवा*
*वेतन आयोग नाही*
*आम्हाला या गोष्टीची*
*खंत आहेः*
*तुम्ही आम्हाला*
*माणूसच समजत नाही !''*

आत्मचरित्रात लेखक बरेचदा सत्य लपविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतो. कवितेत कवीचा खोटा अनुभव पकडला जातो. संजयचे त्याच्या आयुष्यासारखे परिसराशीही सेंद्रीय नाते आहे. म्हणून कवितेत त्याची वस्ती, घर, माणसांसकट सगळ्या कथा-दंतकथाही जिवंत होतात. 'घेऊन जा २२ गे...' ही कविता अशीच आहे. नागपूरकर भोसले राजवंशातील बांकाबाईच्या फितुरीमुळे इंग्रजांनी राजाला पकडले होते. या घटनेचा निषेध म्हणून पोळ्याच्या पाडव्याला जागनाथ बुधवारी आणि इतवारीमधून पिवळी व काळी मारबत आणि बडग्याची धिंड निघते. लाखो लोक आजही या उत्सवात सहभागी होतात. नागपूर हे कट्टर धर्मांध मानसिकतेचे शहर कधीच नव्हते. मारबतीचा उत्सव कोण्या एका धर्माचा-जातीचा नव्हता. ('अफवा खरी ठरावी म्हणून' नागपुरात धार्मिक दंगली घडवतात, ही गोष्ट अलीकडची) पूर्वी डहाका-पोवाडे असत. दांडपट्टे-आखाडा आणि मर्दानी कसरती असत. आजही गोंडी बाजा आणि आधुनिक बॅंड वाजवला जातो. संजयच्या कवितेत ही बांकाबाई येते. तो म्हणतो,

*''बांकाबाई !*
*प्रशासन ठरले लुळे*
*स्वच्छता-आरोग्य-मूलभूत*
*सुविधांचे प्रश्न सोडविण्यास*
*अशा वेळी आशेने आम्ही बघावे*
*तरी कुणाकडे? तुझ्याकडेच ना?*
*तू भोसले कुळाशी केली गद्दारी*
*आणि इंग्रजांनी फडकवला*
*शहरावर युनियन जॅक*
*म्हणून तू ठरलीस बदनाम*
*मिरवणुकीचा विषय*
*सजा तर मिळायलाच पाहिजे ना*
*गद्दारीची बांकाबाई !*
*पण या वेळेला संधी नामी आहे*
*तू आमच्या साऱ्याच*
*अस्मानी-सुलतानी संकटांना*
*जाळून टाक*
*स्वतः जळत असताना*
*प्रायश्चित्त समजून !''*

सत्तर-ऐंशीच्या दशकातील दलित कविता आठवा. वामन निंबाळकरांपासून ते यशवंत मनोहर यांच्यापर्यंत. विद्रोहाचे धगधगीत निखारे शब्दाशब्दात पेरलेले. ती कविता छापील पुस्तकात बंदिस्त नव्हती. कविता वाचून रस्त्यावरच्या मोर्चातील लोकांच्या मुठी आवळल्या जात. पण चळवळीचाही एक काळ असतो, एक इप्सित असते. प्रश्न बदलतात, तसे चळवळीचे स्वरूप बदलते. मोर्चे गल्ली बदलतात. कार्यकर्त्यांच्या निष्ठाही यू टर्न घेतात. या पार्श्वभूमीवर विद्रोहाचे पुढे काय होते? पोटाची भूक, घरावरचे छप्पर आणि अंगावरच्या वस्त्राचे प्रश्न सनातन आहेत; बाकी सगळी तत्त्वज्ञानं 'विकासा'च्या लाटेत विलीन होऊन जातात, मध्यरात्री शत्रूच्या गोटात पक्षप्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यासारखे. म्हणून एका कवितेत संजय लिहितो,

*''आम्ही दगडावर दगड रचून*
*करतोय मजबूत*
*तुमच्या इमारतीचा पाया*
*इकडे हवेच्या हलक्या झोक्यानं*
*उडत जातात आमच्या झोपड्या*
*तुम्ही करता दुर्लक्ष*
*देत नाही काळजीनं लक्ष*
*पण आता येत नाही राग*
*आम्हा असल्या हलक्या गोष्टींचा*
*हल्ली मी पोराच्या*
*पाठ्यपुस्तकातील*
*प्रतिज्ञा वाचतोयः*
*'भारत माझा देश आहे*
*सारे भारतीय माझे बांधव आहेत'*
*भावाचा कसला राग*
*करायचा?''*

पुढारी उठताबसता 'संविधान' शब्दाचा जप करतात. त्याच वेळी देशात बलात्काऱ्यांचे सत्कारही सुरू असतात आणि कार्यकर्त्यांच्या घरावर बुलडोझरही चालवले जातात. अशा या काळात कुणाचा कसला राग करायचा? असेच जणू हा कवी विचारतो.

pramodmunghate304@gmail.com

# समर्पणाचे दुसरे नाव कस्तुरबा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

> **लो**
>
> **लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या विजया मारोतकर यांचे प्रतिपादन. सर्वोदय आश्रमतर्फे कस्तुरबा गांधी पुण्यतिथीनिमित्त विशेष कार्यक्रम.**



**नागपूर :** सत्य आणि अहिंसेच्या पायावर उभ्या असलेल्या स्वातंत्र्य लढ्यात कस्तुरबा गांधी यांचे समर्पण जाणून घेणे आजच्या समाजासाठी अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या विजया मारोतकर यांनी केले.

सर्वोदय आश्रमतर्फे कस्तुरबा गांधी पुण्यतिथीनिमित्त 'समर्पणाचे दुसरे नाव कस्तुरबा' या विषयावर मंगळवारी कार्यक्रम पार पडला. त्यात मारोतकर बोलत होत्या. अध्यक्षस्थानी भन्साळी ग्रामसेवा मंडळाच्या डॉ. चित्रा तुर होत्या.

आजच्या काळात सत्य एकटे पडताना दिसते आणि असत्याभोवती गर्दी दिसते. अशा परिस्थितीत कस्तुरबांचे स्मरण समाजाला दीशादर्शक ठरते,

### सत्याग्रहात महिलांच्या सहभागाबाबत आग्रह

मिठाच्या सत्याग्रहात महिलांचा सहभाग असावा यासाठी कस्तुरबांनी आग्रही भूमिका घेतली. इंग्रजांविरोधातील लढ्यात त्या गांधीजींसोबत खंबीरपणे उभ्या राहिल्या. गांधीजींना वारंवार तुरुंगवास भोगावा लागला तेव्हा संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्यांनी समर्थपणे सांभाळली. त्यामुळे गांधीजी राष्ट्रीय कार्यात निर्धास्तपणे पुढे जाऊ शकले, असे मारोतकर म्हणाल्या.

स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग नोंदवणे ही त्या काळातील महिलांसाठी मोठी बाब होती. चूल आणि मूल या मर्यादित विश्वात वावरणाऱ्या महिलांमध्ये कस्तुरबांनी आत्मविश्वास निर्माण केला. आरोग्य, शिक्षण आणि अस्पृश्यता निर्मूलनाबाबत जागृती घडवून महिलांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी करून घेतले. पुढील काळात महात्मा गांधी यांच्या प्रत्येक आंदोलनात महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग दिसून आला, त्यामागे कस्तुरबांचे कार्य कारणीभूत होते, असे मारोतकर यांनी नमूद केले.

प्रमुख वक्त्यांचा परिचय संस्थेचे सचिव वंदन गडकरी यांनी करून दिला, तर प्रास्ताविक अरुण मानकर यांनी केले. यावेळी ज्येष्ठ सर्वोदयी लीलाताई चितळे उपस्थित होत्या.

## संक्षिप्त

### धानाला प्रोत्साहन बोनस देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत

**मुंबई :** धान उत्पादकांना प्रोत्साहन बोनस देण्यासाठी सरकार सकारात्मक आहे. धान उत्पादकांना बोनस देताना काही चुकीचे घडत आहे. ते थांबवले पाहिजे. शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी शेतकऱ्यांचे बँक खाते आधार कार्डशी जोडण्यात येत आहे. धानाला बोनस देण्याचा निर्णय हा मंत्रिमंडळ बैठकीत घेऊ, असे आश्वासन राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत दिले. धान उत्पादकांना बोनस द्यायचा आहे की नाही अशा शब्दात सत्ताधारी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी कदम यांना धारेवर धरले. किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत राज्य सरकार २०१३ पासून धान उत्पादकांना प्रोत्साहनपर बोनस देत आहे. २०२४-२५ मध्ये सात लाख २७ हजार ५४८ नोंदणीकृत शेतकऱ्यांना एक हजार ६३६ कोटी रुपये देण्यात आले. यंदा शेतकऱ्यांची संख्या ७ लाख १६ हजार ३३४ असून त्यांनी ८ लाख ७२ हजार ४५६ हेक्टर जमिनीवर धान उत्पादन केले आहे. त्यांना हेक्टरी वीस हजार रुपये देण्याचा निर्णय हिवाळी अधिवेशनात जाहीर झाला आहे. ही रक्कम शेतकऱ्यांना अद्याप मिळालेली नाही. शेतकऱ्यांची संख्या कमी आणि बोनस जास्त अशी तफावत सरकारला आढळून आली आहे. या योजनेत दोन कोटी रुपयांचा घोटाळा झालेला आहे. त्याची चौकशी पूर्ण झाली आहे, असे कदम यांनी सांगितले.

### राज्यपालांचे अभिभाषण वास्तवापासून दूर

**मुंबई :** राज्यात बेरोजगारीची टक्केवारी व शेतकरी आत्महत्यांमध्ये कमालीची वाढ झाली असून मोठे प्रकल्प गुजरातमध्ये जात आहे. मात्र राज्यपाल यांच्या अभिभाषणामध्ये राज्याच्या प्रगतीचे चित्र रंगवले आहे. राज्यपाल यांचे अभिभाषण राज्यातील वास्तव दाखवत नसून विकासाचे फसवे चित्र उभे करते, अशी टीका शिवसेनेचे आमदार भास्कर जाधव यांनी केली. मंगळवारी विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील अभिनंदनाच्या प्रस्तावावरील चर्चेस सुरुवात झाली.

राज्यातील बेकारीचा दर ४.१ टक्के होतो, तो ७.५ टक्के झाला. मागच्या वर्षी राज्यात ६ हजार ६६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून हे प्रमाण देशाच्या तुलनेत ३८ टक्के आहे. आनंदाचा शिधा, तीर्थदर्शन योजना, एका रुपयात पीक विमा, एक राज्य एक गणवेश, योजना दूत अशा अनेक योजना आर्थिक चणचणीमुळे सरकारने बंद केल्या आहेत, असा आरोप जाधव यांनी केला. राज्यावर ९ लाख ३२ हजार कोटींचे कर्ज आहे. दुसरीकडे राज्याची अर्थव्यवस्था १ लाख कोटी डॉलर्सवर नेणार असल्याचे सरकारने अभिभाषणात नमूद केले. खोटे पण रेटून बोलण्याची या सरकारची सवय असून राज्यपालांच्या अभिभाषणाला आपला विरोध असल्याचे जाधव यांनी नमूद केले. या चर्चेत संजय कुटे, अर्जुन खोतकर, चेतन तुपे यांनी भाग घेतला.

### घरफोड्या करणाऱ्या टोळीला अटक

**नागपूर :** शहरातील सुपारी व्यावसायिकाचे घर फोडून ४३ लाखांचा मुद्देमाल लंपास करत परराज्यात पळ काढलेल्या पाच जणांच्या टोळीला अटक करुन त्यांच्याकडून चोरलेले दागिने आणि लाखो रुपयांची महागडी घड्याळे जप्त केली. सतत ठिकाणे बदलत फिरणाऱ्या या टोळीला जाळ्यात अडकवण्यासाठी कळमना पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला सलग महिनाभर बिहार राज्यातील पाच जिल्हे पिंजून काढावे लागले. इरफान शमशाद अंसारी (२१), समीर निजाम अंसारी (१९), अनवर असगर अली (४०), प्रमोद मधुकर कावळे (५७) आणि एक विधीसंघर्षग्रस्त बालक अशी टोळीतील सदस्यांची नावे आहे. यातील इरफान आणि समीर हे दोघे टोळीचे सूत्रधार असून ते दोघेही बिहार राज्यातील लालगंज आणि दानापूर येथील रहिवासी आहे.

# ‘डिजिटल अरेस्ट’ ही फसवणूकच!

## मुख्यमंत्र्यांची माहिती

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** आभासी अटक (डिजिटल अरेस्ट) असा कोणताही प्रकार नसून अशी अटक करण्याचा कोणालाही अधिकार नाही. त्यामुळे कोणी फोन अथवा व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून आभासी अटक करण्यात आल्याचे सांगत असेल तर ती फसवणूकच असते. अशावेळी त्वरित सायबर गुन्हे पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी केले.



### ‘१९३० क्रमांकावर संपर्क साधा’


फोन अथवा व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून कोणी आभासी अटक केल्याचे धमकावून पैसे मागत असेल तर ती सायबर फसवणूक आहे हे लक्षात घ्यावे आणि कोणालाही न घाबरता थेट सायबर पोलिसांकडे त्वरित तक्रार नोंदवावी. त्यासाठी १९३० क्रमांकावर फोन करावा आणि आपली तक्रार नोंदवावी. गोल्डन अवरमध्ये (सुवर्ण तास) तक्रार झाल्यास त्वरित कारवाई करून तक्रारदाराचे पैसे वाचविता येऊ शकतात. त्यामुळे लोकांनी सजग राहून आभासी अटकेबाबत त्वरित तक्रार करावी, असे आवाहन फडणवीस यांनी केले.

आभासी अटकेच्या नावाखाली लोकांची मोठ्या प्रमाणात ऑनलाइन फसवणूक होत असल्याबाबत समाजवादी पक्षाचे अबू आझमी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावरील चर्चेदरम्यान फडणवीस बोलत होते. सीबीआय, कस्टम, पोलीस अधिकारी असल्याचे सांगून लोकांची आभासी अटकेच्या नावाखाली फसवणूक करण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे.

आभासी अटकेच्या घोटाळ्यास अनेक सुशिक्षित नागरिकही बळी पडत आहेत. काही दिवसांपूर्वी एक सेवानिवृत्त सनदी अधिकारी तसेच नौदलाच्या उच्चपदस्थ निवृत्त अधिकाऱ्यालाही आभासी अटक दाखवून कोट्यवधी रुपयांना फसविले. फसवणूक करणाऱ्या लोकांना अभासी अटकेची भीती दाखवून त्यांच्या बँक खात्यातील पैसे काढून घेतात. त्यानंतर लगेच हे पैसे विदेशातील शेकडो खात्यांमध्ये पाठविले जातात. यातून लोकांची फसवणूक होत असून नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन फडणवीस यांनी केले.

# प्रदेश भाजपमध्ये मोठे फेरबदल, नवीन चेहऱ्यांना संधी

## चित्रा वाघ महिला अध्यक्षपदी कायम; केशव उपाध्ये उपाध्यक्षपदी





लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

### मिहिर कोटेचा कोषाध्यक्ष, सहकोषाध्यक्षपदी लखानी.

आमदार मिहिर कोटेचा यांची तिसऱ्यांदा खजिनदार म्हणून नियुक्ती झाली असून सहकोषाध्यक्ष म्हणून अरुण लखानी यांची पुन्हा नियुक्ती झाली आहे. उद्योगपती लखानी हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) खासदार सुप्रिया सुळे आणि सदानंद सुळे यांचे व्याही होणार आहेत. भाजप खासदार धनंजय महाडिक यांचा मुलगा कृष्णराज महाडिक यांची नियुक्ती युवा मोर्चाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सह मुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांची नियुक्ती मुख्यालय सह प्रभारीपदी करण्यात आली आहे.

● **प्रदेश उपाध्यक्ष :** अतुल काळसेकर, भारती पवार, संजय कोडगे, संजय भेंडे, रामदास तडस, केशव उपाध्ये, प्रवीण पोटे, गोपीचंद पडळकर, चैतन्य देशमुख, प्रिया शिंदे, सुजय विखे पाटील, अर्चना पाटील चाकूरकर.

● **प्रदेश सरचिटणीस :** आमदार निरंजन डावखरे, योगेश सागर, संजय कुटे, माधवी नाईक, राजेश पांडे, सुनील राणे.

**मुंबई :** प्रदेश भाजपमध्ये मोठे फेरबदल करण्यात आले असून नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी प्रदेश पदाधिकाऱ्यांची घोषणा मंगळवारी केली असून सरचिटणीस माधवी नाईक व राजेश पांडे, महिला मोर्चाच्या अध्यक्षा चित्रा वाघ, उपाध्यक्ष अतुल काळसेकर यांना नवीन कार्यकारिणीमध्ये पुन्हा स्थान मिळाले आहे. मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती झाली असून माध्यमप्रमुख नवनाथ बन यांना मुख्य प्रवक्तेपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

गेले काही महिने रखडलेल्या प्रदेश पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मंगळवारी जाहीर केल्या. त्यामध्ये १२ उपाध्यक्ष, ६ सरचिटणीस, १२ चिटणीस, कोषाध्यक्ष, सहकोषाध्यक्ष आदींचा समावेश आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण होऊ नये, यासाठी प्रदेश पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या या निवडणुका पार पडल्यावर करण्यात आल्या आहेत. केंद्रीय नेतृत्व आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनांनुसार पदाधिकाऱ्यांमध्ये मोठे फेरबदल करण्यात आले असून सरचिटणीस विक्रांत पाटील, रणधीर सावरकर, संजय केणेकर, विजय चौधरी यांना नव्या कार्यकारिणीत स्थान मिळालेले नाही.

सरचिटणीस मुरलीधर मोहोळ हे केंद्रीय मंत्रिमंडळात गेल्याने त्यांचा नव्या पदाधिकाऱ्यांमध्ये समावेश नाही. जुन्या आणि नव्या निष्ठावंत कार्यकर्त्यांची पदाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे चव्हाण यांनी सांगितले. नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांमध्ये विभागीय समतोल आणि महिलांनाही पुरेसे प्रतिनिधित्व दिल्याचे वरिष्ठ नेत्यांनी सांगितले.

# नियमभंग करणाऱ्या डान्सबारला कायमचे टाळे

## मुख्यमंत्र्यांची विधानसभेत घोषणा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यात ऑर्केस्ट्राबारच्या नावाखाली पुन्हा एकदा डान्सबारचे पेव फुटले आहे. या विरोधात लवकरच धडक मोहीम हाती घेतली जाईल. तसेच नियमबाह्य चालणाऱ्या बारला कायमचे टाळे ठोकण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत केली.

सुभाष देशमुख, भास्कर जाधव यांच्यासह मनोज जामसुतकर, रणधीर सावरकर, विजय देशमुख, शंकर जगताप, विक्रम पाचपुते, प्रवीण दटके, संजय केळकर, किसन कथोरे आदी सदस्यांनी राज्यभर चालणाऱ्या ऑर्केस्ट्रा आणि डान्सबारवर कारवाई करण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान फडणवीस यांनी ही घोषणा केली. राज्यात डान्सबार बंदी घालण्यात आली होती. याबाबत राज्य सरकारने वेळोवेळी केलेले कायदे सर्वोच्च न्यायालयाने रद्द केले. मात्र त्यानंतरही सरकारने ऑर्केस्ट्राबारबाबत कठोर नियम केले. सर्वोच्च न्यायालयानेही या नियमांना मान्यता दिली आहे. तरीही ऑर्केस्ट्राबारच्या नावाने डान्सबार चालवले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा अशा बारची तपासणी करून कठोर कारवाई केली जाईल. तीनपेक्षा अधिकवेळा नियमभंग करणाऱ्या बारचे परवाने कायमचे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला असून तसे आदेशही देण्यात आल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

# मराठी भाषेचा अभिजात दर्जा कागदावरच!

विकास महाडिक, लोकसत्ता

**मुंबई :** केंद्र सरकारने १५ महिन्यांपूर्वी मराठी भाषेला दिलेला ‘अभिजात दर्जा’ केवळ कागदावर आहे. स्वतंत्र ‘उत्कृष्ट अध्ययन केंद्र’ (एक्सलेंन्स सेंटर) स्थापन न झाल्याने केंद्राकडून राज्याला मराठी भाषा संवर्धन आणि संरक्षणासाठी आतापर्यंत एक छदामही मिळालेला नाही.



अभिजात दर्जा देण्यात आलेल्या देशातील भाषांसाठी केंद्राने २० वर्षांपूर्वी धोरण तयार केले. त्यात सुधारणा करण्याच्या सबबीखाली राज्य सरकारने पाठवलेला उत्कृष्टता केंद्र प्रस्ताव केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडे पडून आहे. सुधारणा होत नाही तोपर्यंत निधी नाही. त्यामुळे हा निधी कधी मिळेल, हे गुलदस्त्यात आहे. प्राचीन परंपरा, संस्कृती आणि साहित्यनिर्मिती असलेल्या मराठी भाषेला राज्य सरकारच्या अनेक वर्षांच्या प्रयत्नानंतर ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्राने अभिजात दर्जा जाहीर केला. केंद्र सरकारने यापूर्वी तमिळ, संस्कृत, कन्नड, तेलुगू, मल्याळम, ओडिया आणि १५ महिन्यापूर्वी मराठी बरोबर पाली, प्राकृत. असामिया आणि बंगला अशा ११ भाषांना अभिजात दर्जा देण्यात आलेला आहे. अभिजात दर्जा मिळालेल्या भाषेच्या संर्वधन, संशोधन आणि संपादनासाठी केंद्राकडून सादर केलेल्या प्रकल्पानुसार निधी दिला जातो. यापूर्वी अभिजात दर्जा मिळालेल्या भाषांसाठी एकच उत्कृष्ट अध्ययन केंद्र म्हैसूरमध्ये केंद्रीय भारतीय भाषा संस्था (सीआयआयएल) नावाने स्थापन करण्यात आले.

मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर राज्य सरकारने पहिल्यांदा मुंबईत स्वतंत्र असे उत्कृष्टता अध्ययन केंद्र स्थापन करण्याची परवानगी मागणारा प्रस्ताव केंद्राकडे सादर केला. हा निधी मिळावा, यासाठी राज्य सरकारच्या भाषा विभागातील उच्च अधिकाऱ्यांनी दोन वेळा दिल्लीवारी केली. शिक्षण मंत्रालयाने उत्कृष्टता केंद्र कसे असावे, याचा अभ्यास करण्यासाठी मराठी भाषा विभागातील अधिकाऱ्यांना म्हैसूरला पाठवले. पाहणीनंतर राज्य सरकारने मागील वर्षी १५ सप्टेंबरला उत्कृष्टता केंद्राचा विस्तृत प्रकल्प आराखडा (डीपीआर) सादर केला. हा आराखडा मंजूर करावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १६ जानेवारी रोजी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पत्र लिहून विनंती केली. देशातील सहा भाषांना अभिजात दर्जा देताना केंद्राने १ नोव्हेंबर २००४ रोजी एक धोरण तयार केले. या धोरणानुसार या भाषांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र सरकार निधी देते. या धोरणातच आता सुधारणा करायची असल्याने मराठी भाषेच्या संर्वधनासाठी मिळणारा निधी कधी मिळेल हे सांगता येत नाही. मराठी भाषेसाठी आग्रही सरकारने अभिजात दर्जा मिळाल्यानंतर प्रचार आणि प्रसारासाठी एक कोटी खर्च केले.

# सरकारी कर्मचाऱ्यांच्या घरभाड्यात वाढ

## निवासस्थान सेवाशुल्कात दुपटीने वाढ; २०२३ पासूनची वाढ वसूल करण्याचा निर्णय

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनात झालेली वाढ तसेच निवासस्थानांच्या सुविधा पुरविण्यासाठी लागणाऱ्या खर्चात झालेली वाढ लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने सरकारी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थान सेवाशुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार ही वाढ दुपटीने करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी आणि घराच्या क्षेत्रफळानुसार ही वाढ करण्यात आली असून १ फेब्रुवारी २०२३ पासून ही वाढ वसूल केली जाणार आहे.

### अतिरिक्त सुविधांसाठी अतिरिक्त दर

अतिमहत्त्वाच्या व्यक्ती/ अधिकारी वर्गाकरिता देण्यात येत असलेल्या अतिरिक्त सुविधांसाठी अतिरिक्त दर आकारण्यात येणार आहे. पोलीस, लिफ्ट, लिफ्टमन, सुरक्षा रक्षक, स्वच्छता कामगार इत्यादी सुविधांचा यामध्ये समावेश असून हे अतिरिक्त शुल्क आकरण्याचे अधिकारी कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आले आहेत. यापुढे दरवर्षी सेवाशुल्कात वाढ करण्यात येणार असून याविषयीचे आदेश दरवर्षी काढण्यात येणार आहेत.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना निवासस्थाने पुरविण्यासाठी जास्त खर्च येत असला तरी सेवाशुल्काची आकारणी मर्यादित ठेवण्यात आली होती. मात्र दैनंदिन उपयोगाच्या वास्तूच्या किमती व देखभाल खर्च, वीज दर, जल दर, नगरपालिका कर/महापालिका कर व कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये सातव्या वेतन आयोगानुसार झालेली लक्षणीय वाढ विचारात घेऊन सेवाशुल्काच्या दरात वाढ करण्याचा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काढण्यात आला आहे. यानुसार सध्या असलेल्या निवासस्थान शुल्कात दुपटीने वाढ करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शासकीय निवासस्थान क्षेत्रफळापेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या निवासस्थानात वास्तव्य करीत असल्यास अतिरिक्त सेवाशुल्कही आकारण्यात येणार आहे.

# सामाजिक वनीकरण विभागाचा उद्योजक मेळावा

## ११ वनपरिक्षेत्रातील १५० शेतकऱ्यांचा सहभाग



लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नागपूर :** सामाजिक वनीकरण विभागाच्यावतीने राष्ट्रीय कृषी योजनाअंतर्गत वनशेती, उत्पादक शेतकरी, व्यापारी उद्योजक यांच्याकरिता उद्योजक मेळावा आयोजित करण्यात आला. रामनगरातील गुरुनानक भवन येथे आयोजित मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) श्रीलक्ष्मी अण्णाबथुला व प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक वनीकरण विभागाचे उपवनसंरक्षक एच.एस. पद्मनाभा, पेंच व्याघ्रप्रकल्पाचे उपसंचालक अक्षय गजभिये, उपजिल्हाधिकारी ए.एम. कुंभार, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय इलोरकर, सेवानिवृत्त विभागीय वनाधिकारी माडभूशी व्यासपिठावर होते.

यावेळी विजय इलोरकर यांनी वनशेती, फळबाग लागवड, रोपवाटिका, दुहेरी पीक पद्धती, त्याला उपलब्ध उद्योगधंदा आदीबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

माडभूशी यांनी अटल बांबू वृक्ष लागवडीबाबत माहिती देऊन योजनेचा लाभ घेण्याचे शेतकऱ्यांना आवाहन केले. गणेश येल्लेवार यांनी निलगिरी, सूबाभूळ, सुरू या झाडांच्या प्रजाती लागवडीबाबत माहिती दिली. मेश्राम यांनी बांबू संशोधन प्रशिक्ष केंद्रातील बांबू प्रशिक्षणाबाबत माहिती दिली. यावेळी शेतकऱ्यांसाठी विविध स्टॉल लावण्यात आले होते. कार्यक्रमाला सामाजिक वनीकरण विभागातील ११ वनपरिक्षेत्रातील १५० शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाला सामाजिक वनीकरणचे विभागीय वनाधिकारी एन.आर. राऊत, ए.आर. आगाशे व इतर वनपरिक्षेत्र अधिकारी उपस्थित होते.

# वर्षभरात ४८ हजार महिला, अल्पवयीन मुली बेपत्ता

**मुंबई :** राज्यात गेल्या वर्षभरात तब्बल ४८ हजार २७८ महिला व मुली बेपत्ता झाल्याची धक्कादायक बाब समोर आली असून १३ हजार अल्पवयीन मुली आणि महिलांचा अद्याप शोध लागला नसल्याची माहिती राज्य सरकारने मंगळवारी विधानसभेत दिली.

राज्यात विशेषतः मुंबई, नवी मुंबई, रायगड, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आदी शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात अल्पवयीन मुली बेपत्ता होत असल्याबाबत मंगेश कुडाळकर, प्रशांत ठाकूर आदी सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात गृहविभागाने ही माहिती दिली. राज्यात २०२५मध्ये हरवलेल्या ४८,२७८ महिलांपैकी ३६,५८१ महिलांचा शोध लावण्यात आला.

# निसर्ग मार्गदर्शकांना वर्षभर रोजगाराची मागणी

**नागपूर :** राज्यातील राष्ट्रीय उद्यान, अभयारण्य व व्याघ्रप्रकल्पात कार्यरत निसर्ग मार्गदर्शकांना नियमित मानधन देण्यात यावे, त्यांना बाराही महिने रोजगार देण्यात यावा तसेच सामाजिक सुरक्षा सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी मागणी अभयारण्य गाईड्स कर्मचारी संघाने केली आहे.

दीड वर्षांपासून ही मागणी लावून धरली असताना शासनाने प्रत्येकवेळी चालढकल केली. त्यामुळे वनमंत्री गणेश नाईक यांना पुन्हा स्मरणपत्र देण्यात आले.

सात ऑक्टोबरला याबाबत निवेदन देऊन आमच्या मागण्या मान्य करण्याची विनंती शासनाला केली होती.

त्यानंतरही अजूनपर्यंत त्यावर कोणताही निर्णय झाला नाही. त्यामुळे दिलेल्या मुदतीत आदेश निर्गमित कराल, अशी अपेक्षा अभयारण्य गाईड्स कर्मचारी संघाचे सरचिटणीस निलेश मेंढे व सर्व पदाधिकाऱ्यांनी वनमंत्री गणेश नाईक यांना दिलेल्या स्मरणपत्रात केली आहे.

# पोलिसाची आत्महत्या

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** पत्नीसोबत सुरू असलेल्या कौटुंबिक वादामुळे आलेल्या नैराश्यातून पोलीस हवालदाराने सोमवारी रात्री अंबाझरी तलावात उडी घेऊन आत्महत्या केली. मंगळवारी सकाळी ही घटना उघडकीस आली. शिलरत्न भीमराव बेलेकर (४५, रा. वाघदरी ईसासनी) असे आत्महत्या केलेल्या पोलीस हवालदाराचे नाव आहे.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## e-TENDER NOTICE – 129 / 2025–26

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website https://eprocurement.mahagenco.in.

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost Rs. (In Lakhs) |
|---|---|---|---|
| TN0921 CHP2 | 3000066005 | WORK OF REPAIRING / SERVICING OF GOODWIN MAKE SUBMERSIBLE PUMP (40HP) ON AS WHEN REQUIRED BASIS FOR CHP-II. | 8.31 |
| TN0922 AHP1 | 3000066051 | WORK OF ERECTION, COMMISSIONING AND TRIAL RUN 100 MT WEIGH BRIDGE UNIT ALONG WITH ALL CONTROLS SYSTEM AND PORT A CABIN AT WAREGAON ASH BUND, 210 MW KPKD TPS. | 70.00 |
| TN0923 SAFETY Refloated | 3000066066 | WORK OF INSTALLATION OF LOCK OUT / TAG OUT (LOTO SYSTEM) AT UNIT#05 KHAPERKHEDA TPS. | 3.50 |
| TN0924 EM1 | 3000066127 | SUPPLY OF VARIOUS ELECTRICAL APPLIANCES FOR KHAPERKHEDA TPS. | 25.06 |
| TN0925 AHP1 Refloated | 3000066129 | PROCUREMENT OF DESIGN, DEVELOPMENT, MANUFACTURING, SUPPLY OF COMPLETE PUMP ALONG WITH MOTOR FOR CLEAR WATER PUMP OF 30 KW, HEAD 40M & FLOW 500 M3/HR AT AHP-1 KHAPARKHEDA TPS. | 32.90 |
| TN0926 TM2 | 3000066141 | PROCUREMENT OF SPARES FOR HP BYPASS SYSTEM VALVES AT UNIT NO.5 (500 MW) TPS, KHAPERKHEDA. | 6.79 |
| TN0927 CHP1 | 3000066144 | SUPPLY OF VARIOUS NON-DRIVE CONVEYOR PULLEYS FOR 1600 MM WIDE BELT CONVEYOR SYSTEM IN CHP-I (4 X 210 MW), T.P.S. KHAPERKHEDA. | 52.44 |
| TN0929 AHP1 | 3000066164 | PROCUREMENT AND INSTALLATION OF FLY ASH LOCAL SUMP PIT DRAINING AND TRANSFER SYSTEM FOR AT AHP-I. | 21.02 |
| TN0930 TM1 | 3000066166 | CONDENSER TUBES CLEANING BY HYDRO JETTING METHOD AND FOLLOWED BY BULLET SHOT METHOD AS AND WHEN BASIS DURING SHORT SHUT DOWN AT KHAPERKHEDA TPS-210 MW. | 5.81 |
| TN0931 WTP1 | 3000066167 | BIENNIAL WORK CONTRACT FOR ENVIRONMENTAL MONITORING BY MOBILE MONITORING VAN. | 72.31 |

Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.

Sd /-
Chief Engineer (O&M)
MSPGCL, TPS Khaperkheda

# तज्ज्ञही अपयशी; ‘डेंटल सिम्युलेटर’मधील त्रुटी कायम

## अधिकाऱ्यांच्या अडचणी वाढण्याचे संकेत

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नागपूर :** शासकीय दंत महाविद्यालयातील डेंटल सिम्युलेटर खरेदीतील कथित गैरप्रकाराची चौकशी सुरू झाली आहे. दरम्यान, हे यंत्र दुरुस्त करण्यासाठी रशियातून आलेल्या तज्ज्ञाने नागपूरमध्ये तीन दिवस तळ ठोकला; मात्र यंत्र पूर्णपणे सुरू न झाल्याने या प्रकरणात महाविद्यालयातील काही अधिकाऱ्यांसह पुरवठादाराच्या अडचणी वाढण्याचे संकेत मिळत आहेत.

न्यायालयीन मित्र ॲड. आयुषी डांगरे महाविद्यालयात आल्यावर संबंधित सिम्युलेटर चालवून दाखवण्यात आले आणि आवश्यक कागदपत्रे प्रशासनाकडून सादर करण्यात आली. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने यंत्र १०० टक्के कार्यरत आहे की नाही, याबाबत भाष्य करणे योग्य नाही. आवश्यकता भासल्यास पुरवठादारामार्फत पुन्हा तंत्रज्ञाला दुरुस्तीसाठी बोलावण्यात येईल.
**– डॉ. मंगेश फडणाईक, अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर**

नागपूर येथील शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील कोट्यवधी रुपयांच्या डेंटल सिम्युलेटर खरेदीप्रकरणी उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या न्यायालयीन मित्र ॲड. आयुषी डांगरे यांनी मंगळवारी तिसऱ्यांदा महाविद्यालयाला भेट दिली. त्यांनी पाहणी केली. यावेळी यंत्र चालवून दाखवण्यात आले; मात्र इंजेक्शन देताना अचूक जागा न दिसणे, दात कापणीत अचूकता नसणे अशा अनेक त्रुटी निदर्शनास आल्याची माहिती आहे. यंत्र सुरू असल्याचे दाखवले जात असले तरी त्याच्या कार्यक्षमतेची खात्री कोण करणार, हा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, प्रकरण उच्च न्यायालयात गेल्यानंतर पुरवठादाराने तातडीने रशियातून तंत्रज्ञाला नागपूरला बोलावले. त्याने सलग तीन दिवस दुरुस्तीचे प्रयत्न केले. त्यात त्याला आंशतः यश आले असले तरी यंत्र पूर्ण कार्यक्षमतेने सुरू झाले नाह, असे.सांगितले जाते. दोन दिवसांच्या नियोजनाने आलेला हा तंत्रज्ञ तीन दिवसानंतर येथून ते इतर देशात रवाना झाला. यंत्र पूर्ण क्षमतेने कार्यरत नसल्याने विभागप्रमुख ते स्वीकारण्यास अनुत्सुक असल्याची माहिती आहे. शासकीय निधीतून कोट्यवधी रुपये खर्चून हे यंत्र का खरेदी करण्यात आले, तसेच यंत्र निकृष्ट व सदोष असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर संबंधित विभागप्रमुखांनी दोषींविरोधात कारवाई का केली नाही, याबाबतही वैद्यकीय क्षेत्रातून प्रश्न केले जात आहेत.





आजचा सामना



श्रीलंका वि. न्यूझीलंड

वेळ : सायं. ७ वा.



थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, २, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.



## हेटमायर तिसऱ्या स्थानावरील बहुमूल्य खेळाडू -होप

**मुंबई :** शिम्रोन हेटमायर सध्या सुरू असलेल्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत तिसऱ्या स्थानी संघासाठी बहुमूल्य खेळाडू ठरत आहे, असे वेस्ट इंडिजचा कर्णधार शाय होप म्हणाला. हेटमायरच्या ३४ चेंडूंतील ८५ धावांच्या खेळीमुळे विंडीजने 'अव्वल आठ' फेरीतील सामन्यात झिम्बाब्वेला १०७ धावांनी नमविले. ''हेटमायर ज्या पद्धतीने फलंदाजी करीत आहे, त्याला पाहता इतके दिवस त्याची प्रतिभा वाया जात होती. तो कोणत्याही परिस्थितीत फलंदाजी करू शकतो. तिसऱ्या स्थानी तो संघासाठी बहुमूल्य खेळाडू ठरत आहे. या स्थानी तो मोकळेपणाने खेळतो. या स्पर्धेत संघासाठी महत्त्वपूर्ण खेळाडू ठरत आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत आम्ही त्याच्यावर ही जबाबदारी दिली होती. त्याने योग्य पद्धतीने ती पाडली आहे,'' असे होप म्हणाला.

# 'चेपॉक'ची खेळपट्टी फलंदाजांना पूरक?

## झिम्बाब्वेविरुद्धच्या सामन्यासाठी भारतीय संघ व्यवस्थापन सतर्क

**एक्स्प्रेस वृत्त**

**चेन्नई :** ट्वेन्टी २० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या 'अव्वल आठ' फेरीतील दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेला भारताचा पराभव अजूनही विसरता येत नाही. त्याचमुळे आता आव्हान राखण्यासाठी भारताला झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिज या दोन्ही सामन्यांत विजय आवश्यक असून, त्या दृष्टीने प्रयत्नांना सुरुवात झाली आहे. चेन्नईतील 'चेपॉक' मैदानाची खेळपट्टी यजमान भारताला साजेशी अशी मिळू शकते. त्यासाठी तीन खेळपट्टी तयार ठेवण्यात आल्या आहेत.

स्पर्धेपूर्वी सर्वोत्तम क्रिकेट खेळणाऱ्या भारताला स्पर्धेत मात्र खेळलेल्या एकाही केंद्रावर फलंदाजीची लय राखता आलेली नाही. आघाडीच्या फळीतील फलंदाजांच्या अपयशामुळे भारताच्या समस्यांमध्ये भर पडली आहे. घरच्या मैदानावर आपल्याचसाठी तयार करण्यात आलेल्या खेळपट्टींच्या स्वरूपाशी जुळवून घेण्यात भारताला कठीण गेले आहे. कर्णधार सूर्यकुमार यादव आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी स्पर्धेवर लक्ष ठेवून सुरुवातीपासून सपाट खेळपट्ट्यांवर खेळणे पसंत केले. मात्र, या खेळपट्ट्या त्यांच्या पसंतीस उतरलेल्या नाहीत.

या सगळ्या पार्श्वभूमीवर चेन्नईत भारताला त्यांना हवी तशी खेळपट्टी मिळू शकते अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. सामन्यासाठी एक लाल मातीची, तर दोन काळ्या मातीच्या अशा तीन खेळपट्ट्या तयार ठेवण्यात आल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. यातील कुठली खेळपट्टी वापरायची याचा निर्णय संघ व्यवस्थापन घेणार आहे.

अर्थात, खेळपट्टी कुठलीही निवडली, तरी ती फलंदाजीसाठी अनुकूल असणार यात शंका नाही. 'चेपॉक' येथे सहा सामने खेळविण्यात आले होते. यात साखळी गटात प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघाने सर्वात कमी म्हणजे १७३ अशी धावसंख्या उभारली. दोनशे ही येथील सर्वाधिक धावसंख्या ठरली होती. पहिल्या सामन्यात अफगाणिस्तानचे १८३ धावांचे आव्हान न्यूझीलंडने तेरा चेंडू शिल्लक असतानाच पार केले. लाल मातीवर झालेल्या अखेरच्या सामन्यात अफगाणिस्तानने ४ बाद २०० धावा केल्या होत्या. येथील खेळपट्टीचा एक पैलू म्हणजे येथे चेंडू चांगला उसळी घेत आहे. आतापर्यंत ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये फिरकी गोलंदाजांसाठी आवडते असलेले हे मैदान चार वर्षांपासून मात्र चांगले बदलले आहे. आता येथे १८० ते २०० धावा सामान्य झाल्या आहेत.

### खेळपट्टीच्या स्वरूपाचा ताण

आतापर्यंत खेळपट्टीच्या स्वरूपाशी जुळवून घेण्यात अपयश आल्यामुळे भारताने आपले अधिक लक्ष खेळपट्टीच्या स्वरूपावर केंद्रित केले आहे. मुंबईत अमेरिकेविरुद्धच्या पहिल्या सामन्यापासून भारताला त्यांच्या पसंतीची खेळपट्टी मिळालेली नाही. दिल्ली आणि अहमदाबाद येथे भारताने अखेरचे दोन सामने खेळले आहेत. तेथील खेळपट्ट्या या धिम्या होत्या. विशेष म्हणजे भारताने अशा वेळी अद्याप अजून आपला दुसरा पर्याय वापरलेला नाही. 'अव्वल आठ' मधील भारताचा अखेरचा सामना ईडन गार्डन्सवर आहे. जेथे सहसा यजमानांच्या पसंतीनुसार खेळपट्ट्या तयार केल्या जात नाहीत. याचाच अर्थ की भारताला आता परिस्थितीवर मात करावी लागणार आहे.

आता झिम्बाब्वेविरुद्धच्या सामन्याकडेच पाहायचे झाले, तर भारतीय संघ त्यांच्या रणनीतीचा पुनर्विचार करत असल्याचे समजते. प्रमुख तीन फलंदाज डावखुरे असल्यामुळे प्रतिस्पर्धी संघ ऑफ स्पिन गोलंदाज खेळविण्याचे नियोजन करत आहे. संघ व्यवस्थापन हे नियोजन मोडणार की नाही हे अजून गुलदस्त्यात आहे. मक्तेदारी मोडण्यासाठी संजू सॅमसनला सलामीला पसंती मिळू शकते.

झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिज दोन्ही संघांत ऑफ स्पिनर आहेत आणि भारतीय संघ आता अशा वळणावर आहे की जिथे त्यांना आघाडीच्या फळीला फलंदाजीत आलेले अपयश विसरून चालणार नाही. सरावाला सोमवारी एका दिवसाची सुट्टी देण्यात आली असली, तरी मंगळवारपासून संघ व्यवस्थापन उर्वरित दोन सामन्यांसाठी पूर्ण संतुलित आणि सर्व परिस्थितींना तोंड देणारा संघ निवडण्याचा विचार करेल.



### नेमकी कशी असेल खेळपट्टी

सामन्यासाठी तीन खेळपट्ट्या तयार असल्या तरी त्या नेमक्या कशा असतील हे कुणीच सांगू शकत नाही. दोन काळ्या मातीच्या खेळपट्ट्यांपैकी एका खेळपट्टीवर अजिबात गवत नाही, तर दुसरी हिरवीगार दिसून येत आहे. अशा खेळपट्ट्या या स्पर्धेत बहुतेक ठिकाणी दिसून आल्या. बॅट आणि चेंडू यांच्यात समान स्पर्धा व्हावी यासाठी खेळपट्टीवर थोड्या प्रमाणात गवत ठेवण्यात आले आहे. तिसरी खेळपट्टी मात्र पूर्ण लाल मातीची आहे. मात्र, खेळपट्टीचे स्वरुप आणि यजमान संघाचा फायदा यात आतापर्यंत कायम विरोधाभास दिसून आला आहे. मंगळवारच्या सरावानंतर खेळपट्टी लाल आणि काळ्या मातीची संमिश्र असेल असे बोलले जात आहे. यात नंतरचा म्हणजे काळी माती वर्चस्व गाजवेल अशी अपेक्षा आहे.

### वॉशिंग्टनसह अक्षरला संधी?

दक्षिण आफ्रिका संघात चार डावखुरे फलंदाज असल्यामुळे ऑफ स्पिनर वॉशिंग्टन सुंदरला खेळविण्याचा निर्णय भारताने घेतला होता. त्यासाठी अक्षर पटेलला वगळण्यात आले. मात्र, हा निर्णय चांगलाच महागात आणि नंतर टिकेचा ठरला. आता झिम्बाब्वेविरुद्ध अक्षरला संधी मिळणार हे जवळपास निश्चित समजले जात आहे. त्याने नेटमध्ये जोरदार सराव देखील केला. मात्र, वडिलांच्या आजारपणामुळे रिंकू सिंहला घरी परतावे लागल्यामुळे संघातील एक जागा मोकळी आहे. अक्षर पटेलला तर संधी मिळेलच, पण वॉशिंग्टनचेही स्थान कायम राहू शकते अशी सध्याची स्थिती आहे.

# इंग्लंड उपांत्य फेरीत

## पाकिस्तानवर दोन गडी राखून मात; ब्रूकची निर्णायक शतकी खेळी

**वृत्तसंस्था, पालेकेले**

**कर्णधार हॅरी** ब्रूकच्या (५१ चेंडूंत १०० धावा) निर्णायक शतकी खेळीच्या जोरावर इंग्लंडने 'आयसीसी' ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेतील चुरशीच्या झालेल्या 'अव्वल आठ' फेरीतील सामन्यात पाकिस्तानवर दोन गडी व पाच चेंडू राखून विजय मिळवला. या विजयामुळे त्यांनी उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले.

चांगल्या लयीत असलेल्या साहिबझादा फरहानच्या (६३) अर्धशतकामुळे पाकिस्तानने ९ बाद १६४ धावसंख्या उभारली. यानंतर ब्रूकने ट्वेन्टी-२० आंतरराष्ट्रीय मधील आपल्या पहिल्या शतकामुळे इंग्लंडला ८ बाद १६६ धावांपर्यंत पोहोचवत विजय मिळवून दिला. ब्रूकने 'पॉवरप्ले'मध्ये तीन आणि नंतर ५८ धावांत चार गडी गमावून देखील पाचव्या गड्यासाठी सॅम करनसह (१५ चेंडूंत १६) २८ चेंडूंत ४५ आणि विल जॅक्ससह (२३ चेंडूंत २८) सहाव्या गड्यासाठी ३१ चेंडूंत ५२ धावा करीत संघाचा विजय साकारला. पाकिस्तानकडून शाहीन शाह आफ्रिदी (४/३०) याने चांगली गोलंदाजी केली. त्याला मोहम्मद नवाझ (२/२६) आणि उस्मान तारिक (२/३१) यांची साथ मिळाली. मात्र, संघाला विजय मिळवून देण्यात त्यांना अपयश आले. आफ्रिदीने सुरुवातीला फिल सॉल्ट (०) व जोस बटलर (२) यांना बाद केले. आफ्रिदीच्या चेंडूवर मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात जेकब बेथल (८) देखील माघारी परतल्याने इंग्लंडचा संघ ३ बाद ३५ असा अडचणीत सापडला. आठव्या षटकात तारिकने टॉम बँटमला (२) बाद केल्याने ब्रूकवर धावा करण्यासाठी दबाव वाढला. यानंतर ब्रूकला जॅक्स व करन यांची साथ मिळाल्याने संघाचा विजय सोपा झाला. इंग्लंडला अखेरच्या तीन षटकांत दहा धावा हव्या होत्या. नवाझने १९व्या षटकांत दोन फलंदाज बाद करीत सामन्यात चुरस निर्माण केली. मात्र, जोफ्रा आर्चरने अखेरच्या षटकात चौकार लगावर उपांत्य फेरीतील संघाचे स्थान निश्चित केले. ब्रूकने आपल्या खेळीत १० चौकार व चार षटकारांची आतषबाजी केली.

त्यापूर्वी, फरहानने आपल्या खेळीत सात चौकार व दोन षटकारांसह संघाला समाधानकारक धावसंख्या उभारुन दिली. त्याला बाबर आझम (२५), फखर झमान (२५) आणि शादाब खान (२३) यांची साथ मिळाली. पाकिस्तानची सुरुवातही चांगली झाली नव्हती. संघ एकवेळ ३ बाद ७३ असा अडचणीत होता. मात्र, फरहानने संघाची एक बाजू सांभाळली. इंग्लंडकडून लिआम डॉसन (३/२४), जोफ्रा आर्चर (२/३२) व जेमी ओव्हर्टन (२/२६) यांनी चांगली गोलंदाजी केली.



| १०० | |
|---|---|
| हॅरी ब्रूक | |
| चेंडू | ५१ |
| चौकार | १० |
| षटकार | ४ |

### संक्षिप्त धावफलक

**पाकिस्तान :** २० षटकांत ९ बाद १६४ (साहिबझादा फरहान ६३, बाबर आझम २५; लिआम डॉसन ३/२४, जोफ्रा आर्चर २/३२, जेमी ओव्हर्टन २/२६) **पराभूत वि.**
**इंग्लंड :** १९.१ षटकांत ८ बाद १६६ (हॅरी ब्रूक १००, विल जॅक्स २८; शाहीन शाह आफ्रिदी ४/३०, मोहम्मद नवाझ २/२६)

**सामनावीर :** हॅरी ब्रूक.

**५** इंग्लंड संघ २०१६ ते २०२६ या कालावधीत ट्वेन्टी २० विश्वचषक स्पर्धेत सलग पाचव्यांदा उपांत्य फेरीत

**१** ट्वेन्टी २० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत शतकी खेळी करणारा हॅरी ब्रूक एकमेव कर्णधार. ब्रूकचे ट्वेन्टी २० क्रिकेटमधील देखिल पहिलीच शतकी खेळी


**४** ट्वेन्टी २० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आव्हानाचा पाठलाग करताना शतक ठोकणारा ब्रूक चौथा फलंदाज.

# श्रीलंकेला विजय अनिवार्य

## 'अव्वल आठ' फेरीत आज न्यूझीलंडचे आव्हान

**कोलंबो :** श्रीलंकेला ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेतील आपले आव्हान कायम राखायचे झाल्यास त्यांना आज, बुधवारी होणाऱ्या न्यूझीलंडविरुद्धच्या 'अव्वल आठ' फेरीतील सामन्यात विजय मिळवणे अनिवार्य असेल. यासाठी त्यांना आपल्या फलंदाजीत सुधारणा करणे आवश्यक आहे.

पालेकेले येथील धिम्या खेळपट्टीवर इंग्लंडविरुद्ध श्रीलंकेच्या फलंदाजांचा फिरकीपुढे निभाव लागला नाही आणि १४७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना त्यांना पराभूत व्हावे लागले. श्रीलंकेतील खेळपट्ट्या या सहयजमान भारताच्या खेळपट्ट्यांच्या तुलनेने खेळण्यास कठीण आहेत. प्रेमदासा येथील खेळपट्टीवरदेखील फिरकीपटूंना मदत मिळणे अपेक्षित आहे. येथील सीमारेषा मोठ्या असल्याने षटकार लगावणे सोपे नाही. 'अव्वल आठ' फेरीतील पहिल्या सामन्यात मिळालेल्या पराभवानंतर फलंदाजांनी खेळलेल्या फटक्यांवर प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्यामुळे त्यांना या लढतीत उतरण्यापूर्वी चुकांवर काम केले पाहिजे. ''हा एक ट्वेन्टी-२० सामना आहे. त्यामुळे साहजिकच अधिकाधिक धावा करण्याचा फलंदाजांचा प्रयत्न असतो. मात्र, चेंडू योग्य पद्धतीने न आल्यास वेगाने धावा करणे आव्हानात्मक असते,'' असे श्रीलंकेचे फलंदाजी प्रशिक्षक विक्रम राठोड यांनी सांगितले. पथुम निसांकाने श्रीलंकेकडून चांगली फलंदाजी केली आहे. तर, डावखुरा फिरकीपटू दुनिथ वेल्लालागेने आपल्या गोलंदाजीने प्रभावित केले आहे. दुसरीकडे, प्रेमादासा स्टेडियम येथील सामना पावसामुळे रद्द झाल्यानंतर न्यूझीलंडला पाकिस्तानसह गुण विभागून घ्यावा लागला. या सामन्यात पावसाची शक्यता नसून दोन्ही संघांचा प्रयत्न 'अव्वल आठ' फेरीत पहिला विजय नोंदविण्याचा असेल.



● **वेळ :** सायं. ७ वा.

# पुंडीरचे नाबाद शतक

## जम्मू-काश्मीरच्या पहिल्या दिवसअखेर २ बाद २८४ धावा

**पीटीआय, हुबळी**

**नयनरम्य निसर्ग** आणि बर्फाच्छादित डोंगराळ भागातील उत्कट प्रतिभेने रणजी चषकाच्या अंतिम सामन्यात पहिल्याच दिवशी अनुभवाला आव्हान दिले. शुभम पुंडीर (नाबाद ११७), यावर हसन (८८) आणि अब्दुल समद (नाबाद ५२) यांच्या दमदार फलंदाजीच्या जोरावर जम्मू काश्मीरने कर्नाटकविरुद्ध पहिल्या दिवसअखेर २ बाद २८४ अशी आश्वासक सुरुवात केली. प्रथम फलंदाजी करताना शुभम पुंडीरच्या नाबाद शतकी खेळीबरोबर त्याला यावर आणि समद यांच्याकडून मिळालेली साथ उचित होती. कर्णधार पारस डोग्रा निवृत्त झाल्यानंतर पुंडीर आणि समद यांनी तिसऱ्या गड्यासाठी १०५ धावांची अभेद्य भागीदारी केली.

नाणेफेक जिंकल्यानंतर जम्मू काश्मीरचा कर्णधार पारस डोग्राने अपेक्षित प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, त्यांची सुरुवात निराशाजनक राहिली. कामरान इक्बाल (६) वेगवान गोलंदाज प्रसिध कृष्णाच्या गोलंदाजीवर स्लिपमध्ये राहुलकडे झेल देऊन बाद झाला. पण, नंतर पुंडीर आणि यावर जोडीने कर्नाटकच्या गोलंदाजांना निराश केले. खेळपट्टीवर खेळणे एका क्षणी कठीण जात होते. फलंदाजांकडून चुकादेखील झाल्या. अनेकदा चेंडूने बॅटची कड घेतली.

कर्नाटकच्या अनुभवी गोलंदाजीसमोर यावर आणि पुंडीर फारसे प्रवाही नव्हते. पण, तरीही त्यांच्या फलंदाजीचा प्रभाव पडला. संथ फलंदाजी करत त्यांनी जम्मू काश्मीरला चांगली सुरुवात दिली होती. फिरकी गोलंदाज श्रेयस गोपालचा या जोडीने केलेला सामनाही लक्षवेधक ठरला. श्रेयसला लय मिळवू न देणे हेच एकमेव उद्दिष्ट या जोडीचे होते आणि ते त्याच दृढनिश्चयाने खेळले. या जोडीने दुसऱ्या गड्यासाठी १३९ धावांची भागीदारी केली. प्रसिधच्या गोलंदाजीवर स्लिपमध्ये राहुलनेच यावरचा झेल घेतला. यावरने आपल्या खेळीत १५० चेंडूंचा सामना करताना १३ चौकार ठोकले. त्यानंतर कर्णधार पारसला जायबंदी झाल्याने मैदान सोडावे लागले. प्रसिधचा एक उसळता चेंडू त्याच्या मानेवर आदळला. फॉरवर्ड शॉर्टलेगवर झेल घेतल्याचे अपीलही झाले. पण, फलंदाज म्हणून तो सुरक्षित होता. मात्र, दुखापतीमुळे त्याला मैदान सोडावे लागले. या दुर्दैवी क्षणानंतर मैदानावर तळ ठोकून असलेल्या पुंडीरला अब्दुल समदने सुरेख साथ दिली. पुंडीरने २२१ चेंडू खेळल्यानंतर १२ चौकार, २ षटकारांसह शतक साजरे केले. समदनेही अर्धशतक साजरे करत दिवसअखेरीस जम्मू काश्मीरचे आणखी नुकसान होऊ दिले नाही.



## संघर्षानंतरही भारताचा आणखी एक पराभव

**होबार्ट :** 'एफआयएच' प्रो हॉकी लीगच्या ऑस्ट्रेलियातील दुसऱ्या टप्प्यात सलग दुसऱ्या सामन्यात भारतीय पुरुष हॉकी संघाने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. आवश्यक तो संघर्ष केला. मात्र, अखेरीस भारतीय संघाला आणखी एका पराभवाचा सामना करावा लागला. स्पेनविरुद्ध मंगळवारी झालेल्या परतीच्या सामन्यात नियोजित वेळेतील १-१ अशा बरोबरीनंतर भारताला शूटआऊटध्ये ३-४ असा पराभव स्वीकारावा लागला.

स्पेनने सामन्याला वेगवान सुरुवात करून देताना आठव्याच मिनिटाला गोल नोंदवला. मात्र, जोस बस्टनचा हा गोल रद्द ठरविण्यात आला. अखेर १९व्या मिनिटाला कर्णधार हार्दिक सिंगची एक चाल मनिंदरने यशस्वी करत भारताला आघाडी मिळवून दिली. सामन्याच्या ५९व्या मिनिटापर्यंत भारताने आघाडी टिकवून ठेवली होती. मात्र, भारताच्या बचावातील त्रुटीचा या वेळी फॉन्टने अचूक उठवला आणि सुरेख मैदानी गोल करत स्पेनला बरोबरी साधून दिली.

# ऑस्ट्रेलियाकडून मूनी, हिलीची चमक

**ब्रिस्बेन :** ॲश्ले गार्डनरच्या (३/३३) प्रभावी गोलंदाजीनंतर बेथ मूनी (७६) आणि कर्णधार अलिसा हिली (५०) यांच्या अर्धशतकांच्या जोरावर ऑस्ट्रेलिया महिला संघाने पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारतावर सहा गडी व ७० चेंडू शिल्लक ठेवत विजय साकारला. या कामगिरीनंतर तीन सामन्यांच्या मालिकेत ऑस्ट्रेलियाने १-० अशी आघाडी घेतली.

एकदिवसीय प्रारूपातील विश्वविजेत्या भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, कर्णधार हरमनप्रीत कौर (८४ चेंडूंत ५३) आणि उपकर्णधार स्मृती मनधानाच्या (६८ चेंडूंत ५८) अर्धशतकानंतरही संघाला ४८.३ षटकांत २१४ धावाच करता आल्या. ऑस्ट्रेलियाला आव्हानाचा पाठलाग करताना फारशी अडचण झाली नाही. त्यांनी ३८.२ षटकांतच ४ फलंदाजांच्या मोबदल्यात २१७ धावा केल्या. हिलीने संघाला चांगली सुरुवात करून दिली. यानंतर मूनी आणि ॲनाबेल सदरलँडने (४४ चेंडूंत नाबाद ४८ धावा) चौथ्या गड्यासाठी ८५ धावांची भागीदारी करीत ऑस्ट्रेलियाचा विजय सुनिश्चित केला. हिली व फोबे लिचफील्ड (३२) यांनी पहिल्या गड्यासाठी ५५ धावांची भागीदारी केली. श्री चरणीने (२/४१) लिचफील्डला बाद केले. यानंतर जॉर्जिया वोलही (०) माघारी परतली. हिलीने मग मूनीसह तिसऱ्या गड्यासाठी ६४ धावा जोडल्या. क्रांती गौडने हिलीला बाद केले. यानंतर मूनीने जबाबदारीने खेळ केला. आपल्या अर्धशतकी खेळीदरम्यान एकदिवसीय क्रिकेटमध्ये तीन हजार धावांचा टप्पा गाठला. दोन्ही संघांतील दुसरा एकदिवसीय सामना शुक्रवारी होबार्ट येथे होईल.



### तेंडुलकरला बाद दिल्याच्या निर्णयाचा पंच बकनर यांना बावीस वर्षांनी पश्चात्ताप

# होय! माझा तो निर्णय चुकीचा

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेटमधील अलौकिक खेळाडू सचिन तेंडुलकरला पायचित ठरविण्याचा तो निर्णय चुकीचा होता अशी उपरती तो निर्णय देणारे पंच स्टीव्ह बकनर यांना तब्बल बावीस वर्षांनी झाली. दोन दशकांहून अधिक काळ जागतिक क्रिकेटमधील आदरणीय पंच म्हणून बकनर यांची ओळख होती. ते २००९ मध्ये निवृत्त झाले.

आता वेस्ट इंडिज क्रिकेट पंच संघटनेला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. यातील एक आठवणही तेंडलकरला बाद देण्याच्या निर्णयाविषयी होती. आयुष्यातील सर्वात कठीण निर्णय कुठला असे या वेळी त्यांना विचारले असताना त्यांनी ब्रिस्बेनच्या मैदानावर २२ वर्षांपूर्वी झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी सामन्यात तेंडुलकरला पायचित देण्याचा निर्णय सर्वात कठीण होता असे सांगितले.

या निर्णयाविषयी आजही बोलले जाते. तो निर्णय म्हणजे माझी चूक होती. मी त्याला का बाद दिले? तो बाद कसा? वगैरे प्रश्न त्यानंतर उपस्थित झाले. पण, आयुष्यात माणसाकडून चुका होतच राहतात आणि मी ती चूक स्वीकारली आणि पुढे चालू राहिलो, असे बकनर म्हणाले.

तेव्हा जेसन गिलेस्पीचा चेंडू पॅडच्या वर लागला होता. बकनर यांना ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी केलेली अपील पटली आणि त्यांनी त्याला बाद ठरवले. मात्र, पुन्हा पाहिल्यानंतर चेंडू यष्ट्यांच्या वरून जात होता असे स्पष्ट दिसून आले. समालोचन करणाऱ्या टोनी ग्रेगसह प्रत्येकाने हा निर्णय भयानक असल्याचे सांगितले.

बकनर यांनी तेंडुलकरला चुकीच्या पद्धतीने बाद देण्याची ही काही एकमेव घटना नाही. ईडन गार्डन्सवर २००५ मध्ये पाकिस्तानविरुद्ध काहीच जणांनी अपील केल्यानंतरही तेंडुलकरला यष्टिरक्षकाकरवी झेलबाद ठरवले होते. यानंतर बॅट आणि चेंडूंमध्ये बरेच अंतर असल्याचे दिसून आले होते.

### तेंडुलकरचे मिश्कील उत्तर

सचिन तेंडुलकरला २०२४ मध्ये एका मुलाखतीत पंच बकनर यांच्याशी असलेल्या नात्याविषयी विचारण्यात आले. मी फलंदाजी करताना बकनर यांना बॉक्सिंग ग्लोव्ह्ज घालायला द्यावेत, जेणेकरुन तो बाद असल्याची खूण करू शकणार नाही, अशी मिश्कील टिप्पणी तेंडुलकरने तेव्हा केली होती.



# गुकेशच्या कामगिरीकडे लक्ष

**प्राग :** जगज्जेता दोम्माराजू गुकेश प्राग आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत वर्षातील आपले पहिले जेतेपद मिळविण्याचा प्रयत्न करेल. विश्वचषक आणि टाटा स्टील मास्टर्स स्पर्धेत गुकेशला प्रभावी कामगिरी करता आली नव्हती.

दुसऱ्या मानांकित गुकेशला अग्रमानांकित व्हिन्सेंट केमर आणि उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोवचे आव्हान असेल. हे दोन्ही खेळाडू सध्या चांगल्या लयीत आहेत. केमर 'लाइव्ह रेटिंग'मध्ये चौथ्या, तर नोदिरबेक पाचव्या स्थानी आहे. गुकेश दहाव्या स्थानी आहे. गेल्या काही काळापर्यंत या रेटिंगच्या अव्वल दहामध्ये भारताचे तीन खेळाडू असायचे. मात्र, अर्जुन एरिगेसी आणि आर. प्रज्ञानंद यांची कामगिरी खालावल्याने त्यांची घसरण झाली.

गुकेश अरविंद चिदंबरमसह आपले आव्हान उपस्थित करेल. गुकेशप्रमाणेच हान्स नीमनकडेही सर्वांचे लक्ष असेल. इराणचा परहम मघसूदलू आणि नेदरलँड्सचा जॉर्डन व्हॅन फॉरेस्ट हेदेखील स्पर्धेत सहभागी होणार आहेत. भारताच्या चिदंबरमसमोर आपली कामगिरी सुधारण्याचे आव्हान असेल. उझबेकिस्तानचा नोदिरबेक याकुबोएव्ह, स्पेनचा डेव्हिड गुज्जारो आणि स्थानिक खेळाडू डेव्हिड नवारा हे अव्वल दहा खेळाडूंमध्ये सहभागी आहेत. चॅलेंजर्स गटात सूर्य शेखर गांगुली आणि महिला विश्वचषक विजेती दिव्या देशमुख भारताचे आव्हान उपस्थित करतील.








हे पत्र **मुद्रक आणि प्रकाशक विरेंद्र विद्याधर रानडे** यांनी मालक, दि इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - दि इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी लोकमत, प्लॉट नं. १९२, २०७ आणि २०८, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर-४४११०८ येथे छापून प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, अंबाझरी ले-आऊट, अंबाझरी, नागपूर-४४००१० येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी क्रमांक : २२३०४२१, २२३६९७, फॅक्स क्रमांक : २२३६९८६. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी क्रमांक : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाउस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००, फॅक्स : ०२०६७२४११४७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : देवेंद्र गावंडे*** (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Loksatta, RNI. No. 54743/92, Dated 30-4-92.
© दि. इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.

# मानसिक आरोग्य उपचारासाठी ऑनलाइन शोधांमध्ये वाढ

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** भारतात मानसिक आरोग्य सहाय्य सेवा घेण्यासाठी ऑनलाइन शोध घेण्याच्या प्रकारात वाढ होत आहे. यामध्ये कोलकात्यात समुपदेशन व थेरपी केंद्रांसाठीच्या शोधात १०२ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे या सेवांबाबत असलेली रुची दुप्पटीपेक्षा अधिक होत असल्याचे 'जस्ट डायल लिमिटेड'च्या ताज्या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

फेब्रुवारी २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीतील वर्षानुवर्षेच्या आकडेवारीची मागील वर्षाशी तुलना केली असता, महानगरांबरोबरच शहरी केंद्रांमध्येही समुपदेशन, थेरपी आणि मानसोपचार सेवांबाबतची रुची वाढल्याचे दिसून आले. ताज्या अहवालानुसार, राष्ट्रीय पातळीवर 'समुपदेशन सेवा' शोधण्यात सर्वाधिक १४ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. त्यानंतर 'मानसोपचार सेवा' शोधण्यात ८ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. 'समुपदेशन आणि थेरपी केंद्रां'साठीच्या शोधांमध्येही ५ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे.

मानसिक आरोग्य सहाय्य घेण्याच्या पर्यायांचा शोधांमध्ये लक्षणीय वाढ होत असल्याचे स्पष्ट होत असल्याचे जस्ट डायल लिमिटेडच्या या अहवालातून स्पष्ट होत आहे.







# जिद्द, चिकाटीतून 'प्रज्ञा'ची यशाला गवसणी

**अकोला :** जिद्द, चिकाटी व सातत्यपूर्ण परिश्रम केल्यास यशाला गवसणी घालता येते. अकोला जिल्ह्यातील डोंगरगाव येथील प्रज्ञा पुरणमल इंगळे ही तरुणी याचे आदर्श उदाहरण. अतिशय सामान्य कुटुंबातील प्रज्ञाची इंडो तिबेटीयन सीमा पोलीस दलात नुकतीच निवड झाली. तिने प्रशिक्षण पूर्ण केले.

गेल्या दोन-तीन वर्षांपासून प्रज्ञाने सैन्य दलात दाखल होण्यासाठी प्रयत्न सुरू केले. नियमित अभ्यास व तयारी केल्यावरही अनेक भरतीमध्ये अपयश आले. मात्र, त्यापुढे खचून न जाता मनात सैनिक होण्याची गाठ पक्की बांधली. प्रज्ञा नियमित पहाटे पाच वाजता उठून व्यायाम करून भरतीची तयारी करीत होती. तिचे वडील गवंडी, मजुरीचे काम करतात, तर आई मोलमजुरी करते. प्रज्ञाचे प्राथमिक शिक्षण गावातीलच जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेत झाले. पुढील शिक्षण तिने शहरात घेतले.



माझ्या आई-वडिलांची इच्छा होती की, मी सैन्य दलात नोकरी करून देशसेवा करावी. आई-वडिलांचे स्वप्न खरे ठरले. मला मोठे करण्यात गुरुजनांचा, ग्रामस्थांचा सिंहाचा वाटा आहे. सुरक्षा दलात जाण्याचा विचार केल्यानंतर अविरत शारीरिक कसरत, परिश्रम व सातत्यपूर्ण सराव केला. यामुळेच यश मिळाले. **– प्रज्ञा इंगळे.**

या यशाबद्दल डोंगर गावासह संपूर्ण परिसरातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. आम्हा सर्वांना प्रज्ञाच्या या निवडीचा सार्थ अभिमान असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. गावकऱ्यांकडून तिचा सत्कारही करण्यात आला.

# महापालिका आयुक्तांसमोरच नगरसेवकाची तक्रारदाराला शिवीगाळ

## जनसंवाद कार्यक्रम विसंवादाने गाजला

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**अमरावती :** महापालिकेत आयोजित करण्यात आलेल्या जनसंवाद कार्यक्रमादरम्यान नगरसेवकाने महिला आयुक्तांसमोरच तक्रारदाराला आक्षेपार्ह शिवीगाळ केल्याने सारेच जण अवाक झाले. या घटनेने मंगळवारी महापालिकेतील वातावरण चांगलेच तापले होते.

मालमत्ता कर आकारणी, शहरातील साफसफाई आणि इतर प्रश्नांसदर्भात तक्रारींच्या सोडवणुकीसाठी महापालिकेत जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पण, या जनसंवाद कार्यक्रमात विसंवादाचेही दर्शन घडले.

रहाटगाव येथील अतिक्रमणाशी संबंधित एका तक्रारदाराला राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.)चे नगरसेवक चंदू खेडकर यांनी महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांच्या समोरच आक्षेपार्ह शब्दात शिवीगाळ केली. खेडकर यांनी शिव्या दिल्यानंतर तक्रारकर्त्यानेही प्रत्युत्तर दिले. दोघांमध्ये चांगलीच शाब्दिक बाचाबाची झाली. नंतर दोघांनाही शांत करण्यात आले. रहाटगाव येथे मोक्याच्या जागेवर करण्यात आलेल्या अतिक्रमणाविषयी लेखी तक्रार रहाटगाव येथीलच एका नागरिकाने जनसंवाद कार्यक्रमादरम्यान केली होती. या तक्रारीवर चर्चा सुरू होती. त्यावेळी खेडकर हे अचानक आक्रमक झाले आणि त्यांनी तक्रारदाराला उद्देशून अवमानकारक शब्दांचा वापर केल्याचा आरोप आहे. सुनावणीदरम्यान खेडकर हे आयुक्तांना स्थळ पाहणीचा आग्रह करीत असताना तक्रारदाराने व्यत्यय आणल्याने दोघांमध्ये चांगलाच वाद निर्माण झाला. तक्रारदार प्रशासनाची दिशाभूल करीत असल्याचे खेडकर यांचे म्हणणे होते.

महापालिका आयुक्त शर्मा या परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न करीत होत्या. मात्र त्यांच्या उपस्थितीतच अशाप्रकारे भाषेची पातळी घसरल्याने उपस्थित नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. या जनसंवाद कार्यक्रमात प्रशासनाने २६२ तक्रारींवर सुनावणी घेत निपटारा करण्याचा प्रयत्न केला. चार तक्रारींवर शुक्रवारी निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. या कार्यक्रमांत नागरिकांकडून एकूण २६२ तक्रारी आल्या. यामध्ये सर्वाधिक तक्रारी मालमत्ता कर आकारणी व स्वच्छतेसंदर्भात होत्या. यातील १०८ तक्रारींचा निपटारा प्रांगणातील मंडपातच झाला व १५४ तक्रारी सभागृहात वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविल्या.

# 'भरचौकात मारून टाकू, लवकरच चमत्कार दाखवू'

## आ. पठाण यांना धमकीची ध्वनिफीत सार्वत्रिक

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**अकोला :** बिश्नोई टोळीकडून काँग्रेसचे आमदार साजिद खान पठाण यांना १० कोटीच्या खंडणीसाठी धमकीचा फोन आला होता. पठाण यांनी खंडणीसंदर्भात तक्रार दाखल केली. त्यांना सशस्त्र पोलिसांची सुरक्षा पुरवठण्यात आली. दरम्यान, बिश्नोई टोळीने दिलेल्या धमकीची ध्वनिफीत समाज माध्यमातून प्रसारित झाली आहे.

दहा कोटी दे, अन्यथा बाबा सिद्दिकी सारखे हाल करू. भरचौकात मारून टाकू, लवकरच चमत्कार दाखवू, अशी धमकी बिश्नोई टोळीचा हस्तक शुभम लोणकर याने दिली आहे.

जिल्ह्यातील दोन आमदारांना बिश्नोई टोळीकडून धमकी आली आहे. आमदार पठाण यांना दिलेल्या धमकीची ध्वनिफीत समाजमाध्यमातून मंगळवारी प्रसारित झाली. काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी मंगळवारी हा विषय विधानसभेत मांडला. आमदारांना तत्काळ सुरक्षा व्यवस्था पुरवण्याची मागणी त्यांनी केली. राज्यात लोकप्रतिनिधीच सुरक्षित नसतील, तर सामान्य जनतेचे काय? ज्या टोळीने यापूर्वी गोळीबाराच्या घटना घडवून आणल्या, त्यांच्याकडून धमकी येणे ही गंभीर बाब आहे. धमकीचा ध्वनिफीत ऐकली तर अंगावर काटा येतो. पठाण यांचा कोणत्याही गुन्हेगारी क्षेत्राशी संबंध नाही, तरीही त्यांना लक्ष्य केले जात आहे, असे वडेट्टीवार म्हणाले.

# बाजारात तुरीची आवक वाढताच दर गडगडले

## २४ दिवसांत तब्बल अकराशे रुपयांची घसरण

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**अमरावती :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत तुरीची आवक मोठ्या प्रमाणात वाढली असून गेल्या २४ दिवसांमध्ये तुरीच्या दरात तब्बल अकराशे रुपयांची घसरण झाली.

गेल्या ३० जानेवारीला बाजारात तुरीला ७ हजार ६०० रुपये ते ९ हजार १५० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला होता. २ फेब्रुवारीपासून दरांमध्ये घसरण सुरू झाली. मंगळवारी बाजार समितीत सुमारे १० हजार ५०३ क्विंटल तुरीची आवक नोंदविण्यात आली. ७ हजार २०० ते ७ हजार ९९९ म्हणजे सरासरी ७ हजार ५९९ रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला. गेल्या काही दिवसांमध्ये तुरीची आवक वाढल्याने दर दबावात आले आहेत. गेल्या शुक्रवारी बाजारात यंदाच्या हंगामातील विक्रमी १३ हजार ४४ क्विंटल तुरीची आवक झाली होती.



### साठवणूकदारांनाही तोटा

**१** व्यापाऱ्यांच्या मते, आयात-निर्यात धोरणातील अनिश्चितता आणि साठवणुकीवरील मर्यादा यामुळेही बाजारात सावध भूमिका घेतली जात आहे. मागील महिन्यात दर वाढत असल्याने अनेकांनी तूर साठवून ठेवली होती. मात्र, आता दर झपाट्याने खाली आल्याने साठवणूकदारांना

**२** प्रतिक्विंटल जवळपास एक हजार रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे.

एकाच वेळी मोठी आवक झाल्याने बाजार आवारात गर्दी वाढली आहे. ही परिस्थिती हाताळण्यासाठी आणि वजन, लिलाव तसेच चुकारे देण्याची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी बाजार समिती प्रशासनाने अतिरिक्त कर्मचारी तैनात केले आहेत. शेतकऱ्यांना ताटकळत राहावे लागू नये, यासाठी कामकाजाचे नियोजन करण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

भाववाढीच्या अपेक्षेने तुरीची साठवणूक केलेल्या शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. अतिवृष्टीमुळे उत्पादन घटेल या अंदाजावर बाजारात तेजी निर्माण झाली होती; मात्र आता नव्या हंगामातील तुरीची आवक वाढल्याने आणि आर्द्रतेचे प्रमाण जास्त असल्याने दरावर दबाव आला आहे.

अमरावती जिल्ह्यात २० दिवसांपूर्वी तुरीला ८८०० ते ९००० रुपये प्रति क्विंटल असा उच्चांक मिळत होता. काही बाजार समित्यांमध्ये चांगल्या प्रतीच्या तुरीचे सौदे ९००० रुपयांपर्यंत झाले होते. मात्र फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापासून नव्या तुरीची मोठ्या प्रमाणात आवक सुरू झाल्याने दर घसरू लागले.

जानेवारीच्या अखेरीस रोजची आवक ४ ते ५ हजार क्विंटलपर्यंत मर्यादित होती. मात्र फेब्रुवारीच्या मध्यात ही आवक वाढून ७ ते ८ हजार क्विंटलपर्यंत पोहोचली. आवक वाढल्याने तसेच अनेक शेतकऱ्यांनी साठवलेली तूर एकाचवेळी विक्रीस आणल्याने बाजारात पुरवठा जास्त झाला आहे. त्यातच नव्या तुरीतील ओलाव्याचे प्रमाण १२ ते १५ टक्क्यांपर्यंत असल्याने दर्जावर परिणाम होत असून व्यापारी दर कमी देत आहेत.






## संक्षिप्त

### शेगावात आजपासून राष्ट्रीय आरोग्य मेळावा

**बुलढाणा :** केंद्रीय आयुष मंत्रालय, अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांच्या संयुक्त विद्यमाने शेगाव येथे २५ ते २८ फेब्रुवारीदरम्यान चार दिवसीय राष्ट्रीय आरोग्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे. संत गजानन महाराज संस्थानच्या विसावा मैदानावर आयोजित या मेळाव्याचे उद्घाटन बुधवारी (दि.२५) राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, पालकमंत्री मकरंद पाटील, आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मेळाव्यात शेतकऱ्यांना वनोत्पादनांवर आधारित आणि औषधी पिकांची लागवड, प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि विपणन यावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळेल.

### बुलढाणा अर्बनतर्फे ‘ज्ञानगंगा फॉरेस्ट मॅरेथॉन’

**बुलढाणा :** बुलढाणा अर्बनचे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक यांच्या



संकल्पनेतून १ मार्चला ‘ज्ञानगंगा फॉरेस्ट मॅरेथॉन’चे आयोजन करण्यात आले आहे. ‘रन फॉर फॉरेस्ट’ असे ब्रीद वाक्य असलेल्या या स्पर्धेला सकाळी ६ वाजता गजानन महाराज संस्थान अंतर्गत, स्वयंप्रकाश संस्थान, गिरडा येथून सुरुवात होणार आहे. ५ किमी, १० किमी आणि २१ किमी या तीन प्रकारांत ही स्पर्धा होईल. यातील १० आणि २१ किलोमीटरसाठी वेळ मर्यादेचे बंधन आहे.

### प्रा. दत्तानंद इंगोले यांचे निधन

**वर्धा :** प्रसिद्ध आंबेडकरी कवी, लेखक व सामाजिक कार्यकर्ते प्रा.



दत्तानंद इंगोले (७८) यांचे मंगळवारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर इतवारा स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी पद्मश्री, भाऊ आणि मोठा आप्तपरिवार आहे.

# सरकारी योजना फक्त दाखविण्यासाठीच ?

## आदिवासी गावांतील शिबिरांवर उच्च न्यायालयाचे प्रश्नचिन्ह; धारणी, चिखलदरामधील परिस्थितीबाबत अनुभवकथन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** अमरावती जिल्ह्यातील धारणी व चिखलदरा तालुक्यातील २२ गावांमध्ये वीज उपलब्ध करून देण्यात शासनाला यश आले नाही. तेथे सौरऊर्जेचे पॅनल लावण्यात आले, मात्र देखरेख न केल्यामुळे ते निष्क्रिय झाले आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आदिवासी गावांमध्ये राबवण्यात येणाऱ्या शिबिरांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत तेथे माहिती दिल्या जाणाऱ्या सरकारी योजना केवळ दाखवण्यासाठी असतात काय, अशी विचारणा केली. न्यायालयाने स्वतःचे अनुभवकथन करत त्या गावातील परिस्थिती सांगितली.

अमरावतीमधील २२ आदिवासी गावांतील नागरिक अद्यापही वीज, पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. याप्रकरणी खासदार बळवंत वानखेडे यांनी जनहित याचिका दाखल केली होती. मात्र, खासदारांनी त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी संसदऐवजी न्यायालयाचे दार ठोठावणे सुरू केले तर चुकीचा पायंडा पडेल, असे मत व्यक्त करत न्यायालयाने मागील वर्षी नोव्हेंबरमध्ये ही याचिका स्वतःहून चालवण्याचा निर्णय घेतला. या आदिवासी गावांमध्ये पंतप्रधान सौरऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून तीन हजार ५९८ सौर पॅनल लावण्यात आले होते. मात्र यांची नियमित देखरेख न केल्यामुळे बहुतांश निष्क्रिय झाले. याचिकेवर न्या.अनिल किलोर आणि न्या.राज वाकोडे यांच्या खंडपीठासमक्ष सोमवारी सुनावणी झाली. आदिवासींना वेगळी वागणूक का दिली जाते, असा प्रश्न उपस्थित करत, असे अनेक प्रश्न अतिशय गंभीर स्वरुपाचे असून सोडवण्याची गरज असल्याचे मौखिक मत न्यायालयाने व्यक्त केले.



### तत्काळ उपाययोजना करा

यानंतर न्यायालयाने धारणीमधील स्वतःचे अनुभव सांगितले. काही दिवसांपूर्वी धारणीमध्ये एका शिबिराला भेट दिल्यावर तिथे ६० पेक्षा अधिक योजनांचे दालन होते. या शिबिरातील सरकारी योजना कशासाठी असतात ? इतक्या सरकारी योजना असताना प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी का असते, असे विविध प्रश्न न्यायालयाने उपस्थित केले. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता न्यायालयाच्या आदेशांची प्रतीक्षा न करता तत्काळ उपाययोजना करण्याचे मौखिक निर्देशही न्यायालयाने दिले.

### ‘विद्यमान सरपंचच प्रशासक’

#### राज्य शासनाच्या ग्वाहीनंतर याचिका निकाली

१ राज्यात जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत ज्या ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपुष्टात येणार आहे, त्या ग्रामपंचायतींमध्ये सध्याचे सरपंचच प्रशासक म्हणून नियुक्त केले जातील. तसेच ग्रामपंचायतीतील इतर सदस्यांचा समावेश प्रशासकीय समितीत करण्यात येईल, अशी माहिती राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाला दिली. राज्य शासनाच्या ग्वाहीनंतर न्यायालयाने याचिका निकाली काढली.

२ न्या.अनिल किलोर आणि न्या.राज वाकोडे यांच्या खंडपीठासमक्ष मंगळवारी झालेल्या सुनावणीदरम्यान विभागीय आयुक्त कार्यालयातील अतिरिक्त आयुक्त विवेक इलमे यांनी शपथपत्र सादर करत स्पष्ट केले की, ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपल्यानंतर सरपंचांनाच प्रशासक म्हणून नियुक्त केले जाईल, तसेच इतर ग्रामपंचायत सदस्यांचा समावेश प्रशासकीय समितीत करण्यात येईल. राज्य सरकारच्या या भूमिकेची नोंद घेत न्यायालयाने याचिका निकाली काढली.

# धूर्त भाजपपासून सावध राहा

## उद्धव ठाकरेंचा जिल्हाप्रमुख गिऱ्हे यांना सल्ला



**लोकसत्ता वार्ताहर**

**चंद्रपूर :** महापौरपद हवे असेल तर पक्षप्रवेश करा, असा प्रस्ताव भाजप व काँग्रेसच्या नेत्यांनी दिला होता. मात्र, चंद्रपूर जिल्ह्यात शिवसेना (उबाठा) पक्षाचे अस्तित्व कायम राहावे, यासाठीच तो प्रस्ताव नाकारला. काँग्रेसपेक्षा भाजपने मानसन्मान देत सव्वा वर्षे महापौरपद देण्याचे मान्य केले. यामुळे चंद्रपूर महापालिकेत भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला, असे शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख संदिप गिऱ्हे यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना सांगितले. यावेळी ठाकरे यांनी धूर्त भाजपपासून सावध रहा, असा सल्ला गिऱ्हे यांना दिला.

शिवसेनेचे सहा व दोन अपक्ष नगरसेवकांनी मुंबईत ‘मातोश्री’वर ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी उपमहापौर प्रशांत दानव, मनस्वी गिऱ्हे, आकाश साखरकर, लांडगे, गटनेता राहुल विरुटकर, श्रुती घाटे तसेच अपक्ष नगरसेवक नंदू नागरकर गिऱ्हे यांच्यासोबत होते.

पक्षवाढीसाठी सव्वा वर्षे महापौरपदाचा प्रस्ताव स्वीकारून भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला, असे गिऱ्हे यांनी ठाकरे यांना सांगितले. यावर ठाकरे यांनी, लोकांच्या कामांसाठी, विकासासाठी सत्तेत जाणे वाईट नाही, मात्र पक्षाचे अस्तित्व टिकवून ठेवा, असे सांगितले.

सत्तेत असलो तरी आवश्यक तिथे भाजपला विरोध करा. भाजप नेते खूप हुशार आणि चतुर आहेत. यामुळे दटून रहा आणि टिकून रहा. संघटना टिकवून ठेवा आणि पक्ष वाढवा, असा सल्लाही ठाकरे यांनी दिला.

या भेटीत मनसेने केलेल्या आरोपांवरही चर्चा झाली. मात्र, ठाकरे यांनी या आरोपांना तेवढे महत्त्व दिले नाही, असेही गिऱ्हे यांनी सांगितले. ठाकरे व गिऱ्हे यांच्यातील चर्चेचा तपशील पाहता भाजप व शिवसेना युतीला एकप्रकारे ठाकरे यांनी मूक संमती दिल्याचे दिसून येते.

# गडचिरोलीत प्रस्तावित मद्यनिर्मिती प्रकल्पाच्या जनसुनावणीला स्थगिती

## वाढत्या विरोधामुळे प्रशासनाची अखेर माघार

**लोकसत्ता वार्ताहर**

**गडचिरोली :** जिल्ह्यातील तीन दशकांची दारूबंदी आणि सामाजिक संघटनांचा तीव्र विरोध लक्षात घेता ‘एलटीबी बिव्हरेजेस’ या प्रस्तावित मोहफूल मद्यनिर्मिती प्रकल्पाच्या जनसुनावणीला प्रशासनाने तूर्तास स्थगिती दिली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ९ मार्चला आयोजित केलेली ही सुनावणी कायदा व सुव्यवस्थेचे कारण पुढे करत पुढील आदेशापर्यंत लांबणीवर टाकण्यात आली.

दोन वर्षांपासून थंडबस्त्यात असलेल्या या वादग्रस्त प्रकल्पासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने अचानक ९ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जनसुनावणी आयोजित केली होती. यासंदर्भात जाहीर नोटीस प्रसिद्ध होताच जिल्ह्यातून विरोधाचे सूर उमटू लागले. जिल्ह्याची दारूबंदी आणि ‘मुक्तिपथ’सारख्या मोहिमांद्वारे सुरू असलेले व्यसनमुक्तीचे कार्य पाहता, हा प्रकल्प म्हणजे जिल्ह्याच्या सामाजिक आरोग्यावर घाला असल्याचे मत ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय बंग आणि देवाजी तोफा यांनी व्यक्त केले. यासंदर्भात त्यांनी प्रशासनाकडे लेखी आक्षेप नोंदवले. या विरोधाची दखल घेत प्रदूषण नियंत्रण मंडळाने आता जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून सुनावणी स्थगित करण्याची विनंती केली आहे. स्थानिक रहिवाशांनी या प्रकल्पावर घेतलेले तीव्र आक्षेप आणि त्यातून निर्माण होणारी कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती विचारात घेऊन ही जनसुनावणी पुढे ढकलण्यात येत असल्याचे मंडळाने आपल्या पत्रात म्हटले आहे.

### वादाची पार्श्वभूमी

दोन वर्षांपूर्वी गडचिरोली औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) क्षेत्रात या प्रस्तावित कारखान्याचे भूमिपूजन झाले तेव्हापासूनच यावर विरोधाचे मोठे वादळ उठले होते. डॉ. बंग यांनी या प्रकल्पावर कडाडून टीका करत थेट मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवले. राज्य सरकारचा हा निर्णय ‘आदिवासी द्रोही’ असल्याचे सांगत त्यांनी मद्यमुक्तीसाठी झटणाऱ्या संघटनांना अंधारात ठेवून ही परवानगी दिल्याचा आरोप केला होता. हिवाळी अधिवेशनात देखील यावर वादळी चर्चा झाली होती. जिल्ह्यातील ११०० हून अधिक ग्रामसभांनी दारूबंदीच्या समर्थनार्थ ठराव दिलेले असताना आणि स्वतः मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील कार्यदलाच्या माध्यमातून व्यसनमुक्तीची मोहीम राबविली जात असताना, मद्यनिर्मितीचा कारखाना सुरू होणे हे विरोधाभासी असल्याचा दावा सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने आता जनसुनावणी रद्द केल्यामुळे ही प्रक्रिया थांबली असली, तरी प्रशासन हा प्रकल्प पूर्णपणे रद्द करण्याबाबत काय भूमिका घेते, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# बाळ विक्री प्रकरणातील आरोपी महिला अटकेत

## आर्थिक दुर्बल कुटुंबातील बालकांची डॉक्टरांकडून विक्री

**लोकसत्ता वार्ताहर**

**भंडारा :** बाळ विक्री प्रकरणात सहाव्या आरोपीला भंडारा पोलिसांनी अटक केली. मालती वाघमारे असे अटक करण्यात आलेल्या आरोपी महिलेचे नाव आहे. पांढराबोडी येथील वाघमारे यांनी बाळाची खरेदी केली होती. या टोळीने आतापर्यंत दोनपेक्षा अधिक बाळांची विक्री केल्याचा संशय जिल्हा पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांनी व्यक्त केला.

गोंदिया येथील न्यू बालाजी हॉस्पिटलचे संचालक डॉ. नितेश बाजपेयी मुख्य सूत्रधार असलेल्या बाळ विक्री प्रकरणाचा उलगडा २ फेब्रुवारीला झाला होता. याप्रकरणी ६ फेब्रुवारीला वरठी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. याप्रकरणी पाच जणांना पोलिसांनी अटक केली होती. विक्री करण्यात आलेले दोन बाळ पोलिसांनी परत मिळवले. सोमवारी वाघमारे यांनाही अटक करण्यात आली. डॉ. बाजपेयी हा आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि विवाहबाह्य संबंधातून जन्मास आलेल्या बाळांच्या विक्रीचे व्यवहार करायचा. तशी टोळी त्याने तयार केली असावी, अशी शंका पोलीस अधीक्षकांनी व्यक्त केली. डॉक्टरच्या वैद्यकीय पदव्यांसंदर्भातही तपासणी सुरू असून संबंधित विभागाशी पत्रव्यवहार केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. ज्यांनी या प्रकरणात डॉक्टरांना मदत केली, त्याला आरोपी करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# लाचखोरीमुळे महापालिकेची प्रतिमा मलीन

## नगररचना, बांधकाम, अतिक्रमण विभागांत भ्रष्टाचार

**लोकसत्ता वार्ताहर**

**चंद्रपूर :** चार वर्षांच्या प्रशासक राजवटीत महापालिकेतील सर्वच विभागांना भ्रष्टाचाराचे ग्रहण लागले. अधिकाऱ्यांना पैसे दिल्याशिवाय कामे होत नाही, अशी धारणाच निर्माण झाली. त्यामुळे शहरात सर्वत्र अवैध बांधकामे आणि अतिक्रमण मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसते. नगररचना विभागापासून बांधकाम विभागापर्यंत सर्वांनाच लाचेची सवय जडली. यामुळेच महापालिकेची प्रतिमा मलीन झाल्याचे बोलले जात आहे.



महापालिकेच्या पंतप्रधान घरकुल योजनेतील कंत्राटी अभियंता शुभम वरघट याला दीड लाखाची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केली. पाच-सहा वर्षांपूर्वी नियुक्ती झालेल्या वरघट याचा चार ते साडेचार वर्षांचा कार्यकाळ प्रशासक राजवटीतच गेला. याच काळात सर्वच विभागांना लाचखोरीची सवय लागली. यातूनच वरघट याने नगररचना आणि अतिक्रमण विभाग वरिष्ठांना खूष करीत स्वतःकडे घेतला. प्रशासक राजवटीतील लाचखोरीतूनच शहरात अवैध बांधकाम, अतिक्रमण वाढलेले दिसून येते.

यावर महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी किंवा अभियंत्यांनी कुठलीही कारवाई केलेली नाही. नगररचना, अतिक्रमण व बांधकाम विभागच नाही, तर आरोग्य, शिक्षण, खरेदी-विक्री, अग्नीशमन, पाणीपुरवठा या सर्वच विभागांना लाचखोरीची वाळवी लागली. महापौर संगीता खांडेकर व उपमहापौर प्रशांत दानव यांनी पदाची सूत्रे स्वीकारून पंधरा दिवस होत नाही तोच महापालिकेत लाचखोरीचे प्रकारण उघडकीस आले. प्रशासकीय काळात अधिकाऱ्यांना जडलेल्य या वाईट सवयीला लगाम लावण्याचे आव्हान या दोन्ही पदाधिकाऱ्यांवर आहे.

# सहकार विद्या मंदिर जिल्ह्यातील पहिली ‘एआय’ प्रमाणित शाळा

**बुलढाणा :** बुलढाणा अर्बनचा शैक्षणिक उपक्रम असलेल्या डोंगरखंडाळा येथील श्रीमती बसंतीबाई देवकीसन चांडक सहकार विद्या मंदिर या शाळेने जिल्ह्यातील पहिली ‘एआय सर्टिफाइड’ (आर्टिफिसिअल इंटेलिजन्स) शाळा होण्याचा मान मिळविला.

ही प्रतिष्ठित मान्यता मिळवण्यासाठी ‘रिलायन्स जिओ पीसी’ चमूचे वरिष्ठ अधिकारी रोहितकुमार शर्मा, प्रशांत वासुगडे यांचे मार्गदर्शन लाभले. भविष्यातील तंत्रज्ञान आजच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने ‘डिजिओ टीम’ने शाळेत सर्वसमावेशक ‘एआय’ प्रशिक्षण सत्रांचे आयोजन केले. या उपक्रमांतर्गत इयत्ता ६ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांना एआय, मशीन लर्निंगची प्राथमिक ओळख, डिजिटल साधनांचा वापर, डेटा समज, तसेच तांत्रिक समस्यांचे निराकरण या विषयांवर सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. शाळेतील सर्व शिक्षकांसाठीदेखील अत्याधुनिक एआय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

बुलढाणा अर्बनचे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक यांच्या प्रेरणेने संस्थेने यासाठी पुढाकार घेतला. बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर आणि कोमल झंवर यांच्या संकल्पनेप्रमाणे आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून डिजिटल शिक्षणाच्या दिशेने टाकलेले हे पाहिले पाऊल ठरले आहे.

# भाजपकडून प्रदेश पदाधिकारी निवडीत अकोला, वाशीमला भोपळा

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**अकोला :** भाजपच्या प्रदेश पदाधिकाऱ्यांच्या यादीत अकोला, वाशीम जिल्ह्यांना भोपळा मिळाला आहे. अकोल्यातून आमदार रणधीर सावरकर सरचिटणीस होते. मात्र, विधिमंडळात मुख्य प्रतोदपदाची जबाबदारी असल्याने त्यांना सरचिटणीसपदावरून वगळण्यात आल्याची माहिती आहे. जिल्ह्यातील इतर कोणत्याही नेत्याला पदाधिकारी म्हणून स्थान मिळाले नाही. वाशीम जिल्ह्यातील नेत्यांनाही संधी मिळाली नाही.

गेल्या काही महिन्यांपासून प्रतीक्षा असलेल्या भाजपच्या प्रदेश पदाधिकाऱ्यांची निवड प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मंगळवारी जाहीर केली. नूतन प्रदेश पदाधिकाऱ्यांमध्ये एकूण ४३ जणांचा समावेश आहे. त्यामध्ये १२ उपाध्यक्ष, सहा सरचिटणीस, १२ चिटणीस, कोषाध्यक्ष, सहकोषाध्यक्ष, मुख्यालय प्रभारी, मुख्यालय सहप्रभारी, मुख्य प्रवक्ता प्रत्येकी एक आदींसह विविध मोर्चांच्या अध्यक्षांचा समावेश आहे.

अकोला पूर्वचे आमदार सावरकर प्रदेश सरचिटणीस म्हणून कार्यरत होते. मंत्रिपदाची संधी हुकल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना विधिमंडळ मुख्य प्रतोद हे मंत्रिदर्जाचे पद दिले.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचेदेखील ते सहअध्यक्ष म्हणून कार्य करीत आहेत. मतदार याद्यांसंदर्भात पक्षाच्या ‘सर’ समितीवर त्यांना सदस्य म्हणून घेण्यात आले. इतर जबाबदाऱ्यांमुळे त्यांना सरचिटणीसपदावरून वगळण्यात आल्याचे बोलल्या जात आहे. त्यांच्या ऐवजी जिल्ह्यातील इतर कुठल्या नेत्याची प्रदेश पदाधिकारी म्हणून वर्णी लागेल, अशी चर्चा होती. मात्र, तीही फोल ठरली.

वाशीम जिल्ह्याला या अगोदरही प्रदेश पदाधिकाऱ्यांमध्ये प्रतिनिधित्व मिळाले नव्हते. यावेळीदेखील वाशीम जिल्ह्याला वाटण्याच्या अक्षता लावल्या आहेत. त्यामुळे नेत्यांमध्ये नाराजी असल्याचे बोलले जाते.

### पश्चिम विदर्भात दोन जिल्ह्यांना प्रतिनिधित्व, तीन जिल्ह्यांची पाटी कोरीच

भाजपच्या प्रदेश पदाधिकाऱ्यांमध्ये पश्चिम विदर्भातील दोन जिल्ह्यांना प्रतिनिधित्व मिळाले असून तीन जिल्ह्यांची पाटी कोरीच राहिली. अमरावती येथील माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे यांना उपाध्यक्ष, तर बुलढाणा जिल्ह्यातून आमदार डॉ. संजय कुटे यांना सरचिटणीसपदावर संधी मिळाली. अकोला, वाशीम व यवतमाळ जिल्ह्यातील कुठलाही नेत्याला संधी मिळाली नाही.

# ‘कॅम्पा’अंतर्गत पारंपरिक बांबू कारागिरांचे सक्षमीकरण

**चंद्रपूर :** ‘कॅम्पा’ प्रकल्पांतर्गत मोहर्ली बांबू क्षेत्रातील पारंपरिक गारागिरांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने आयोजित १५ दिवसीय ‘बांबू बास्केट्री’ प्रशिक्षण कार्यक्रमाचा यशस्वी समारोप झाला.

या प्रशिक्षणात स्थानिक महिलांनी बांबूपासून बाजारपेठेत मागणी असलेल्या वस्तू तयार करण्याचे कौशल्य आत्मसात केले. टोपल्यांबरोबरच बांबू चटई, बांबू बुके, बांबूची फुले, बांबू बॅच आदी आधुनिक व कलात्मक वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. पारंपरिक कलेला आधुनिकतेची जोड मिळाल्याने वस्तू अधिक व्यावसायिक आणि दर्जेदार ठरल्या. कारागिरांच्या हाताला काम मिळवून देणे, त्यांच्या



कलेला योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे, हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. प्रशिक्षणाचे नियोजन पर्यवेक्षक योगिता साठवणे यांनी केले. सहाय्यक म्हणून सुनिता मोकाशे, प्रशिक्षक बांबू सखी मनिषा नन्नावरे व अनिता भोयर तसेच विशेष प्रशिक्षक संतोष बजाईत यांनी मोलाची भूमिका बजावली. कार्यक्रम बीआरटीसीचे संचालक मनोज खैरनार, वन परिक्षेत्र अधिकारी आकाश माल्लेलवार यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.


# ‘धर्माची नीती नको, नीतीचा धर्म हवा’

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वर्धा :** भारतीय संदर्भात ‘सेक्युलर’ शब्दाचा अर्थ सांगणारे निधर्मी, धर्मनिरपेक्षता, सर्वधर्मसमभाव म्हणून जे जे पर्यायी शब्द वापरले गेले ते सर्व नकारात्मक आणि अपुरे आहे. माणुसकीचा धर्म किंवा नीतीचा धर्म हा सेक्युलर शब्दाचा खरा अर्थ आहे आणि तोच गांधीजींनी स्वीकारला. त्यांची प्रार्थना ‘ईश्वर अल्ला तेरो नाम’ ही सगळ्या जगाचा स्वीकार करणाऱ्या माणुसकीचा वेध घेणारी आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक आणि विचारवंत प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी केले.

सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठानतर्फे सार्वजनिक वाचनालय वर्धा येथे आयोजित कार्यक्रमात ‘सेक्युलर गांधी’ या विषयावर ते बोलत होते.

> संघटीत धर्म नेहमीच राजांच्या, सत्तेच्या बाजूने उभे राहून सत्तेच्या अन्यायाला धार्मिक, दैवी मान्यता देत आला आहे.




जगातील सर्व धर्मांनी स्त्रियांना आणि गरिबांना छळले, त्यांच्यावर अनन्वित अत्याचार केले. संघटीत धर्म नेहमीच राजांच्या, सत्तेच्या बाजूने उभे राहून सत्तेच्या अन्यायाला धार्मिक, दैवी मान्यता देत आला आहे. जे धर्म माणुसकी, त्याग, प्रेम, अहिंसेची शिकवण देतात त्या सर्व प्रमुख- क्रिश्चियन, इस्लाम, बौद्ध धर्मांनी जगात मोठ्या प्रमाणात नरसंहार घडवून आणल्याचे ऐतिहासिक दाखले त्यांनी दिले. स्वतंत्र विचार करणारी स्त्री ही चेटकीण असते असे ठरवून युरोपात गिरिजाघरांनी (चर्च) पन्नास लाखांहून अधिक महिलांना जिवंत जाळल्याचा नोंदी किंवा आता आतापर्यंत पती निधनानंतर पत्नीला जिवंत जाळण्याच्या सती परंपरा हिंदू धर्माची नीती राहिल्याचे दाखले प्रा. द्वादशिवार यांनी दिले.

स्त्रिया, गरीब, वंचित वर्गालाही माणुसकीची वागणूक देण्यासाठी धर्माची नीती नको, तर नीतीच्या धर्माचा पुरस्कार करण्यासाठी ब्रिटेनच्या जॉर्ज जेकब होलिएक या समाज सुधारकाने १८५१ मधे सेक्युलिरिज्म हा शब्द दिला. माणसाने माणसाशी माणसासम वागणे हा सेक्युलिरिज्मचा गाभा आहे. सर्व धर्मातील चांगल्या बाबीची बेरीज करून आणि चुकीच्या मान्यतांचा त्याग करून ‘नीतीचा धर्म’चा पुरस्कार गांधीजींनी केला. ते त्यांच्या सर्व राजनैतिक, सामाजिक, आध्यात्मिक उपक्रमांत दिसून येते, असे प्रा. द्वादशीवार यांनी सांगितले. आश्रम प्रतिष्ठानचे सचिव विजय तांबे यांनी प्रास्ताविक आणि वक्त्यांचा परिचय करून दिला. आश्रम परिवारातर्फे सुषमा शर्मा यांनी खादीचे वस्त्र देऊन वक्त्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाला डॉ. उल्हास जाजू, डॉ. एस.पी. कलंत्री, डॉ. भावना कलंत्री, समीर देशमुख, संजय भार्गव, डॉ. सुजाता भार्गव, डॉ. सुभाष खंडारे, डॉ. अनिल दुबे, डॉ. तारक काटे, अमीर अली अजानी, व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# ‘व्यवस्थेला दांभिकतेविषयी प्रश्न विचारणारी बंडखोर कविता’

## ‘अरण्यदीक्षा’ कवितासंग्रहाचे प्रकाशन

**चंद्रपूर :** ‘अरण्यदीक्षा’ या कवितासंग्रहात कवीची भूमिका स्वतःच्या जगण्याच्या केंद्रस्थानी आहे. काळ, अस्तित्व आणि अवकाश यांविषयीचे अनुभव कवी किशोर कवठे प्रामाणिकपणे कवितेतून मांडतात. दुर्लक्षित विषयांवर गहन चिंतन करत सभोवतालच्या नाटकी जगात प्रतिमा, भाषा आणि आशयसौंदर्याच्या माध्यमातून अस्सलतेने उतरलेली ही कविता व्यवस्थेच्या दांभिकतेविषयी प्रश्न विचारणारी बंडखोर कविता आहे, असे प्रतिपादन नांदेड येथील प्रसिद्ध लेखिका व समीक्षक सुचिता खल्लाळ यांनी केले.

अक्षर साहित्य कला प्रतिष्ठानतर्फे आयोजित व स्तंभ पब्लिशिंग हाऊस प्रकाशित कवठे यांच्या



‘अरण्यदीक्षा’ या काव्यसंग्रहाचा लोकार्पण सोहळा नुकताच पार पडला. यावेळी खल्लाळ बोलत होत्या. सुनील नामदेव कवठे यांच्या हस्ते काव्यसंग्रहाचे लोकार्पण करण्यात आले. अध्यक्षस्थानी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार विजेते विख्यात कवी व संपादक प्रफुल्ल शिलेदार होते. अतिथी म्हणून प्रसिद्ध कवी व रेखाचित्रकार प्रमोदकुमार अणेराव आणि किशोर मुगल उपस्थित होते. कवठे यांची कविता इथल्या जमिनीशी घट्ट नाते सांगणारी असून स्वतःशी विश्वासार्हता निर्माण करणारी आहे, असे शिलेदार यांनी सांगितले. जगण्याची व लेखनाची अद्वैत भूमिका आणि समष्टीला समजून घेण्याची वृत्ती यामुळे कवितेतून संयत अंतःस्वर उमटल्याचे प्रमोदकुमार अणेराव म्हणाले. प्रवीण तुरानकर, अर्चना जुनघरे, गीता रायपुरे व राजेश देवाळकर यांनी कवठे यांच्या कवितांचे अभिवाचन केले. प्रास्ताविक अविनाश पोईनकर, संचालन नरेशकुमार बोरीकर यांनी केले. सुरज दहागावकर यांनी आभार मानले.